# राष्ट्रसंचार

Beyond The News

@rashtrasanchar.com

पुणे, रविवार, ८ डिसेंबर २०२४ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 12 • वर्ष ४ थे, अंक १२ • किंमत ₹ ६ • पाने : १२

महाराष्ट्र; भारताचे 'ग्रोथ इंजिन' P५

**येळकोट येळकोट जयमल्हार**
तळी भंडार सह भंडाऱ्याची उधळण
साधू संतांनी घेतले दर्शन १०

**भारतीय संघ संकटात**
निम्मा संघ पाठवला माघारी :
ऑस्ट्रेलियाची दादागिरी ११

PROBLEM

**वाहतूककोंडीत पुणेकर 'दबले'**

१२

SOLUTION

## At a Glance

**प्रार्थनास्थळ कायद्याबाबत नवीन खंडपीठाची स्थापना**

**नवी दिल्ली :** १२ डिसेंबर रोजी सर्वोच्च न्यायालय प्रार्थनास्थळ कायदा (1991) च्या घटनात्मकतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी करणार आहे. यापूर्वी ही सुनावणी ५ डिसेंबरला होणार होती. त्यादिवशी सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार होती मात्र सुनावणीपूर्वीच खंडपीठ उठले.

**तीन दिवस राज्यावर पावसाचे सावट**

**मुंबई :** सध्या हवामानामुळे पुणे शहर आणि जिल्ह्यातही पुढील दोन दिवस हवामान कोरडे तर दुपारनंतर ढगाळ वातावरण राहील. जिल्ह्यातील काही भागातच्या पावसाच्या हलक्या सरी पडतील. शुक्रवारी दिवसभर ऊन आणि ढगाळ वातावरणाचा खेळ सुरू होता. कमाल व किमान तापमान स्थिर असल्यामुळे काल दिवसभर शहरात चांगलाच उकाडा जाणवत होता.
फेंगल » पान ४ वर

# अखेर वसुलीचे आदेश निघाले

## मोहिते-पाटील, परिचारक कुटुंबाला धक्का ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील बेकॅथिक कर्ज वाटप प्रकरणात आज अखेर विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांनी वसुलीचे आदेश जारी केले.

गेल्या महिनाभरापासून या मध्यवर्ती बँकेच्या बुडलेल्या 238 कोटी 43 लाख 999 रुपयाच्या कर्जाची चर्चा होती. जबाबदारी निश्चित केल्यानंतर या कर्जबुडव्यांवर काय कारवाई होणार? याबाबतचे उत्सुकता होती ? शपथविधी होताच राज्य सरकारने याबाबत कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून आज सहनिबंधक सुर्वे यांनी जाहीर केलेले आदेशामुळे ही प्रक्रिया सुरू झाल्याचे मानण्यात येते. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतील बेकायदेशीर कर्जवाटप प्रकरणात एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. 238 कोटींच्या बेयकादेशीर कर्ज वाटप प्रकरणात जबाबदार धरलेल्या तत्कालीन संचालक मंडळासह बँकेचे दोन अधिकारी, एका चार्टड अकाउंटटकडून वसुली करण्याचे आदेश काढण्यात आले आहेत. तत्कालीन संचालक मंडळातील 35 जणांकडून एकूण 238 कोटी 43 लाख 999 हजाराच्या बेकायदेशीर कर्जाची 12 टक्के व्याजासह वसुली करण्यासाठीचे आदेश विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांनी जारी केले आहेत. या आदेशामुळे बँकेचे तत्कालीन संचालक मंडळाचे सदस्य दिलीप सोपल, विजयसिंह मोहिते पाटील, दीपक आबा साळुंखे, राजन पाटील, रणजितसिंह » पान ४ वर

### कोणाकडून किती वसुली?

- दिलीपराव सोपल..... **३० कोटी २७,२८,१२२ रुपये**
- विजयसिंह मोहिते-पाटील..**३ कोटी ०५ लाख ५४रु**
- दीपक साळुंखे-पाटील.....**२० कोटी ७२ लाख ५१ रु**
- सुधाकरपंत परिचारक**११ कोटी ९३ लाख ६२७७ रु**
- प्रतापसिंह मोहिते-पाटील- **३ कोटी १४ लाख ६५,९४७**
- राजन पाटील ..... **३ कोटी ३४,२१,३५७ रुपये**
- संजय शिंदे .....**९ कोटी ८४,४४,७१९ रुपये**
- बबनराव शिंदे..... **३ कोटी ४९,२३,०४१ रुपये**
- दिलीप माने..... **११ कोटी ६३,३४,५६८ रुपये**
- रणजितसिंह मोहिते-पाटील..... **५५ लाख ५४ हजार**
- चांगोजीराव देशमुख..**एक कोटी ५१,२१,२२२ रुपये**
- एस. एम. पाटील.....**८ कोटी ७१,८७,६७८ रुपये**
- चंद्रकांत देशमुख.....**८ कोटी ४१,२९,३९९ रुपये**
- जयवंतराव जगताप..... **७ कोटी ३०,०३,५४२ रुपये**
- रामचंद्र वाघमारे.....**१ कोटी ४८,६७,५१६ रुपये**
- सिद्रामप्पा पाटील.....**१६ कोटी ९९,८०,३९३ रुपये**
- सुरेश हसापुरे ..... **८ कोटी ०३,०७,५५९ रुपये**
- बबनराव अवताडे.....**११ कोटी ४४,८१,४१२ रुपये**
- राजशेखर शिवदारे..... **१ कोटी ४८,६७,५१६ रुपये**
- अरुण कापसे ..... **२० कोटी ७४,७८,५१६ रुपये**
- संजय कांबळे..... **८ कोटी ४१,२९,३९९ रुपये**
- बहिरू वाघमारे..... **८ कोटी ४१,२९,३९९ रुपये**
- सुनील सातपुते..... **८ कोटी ४१,२९,३९९ रुपये**
- रामदास हक्के ..... **८ कोटी ४१,२९,३९९ रुपये**
- चांगदेव अभिवंत ..**१ कोटी ५१ लाख २१,२२२ रुपये**
- भर्तरीनाथ अभंग...**१ कोटी ५१ लाख २१,२२२ रुपये**
- विद्या बाबर .....**१ कोटी ५१,२१,२२२ रुपये**
- सुनंदा बाबर .....**१० कोटी ८४,७२,५५९ रुपये**
- रश्मी दिगंबरराव बागल.. **४३ लाख २६ हजार रुपये**
- नलिनी चंदेले ..... **८८ लाख ५८ हजार ६६३ रुपये**
- सुरेखा ताटे.....**१ कोटी ५१ लाख २१,२२२ रुपये**
- सुनीता बागल**१ कोटी ५१ लाख २१ हजार २२२ रुपये**
- किसन मोटे .....**५ लाख रुपये**
- के. आर. पाटील.....**५ लाख रुपये**

**एकूण- २३८ कोटी ४३ लाख ९९९ रुपये**

# गृहमंत्रीपद भाजपकडेच असायला हवे: फडणवीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती सरकारचा शपथविधी सोहळा होऊन दोन दिवस झाले तरी खातेवाटपाचा तिढा सुटलेला दिसत नाही. गृहमंत्रालयासाठी भाजपा आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्याचबरोबर यावरून शिंदे नाराज असल्याचेही बोलले जात आहे. यासाठी त्यांनी सरकारमध्ये सहभागी न होण्याची भूमिका घेतली होती. मात्र, भाजपा पक्षश्रेष्ठी व शिवसेना (शिंदे) आमदारांच्या दबावामुळे शिंदेंनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारले. आता खातेवाटप व गृहमंत्रालयाबाबत देवेंद्र फडणवीस यांनी मोठे विधान केले आहे.

फडणवीस म्हणाले, तसे बघायला गेले तर गृहमंत्रीपद आमच्याकडेच राहिले पाहिजे असे मला वाटते. परंतु, तसा काही हट्ट नाही. आजवर हे खाते आमच्याकडे राहिले आहे. आम्ही तिघेही एकत्रच आहोत. मात्र, गृहमंत्रीपद सांभाळत असताना केंद्र सरकारशी, केंद्रीय गृह मंत्रालयाशी समन्वय ठेवावा लागतो. महाराष्ट्रात नक्षलवादाची समस्या आहे. मुंबईसारखे मोठे शहर सांभाळायचे आहे. माझा भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाशी नेहमी संपर्क व चांगल्या प्रकारे समन्वय राखतो. एकनाथ शिंदे किंवा अजित पवार देखील ते करू शकतात, मात्र माझा केंद्रीय नेतृत्वाशी जास्तीत जास्त संबंध येतो. त्यामुळे गृहमंत्रालय हे भाजपकडेच » पान ४ वर

# ....तर मी आमदारकी सोडणार-जानकर

## ईव्हीएम : मारकडवाडी मतदानाच्या आकडेवारीत घोळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांनी मारकडवाडी गावात मतदानाच्या आकडेवारीत घोळ असल्याचे सांगून तिथे मतपत्रिकेवर मतदान घेण्याचा निर्णय घेतला होता.

मात्र निवडणूक आयोगाने यासाठी परवानगी दिली नाही, तसेच पोलीस प्रशासनाने हस्तक्षेप करत गावकऱ्यांचा हा प्रयत्न हाणून पाडला. यानंतर मारकडवाडी गाव हे देशभरात चर्चेत आले. त्यातच

**पुढील १५ दिवसांत मतपत्रिकेवर निवडणूक घेऊन राज्यात आणि देशात जे संशयाचे धुके निर्माण झाले आहे, ते बाजूला करावे असा आमचा प्रयत्न आहे. निवडणूक आयोगाला आम्ही पत्र देत आहोत. त्यांनी यासाठी होकार दिल्यानंतर मी राजीनामा देणार आहे. ईव्हीएमच्या विरोधात कुणीतरी बलिदान दिले पाहीजे. त्यासाठी मी तयार आहे", असेही उत्तमराव जानकर यावेळी म्हणाले.**
**— उत्तम जानकर** (आमदार)

### भाजपाचे पराभूत उमेदवारही तयार...

- यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले, "ईव्हीएमच्या विरोधासाठी शरद पवार आज ८ डिसेंबर मारकडवाडी येथे येणार आहेत. माझ्याविरोधात पराभूत झालेले भाजपाचे उमेदवार राम सातपुते आणि मी मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी आग्रही आहोत. त्यासाठी मी आमदारकीचा राजीनामा देणार आहे. निवडणूक आयोगाने मतपत्रिकेवर फेरमतदान घेण्याची परवानगी दिल्यास मी राजीनामा देऊन पुन्हा निवडणुकीला सामोरे जाण्यास तयार आहे.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी मारकडवाडीतून बॅलेट यात्रा सुरू करणार असल्याचीही चर्चा समोर आली. आता माळशिरसचे नवनियुक्त आमदार उत्तमराव जानकर यांनी आपली आमदारकी सोडण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

९ डिसेंबर पर्यंत विधीमंडळाचे विशेष अधिवेशन पार पडणार आहे. यासाठी सर्व आमदार मुंबईत आले असून २८८ आमदारांचे शपथविधी पार पडणार आहेत.

## नवनिर्वाचित आमदारांनी घेतली शपथ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महायुती सरकारचा शपथविधी सोहळा अखेर संपन्न झाला असून तीन मंत्र्यांचे सरकार आता कामाला लागले आहे. ५ डिसेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानावर मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी शपथ घेतली. पाठोपाठ, विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले असून विधान भवनात नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी संपन्न झाला आहे. मात्र या शपथविधीला विरोधी आमदारांनी बहिष्कार घातला आहे.

# नवीन 'नगर परिषद' महापालिकेच्या अंगलट येण्याची चिन्हे ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महायुती सरकारने देवाची उरूळी आणि फुरसुंगी ही दोन गावे महापालिका हद्दीतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. नगर परिषद स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून महापालिकेकडून तशी माहिती व अधिकार देखिल सोपविण्यास सुरूवात झाली आहे. ही गावे वगळताना देवाची उरूळी येथे असलेला महापालिकेचा कचरा डेपो हा महापालिकेच्या हद्दीतच ठेवण्यात आला आहे. ही बाबच पुढील काळात महापालिकेला अडचणीची ठरणार असून शासन यासंदर्भात काय निर्णय घेणार याची उत्सुकता वाढली आहे. देवाची उरूळी आणि फुरसुंगी या दोन गावांचा समावेश असलेली नवीन 'नगर परिषद' महापालिकेच्या अंगलट येण्याची चिन्हे आहेत. प्रामुख्याने या प्रस्तावीत नगर परिषदेत असलेल्या महापालिकेच्या 'कचरा' डेपोमुळे होणाऱ्या त्रासाच्या बदल्यात महापालिकेकडून 'निधी' मिळविण्यासाठी चाचपणी सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात शुक्रवारी झालेल्या बैठकीमध्ये याचे » पान ४ वर



### स्वतंत्र सत्तास्थाने निर्माण होणार

- महापालिका आणि देवाची उरूळी व फुरसुंगी नगर परिषदेत येत्या काळात निवडणुका होउन स्वतंत्र सत्तास्थाने निर्माण होणार आहेत. अशातच महापालिकेचा कचरा डेपो नगर परिषदेच्या हद्दीत राहिल्यास त्या बदल्यात महापालिकेकडून नगर परिषदेला काही देणी द्यावीच लागणार आहेत. राजकियदृष्ट्या सत्तास्थाने भिन्न विचाराची आल्यास या मागण्यांवरून वाद होण्याची शक्यता असल्याचे दिसून येत आहे.

## मनी लाँड्रिंग प्रकरणी ईडीचे छापे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मालेगाव :** मालेगाव येथील सहकारी बँकेतील कथित गैरव्यवहाराशी संबंधित मनी लाँड्रिंगच्या तपासासंदर्भात सक्तवसुली संचालनालयाने शुक्रवारी पुन्हा छापे टाकून १३.५ कोटी रुपयांची रोकड जप्त केली. केंद्रीय तपास यंत्रणेने दिवसभरात अहमदाबाद आणि मुंबईतील सात ठिकाणांवर छापे टाकले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, १३.५ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेतील विविध व्यक्तींच्या बँक खात्यांचा गैरवापर करून १०० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे व्यवहार केल्याप्रकरणी मालेगाव येथील व्यापारी सिराज अहमद हारून मेमन याच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणात ईडीने गेल्या महिन्यात » पान ४ वर

# पुण्यात पहिल्यांदाच 'बालरंगभूमी संमेलन'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बालरंगभूमी परिषद, मध्यवर्ती मुंबई आयोजित 'बालरंगभूमी संमेलन' पुणे येथील अण्णाभाऊ साठे स्मारक बिबवेवाडी येथे दिनांक २०,२१ व २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात येणार आहे. असल्याची घोषणा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री अँड निलम शिर्के सामंत यांनी केली.

शिक्षण हा बालकाचा अधिकार आहे आणि कलाशिक्षण बालकांच्या व्यक्तिमत्व विकासाची गरज आहे. बालकांच्या मनोरंजनासाठी व प्रबोधनासाठी बालरंगभूमी परिषद सातत्याने कार्यरत आहे. नृत्य, नाट्य, गायन, वादन या रंगमंचीय कलांसोबत लहान मुलांना रमवणारे बाहुल्यांचे खेळ, जादूचे खेळ, शेंडो प्ले, जगलरी, इत्यादी खेळ बालरंगभूमीच्या कक्षेत येतात. मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या रंगमंचीय कलेचा, खेळांचा.. प्रचार आणि प्रसार करण्याचे उद्दिष्ट घेऊन वाटचाल करीत असलेल्या बालरंगभूमी परिषदेचे कार्य महाराष्ट्रभर २८ शाखांच्या माध्यमातून होत आहे. या शाखांचे कार्य व बालकलावंतांना राज्यस्तरावर व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने पहिल्या बालरंगभूमी संमेलनाचे आयोजन दि. २० ते २२ डिसेंबर दरम्यान पुणे येथे आयोजन करण्यात येणार असल्याचे बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अँड. नीलम शिर्के सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी बोलतांना त्यांनी बालरंगभूमी संमेलनाचे उद्दिष्ट या संमेलनात सादर होणारे राज्यभरातील बालकलावंत व दिव्यांग बालकलावंतांच्या कार्यक्रमाची माहिती दिली. बालरंगभूमी संमेलनाध्यक्षपदी सिने-नाट्य अभिनेते मोहन जोशी यांचे नाव निश्चित झाले असून, संमेलनाचे उद्घाटन जेष्ठ अभिनेते डॉ मोहन आगाशे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, अजित भुरे, अभिनेते व सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष विजय गोखले, सविता मालपेकर, सुबोध भावे यांच्यासह नाट्य व बालनाट्य क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तसेच संमेलन समारोप व पुरस्कार सोहळा दिनांक २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार असून या प्रसंगी बालरंगभूमी परिषद पुरस्कार जेष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना देण्यात येणार आहे. याप्रसंगी डॉ मोहन आगाशे सचिन पिळगावकर, मोहन जोशी, गंगाराम गव्हाणकर, प्रियदर्शनी » पान ४ वर

## समाजवादी पक्ष महाविकास आघाडीतून बाहेर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत दारूण पराभवाला सामोरे जाणाऱ्या महाविकास आघाडीच्या जखमेवर मीठ चोळणारी माहिती समोर आली आहे. मित्र पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. बाबरी मशीद विध्वंसाबाबत शिवसेनेच्या भूमिकेमुळे समाजवादी पक्षाने हा निर्णय घेतला, अशी माहिती समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अबू आझमी यांनी दिली. नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीसाठी आजपासून तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले. विधिमंडळाच्या कामकाजाला सुरुवात होताच » पान ४ वर

### इन्कम टॅक्स विभागाने मुक्त केली हजारो कोटींची मालमत्ता

# अजित पवारांना दिलासा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाच्या महायुती सरकारमध्ये दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना मोठा दिलासा मिळाला आहे. प्राप्तिकर विभागानं २०२१ मध्ये जप्त केलेली त्यांची १ हजार कोटींहून अधिक किमतीची मालमत्ता मुक्त केली आहे. बेनामी मालमत्ता व्यवहार प्रतिबंधक अपीलीय न्यायाधिकरणानं अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांवरील आरोप फेटाळल्यानंतर इन्कम टॅक्सने हा निर्णय घेतला आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी समारंभात शिवसेनेचे एकनाथ शिंदे यांच्यासह पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी हा निर्णय घेण्यात आला.

आयटी विभागाने ७ ऑक्टोबर २०२१ रोजी अजित पवार आणि त्यांच्या कुटुंबाशी संबंधित अनेक ठिकाणांवर छापे टाकले होते. अजित पवार व त्यांच्या कुटुंबीयांनी बेनामी मालमत्ता जमा केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या प्रकरणात साताऱ्यातील साखर कारखाना, दिल्लीतील फ्लॅट आणि गोव्यातील रिसॉर्टसह अनेक मालमत्ता जप्त करण्यात आल्या होत्या.

आता या प्रकरणात ट्विस्ट आला आहे. अजित पवार यांच्या नावावर कोणत्याही मालमत्तेची नोंद नसल्याचे तपासात समोर आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नव्याने उपाययोजना !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिवसेंदिवस शाळेतील विद्यार्थीनींचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येत आहे. विद्यार्थीनींच्या सुरक्षेसाठी आता शिक्षण विभागही सरसावला आहे. राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नव्याने उपाययोजना राबवण्यासाठी धोरण तयार करण्यात आले आहे.

त्यानुसार शाळांच्या प्रसाधनगृहांमध्ये गजर, शाळा परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली असणे, तक्रार पेटी अशा तरतुदींचा त्यात समावेश असून, शाळा व्यवस्थापनाने शाळा स्तरावर तातडीने संबंधित उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी यांनी या बाबत माहिती दिली. राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत धोरण निश्चित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या सेवानिवृत्त न्यायाधीश साधना जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक झाली. या बैठकीत समितीने मान्यताप्राप्त शाळांनी तातडीने करायच्या उपाययोजनांबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने शालेय » पान ४ वर

# मॉलमधील 'मल्टिप्लेक्स'चा व्यवसाय घटला... !

### धोक्याची घंटा

**संपूर्ण देशभरात मॉल विकासक कंपन्यांसमोर आलेल्या एका नव्या सर्वेक्षणीय धोक्याची घंटा वाजविली आहे, भारतभरात मॉलमधील चित्रपटगृहात प्रदर्शित होणाऱ्या बॉक्स ऑफिसची कमाई तब्बल 5000 कोटींनी घटली असल्याचे सर्वेक्षण समोर आले आहे. प्रामुख्याने मुंबई आणि पुणे सारख्या शहरांमध्ये हा फटका प्रकाशाने जाणवत असल्याचे यात नोंदविण्यात आले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्कॅनिल्कने नोंदविलेल्या वृत्तानुसार नोव्हेंबर २०२४ पर्यंत चित्रपटांची बॉक्स ऑफिसवरची कमाई ही ७,८११ कोटी रुपयांच्या घरात आहे २०२३मध्ये हाच आकडा १३१६१ कोटी रुपये होता.

पुण्यासारख्या शहरांमध्ये मल्टिप्लेक्स मध्ये जात असताना केवळ मनोरंजन आणि खाना पिना तसेच त्याला जोडून असणाऱ्या मॉलमध्ये खरेदी हा उद्देश असायचा पण २०२४ हे मल्टिप्लेक्स आणि एकंदरीत मॉल साठी धोक्याची घंटा ठरलं बरेचसे ग्राहक हे मॉलमध्ये गेल्यानंतर चित्रपट पाहायला पसंती

देतातच असे नाही. मॉलचा वापर केवळ खरेदी आणि अन्य काही मनोरंजनाच्या सोयी सुविधा निर्माण झाल्याने त्याचा उपभोग घेणे याकडे वाढलेला दिसत आहे.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

पूर्वी मॉलमध्ये फक्त चित्रपट गृह हे एकमेव मनोरंजनाचे साधन होते परंतु आता टेम्पलिंग पार्क, लहान मुलांचे खेळणे, डिजिटल झोन प्रौढ व्यक्तींसाठी देखील अनेक मनोरंजनाचे आणि वेळ घालविण्याचे साधने मॉलमध्ये उपलब्ध आहे त्यावर चित्रपटगृहांकडे ओढा कमी असल्याचे दिसते. २०२५ मध्ये येणारे मॉल्स हे वेगळ्या पद्धतीचे असतील तेथे चित्रपटगृहांना अवाढव्य जागा देण्याऐवजी इतर सोयी सुविधांना देखिल प्राधान्य असेल असे बांधकाम व्यावसायिकांमध्ये मानले जाते.

भारतात मॉल विकासक कंपन्यांसमोर नवीन आव्हान उभे ठाकले. स्कॅनिल्कच्या वृत्तानुसार नोव्हेंबर २०२४ पर्यंत चित्रपटांची बॉक्स ऑफिसवरची कमाई ही ७,८११ कोटी रुपयांच्या घरात आहे. तर २०२३ मध्ये हाच आकडा १३,१६१ कोटी रुपये होता. मुंबई, पुण्यातील मॉलमध्ये एक तरी मल्टीप्लेक्स आहेच. या मॉलमध्ये जाण्याचा उद्देशच हा मनोरंजन, खाणे- पिणे आणि खरेदी असा असायचा. पण २०२४ हे वर्ष मल्टीप्लेक्स आणि एकंदरित मॉलसाठी धोक्याची घंटा ठरले. जसे माणूस जगण्यासाठी परिस्थितीनुसार बदलतो तसंच आता मॉल बांधणाऱ्या आणि त्या कार्यान्वयीत ठेवणाऱ्या कंपन्यांचे झाले आहे.

**या मॉलच्या बदलेल्या समीकरणाकडे आम्ही हा एक तात्पुरता टप्पा म्हणून पाहतो आणि भविष्यात सुद्धा मल्टीप्लेक्सची पडझड दिसणार नाही, मल्टिप्लेक्स हे संपूर्ण कौटुंबिक मनोरंजनाच साधन आहे. मल्टीप्लेक्सचा अनुभव इतर कोणत्याही गोष्टीने बदलला जाऊ शकत नाही. कोणत्याही मॉलच्या यशामध्ये रेस्टॉरंट्स आणि मल्टीप्लेक्सचे योग्य मिश्रण खूप महत्त्वाची भूमिका बजावते. — अजय अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक, ब्रह्माकॉर्प लिमिटेड**

## सतरा वर्षातील वीस प्रभारी अध्यक्षांचा फटका; संचलन तूट ९०० कोटींवर

# 'पीएमपीएमएल'चे आर्थिक चाक 'पंक्चर'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तत्कालीन पीएमटी आणि पीसीएमटीचे एकत्रीकरण केल्यानंतरही पुणेकर प्रवाशांची 'लाईफलाईन' असलेल्या या संस्थेला पूर्णवेळ अध्यक्ष देण्यास राज्य शासनाला सपशेल अपयश आले आहे, विशेष म्हणजे पीएमपीएमएलची स्थापना झाल्यापासून आतापर्यंत तब्बल वीस अध्यक्षांची 'बदली' झाली आहे. त्यामुळे तुटपुंजे उत्पन्न मिळत असतानाही संचलन तूट तब्बल ९०० कोटी रुपयांवर गेली आहे, त्यातूनच या संस्थेचे आर्थिक चाक ' पंक्चर' झाले आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड दोन्ही शहरांत पीएमपीच्या सुमारे १,७०० बस धावतात. तर वार्षिक खर्च सुमारे १२०० ते १३०० कोटींच्या आसपास आहे. तर, मिळणारे उत्पन्न हे ६०० कोटी रुपयांच्या आसपास आहे. त्यामुळे ७०० कोटींची संचलन तूट भरून द्यावी लागते. त्यातच स्थापनेपासून आतापर्यंत २० हून अधिक संचालक झाले आहेत, पण

### खर्च सोसेना, आता 'भार' प्रवाशांवर

- या पूर्वी २०१६ मध्ये पीएमपीची तिकीटवाढ झाली होती. याबाबत लवकरच महापालिकेकडून पीएमपी प्रशासनासमोर हा मुद्दा मांडला जाणार असल्याचेही सूत्रांनी स्पष्ट केले. २०१६ मध्ये ही संचलन तूट २१० कोटींची होती, ती २०२३-२४ मध्ये ७०६ कोटींवर गेली आहे. तर २०२४-२५ या वर्षात ही ८५० कोटींच्या वर जाण्याची शक्यता आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकांच्या परिवहन सेवेचे एकत्रीकरण करून पीएमपीएमएल ही दोन्ही शहरांसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्यात आली.

त्यातील एकही पूर्णवेळ झालेला नाही. त्यामुळे पीएमपीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ध्येयधोरणे राबविणारी कोणतीही यंत्रणा नाही. त्याचा परिणाम उत्पन्नावर होत आहे. त्यामुळे शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचा कणा असलेली 'पीएमपीएमएल'ची संचलन तूट सुमारे नऊशे कोटींच्या घरात पोहचली आहे. ती भरून देण्याची जबाबदारी पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांवर आहे. आता या संचलन तुटीचा ताण येत असल्याने पीएमपी बसचे तिकीट दरवाढ करण्याबाबत प्रशासकीय पातळीवर चर्चा आहे.

त्यानंतर या कंपनीला आर्थिक हातभार म्हणून दोन्ही महापालिकांनी या कंपनीची संचलन तूट देण्याचे आदेश राज्यशासनाने काढले. त्यानुसार संचलन तुटीचा ६० टक्के हिस्सा पुणे, तर ४० टक्के हिस्सा पिंपरी चिंचवड महापालिकेने देणे बंधनकारक आहे. ही कंपनी स्थापन झालेल्या वर्षी ही संचलन तूट १७ कोटी होती. ती आता ८५० ( अंदाजित) कोटींवर गेली आहे. दरम्यान, पीएमपी मध्ये नुकतेच १,२०० कर्मचारी कायम करण्यात आले असून त्यांना सातवा वेतन आयोगही लागू करण्यात आला आहे. परिणामी खर्च वाढल्याचे प्रशासनाचे मत आहे.

गेल्या काही वर्षांत राजकीय नेत्यांच्या आग्रहाखातर पीएमपीची सेवा जिल्ह्यातील ग्रामीण भागातही सुरू करण्यात आली आहे.

> पीएमपीएमएल ही पुणेकर प्रवाशांची जीवनवाहिनी समजली जात आहे, त्यामुळे या महत्वाच्या संस्थेवर राज्य शासनाने पूर्णवेळ अध्यक्ष देण्याची गरज होती. मात्र; त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप झाला आहे. त्यामुळेच या संस्थेच्या विकासाचा ' मार्ग' च बदलला असून या संस्थेला पूर्णवेळ अध्यक्ष देण्यास राज्य शासनाला सपशेल अपयश आले आहे, त्यातूनच सर्व राज्यकर्त्यांवर नामुष्की ओढवली आहे. त्याचा जोरदार फटका पुणेकर नागरिकांना सहन करावा लागत आहे, त्यामुळे ही परिस्थिती सुधारण्यासाठी आता शासनाने कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे.
>
>
>
> **— राजेंद्र खराडे,**
> अध्यक्ष पीएमटी कामगार संघ (इंटक)

## पुण्यात काय घडतंय...

### वि.वि.द. संगीत समारोहाच्या निमित्त विविध कार्यक्रम

- **सत्र पहिले :** नम्रता गायकवाड: शहनाई वादन, गायत्री जोशी: गायन, अभिषेक शिनकर: स्वतंत्र संवादिनी वादन,आदित्य मोडक: गायन- वेळ: सकाळी-८
- **सत्र दुसरे :** जयंत केजकर: गायन, अभिषेक बोरकर : सरोद वादन, ओजस आढिया : एकल तबला वादन. वेळ- दुपारी- १.३०
- **सत्र तिसरे :** अनन्या गोविंप्रीकर : कथक, रमाकांत गायकवाड: गायन, शाकीर खान: सतार वादन, आदित्य खांडवे : गायन. वेळ- सांय. ५.३०.
- **कुठे :** विष्णु विनायक स्वरमंदिर, गांधर्व महाविद्यालय, शनिवार पेठ
- **कधी :** ८ डिसेंबर, सकाळी ८ ते रात्री १०
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी खुला

### चिदानंद फौंडेशनतर्फे पुरस्कार वितरण

- **कार्यक्रमाचे अध्यक्ष :** अच्युत गोडबोले
- **प्रमुख उपस्थिती :** ज्येष्ठ विधीज्ञ रोहित एरंडे, सामाजिक कार्यकर्ते विवेक वेलणकर
- **पुरस्कारार्थी :** प्रिझम फौंडेशन, उमेद परिवार, सेवा सहयोग संचलित चेतना फौंडेशन, सहयोग गोशाळा (अलिबाग)
- **आयोजक :** नेहा वैजापूरकर, चिंतामणी वैजापूरकर
- **कुठे :** म.ए. सो. भावे प्राथमिक शाळेचे सभागृह, गणेश हॉल, टिळक स्मारक- पेरुगेट रस्ता
- **कधी :** ८ डिसेंबर, सांयकाळी- ५.३०

### चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार सोहळा

- **पुरस्कारार्थी :** ज्येष्ठ हास्यचित्रकार शि.द. फडणीस
- **प्रमुख उपस्थिती :** डॉ. विनय सहस्रबुध्दे, दिपक घैसास, डॉ. सागर देशपांडे, सागर दर्शने, धनश्री लेले, सुधीर जोगळेकर
- **नृत्यवंदना :** शर्वरी जमेनिस आणि सहकलाकार
- **सूत्रसंचालन :** राहूल सोलापूरकर
- **कुठे :** बालगंधर्व रंगमंदिर, शिवाजीनगर
- **कधी :** ८ डिसेंबर, सांयकाळी- ५.३०

### तेजज्ञान फौंडेशनच्या रौप्यमहोत्सवानिमित्त 'ज्ञान महोत्सव'

- **प्रमुख उपस्थिती :** डॉ. विजय भटकर, अभिनेता सोनू सुद
- **कुठे :** मनन आश्रम, सणसनगर, नांदोशी, किरकटवाडी, सिंहगड रस्ता
- **कधी :** ८ डिसेंबर, सकाळी १०.३०

### सामुदायिक गीता पठण

- **आयोजक:** श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्ट
- **कुठे :** श्री दत्त कला मंच उत्सव मंडप, श्री दत्त मंदिर प्रांगण, बुधवार पेठ
- **कधी :** ८ डिसेंबर, सकाळी ८ ते ११.३०
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी खुला

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

- **आयोजक:** अखिल म्हसोबा उत्सव मंडई ट्रस्ट
- **हस्ते:** अमितेश कुमार (पोलीस आयुक्त, पुणे), पुनीत बालन ( अध्यक्ष पुनीत बालन ग्रुप)
- **प्रमुख उपस्थिती:** प्रा. पराग काळकर (प्र. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ), रमनशेठ लुंकड ( संचालक आर. के. लुंकड हौसिंग कार्पो. लि.), ॲड. एस. के. जैन (चेअरमन, शिक्षण प्रसारक मंडळी), सुनिल रासने ( अध्यक्ष, दगडूशेठ सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्ट)
- **कुठे :** मंडई म्हसोबा चौक, बुरूड आळी, पुणे
- **कधी :** ८ डिसेंबर, संध्याकाळी ७ वा.

## आता कार्यकर्त्यांमध्येच रस्सीखेच

# पालकमंत्रिपदावरून आता पुण्यात 'दादाशाही'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे, त्यामुळे शहर आणि जिल्ह्यात आपल्याच पक्षाचा दबदबा निर्माण करण्यासाठी सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपाच्या नेत्यांनी नव्हे तर कार्यकर्त्यांनी पालकमंत्रीपदासाठी चक्क रस्सीखेच सुरु केली आहे. त्यासाठी हे कार्यकर्ते आता उघडपणे वक्तव्य करु लागले आहेत, त्यामुळे पुण्याच्या पालकमंत्रीपदासाठी कार्यकर्त्यांमध्ये ' दादाशाही' सुरु झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुण्याच्या पालकमंत्रिपदावरून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ( अजितदादा पवार ) रस्सीखेच सुरू झाली आहे. त्यामुळे अजित पवार की चंद्रकांतपाटील, पुण्याचा 'दादा' कोण होणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.२००४ पासून अजितदादा पवार हे पुणे शहरासाठी आणि जिल्ह्यासाठी सक्रीय आहेत. त्यांना जिल्ह्यातील राजकीय आणि प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. त्यांची प्रशासनावर मोठी पकड देखील आहे. त्यामुळे अजितदादांना पालकमंत्री करावे, अशी मागणी राष्ट्रवादीचे ( अजितदादा पवार ) जिल्ह्याध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी केली आहे.

दुसरीकडे भाजप नेते, कार्यकर्तेही पालकमंत्रिपदासाठी आग्रही असल्याचं दिसून येते. पुण्यात भाजपचे आमदारही मोठ्या प्रमाणात निवडून आले आहेत.

> माझे श्रेष्ठी जे सांगतील ते मी करतो. कार्यकर्त्यांचं काय, तर नेता देखील आपल्याला अधिकाधिक चांगलं मिळावं, अशी इच्छा व्यक्त करतो. पण, आपल्या सगळ्याच इच्छा पूर्ण होत नसतात."अनेक सहयोगी पक्ष सोबत घेऊन जायचं असते, तेव्हा नेहमीच समजूतदारपणा दाखवायचा असतो. भविष्यात काय दडलं आहे, याबद्दल मला माहिती नाही."
>
> **— आ. चंद्रकांतदादा पाटील**

त्यामुळे जिल्ह्याचे पालकत्त्व भाजपकडे राहिल्यास कामे मार्गी लावण्यासाठी कुठलीही अडचण येणार नाही, असं कार्यकर्त्यांना वाटते.

**राजकीय**

यापुर्वी पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर पुण्याचे पालकमंत्रिपद चर्चेत आले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यांची बाजू भक्कम करण्यासाठी बैठकांचा सपाटा लावत समस्या सोडविण्यासाठी, विकास प्रकल्पांचा गती देण्यासाठी जोर लावला. तर दुसरीकडे अजित पवार यांनीही व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठका घेतल्या

# आता पुन्हा पोस्टाचा 'आधार'

## खातेदारांना नोटीसा बजाविण्याची जबाबदारी डाक विभागावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मालमत्ता पत्रिकेवरील झालेल्या फेरफार नोंदीच्या नोटिसा नोंद करणाऱ्या अर्जदारांसह पत्रिकेवरील सर्व खातेदारांना त्याची नोटीस बजावण्याची जबाबदारी आता पोस्ट कार्यालयावरच टाकण्यात आली आहे. नोटीस न मिळाल्यास हरकत घेण्यापासून वंचित राहणाऱ्यांचे प्रमाण कमी होऊन खातेदारांना फेरफार कशी झाली हे कळू शकणार आहे. राज्यातील असा पहिलाच प्रयोग पुणे शहरात सुरु करण्यात आला आहे. येत्या आठवडाभरात हा प्रयोग सबंध पुणे जिल्ह्यात व १ जानेवारीनंतर सबंध राज्यात लागू करण्यात येणार आहे.

मालमत्ता पत्रिकेवरील झालेल्या फेरफार नोंदीच्या नोटिसा आता संबंधित खातेदारांना हमखास पोहोचणार आहेत. भूमिअभिलेख विभागाने यासाठी पोस्टासोबत एकत्रीकरण प्रक्रिया केली असून भूमिअभिलेख विभागाकडून या नोटिसा ऑनलाइनच पोस्टाकडे हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

राज्यात मिळकत पत्रिकेत अर्थात प्रॉपर्टीकार्डावर फेरफार करण्याची सुमारे ४ लाख प्रकरणे वर्षभरात केली जातात. त्यापैकी सुमारे ७० टक्के अर्थात ३ लाख प्रकरणे प्रमाणित केले जातात. पत्रिकेवरील नोंद प्रमाणित करण्यासाठी प्रत्येक पत्रिकेवरील किमान चारजणांना भूमिअभिलेख विभागाकडून नोटीस बजावल्या जातात. अशा नोटिसांची संख्या वर्षाला १२ ते १५ लाख होते.

अनेकदा नजरचुकीने काही खातेदारांना नोटीस बजावल जात नसल्याचे प्रकारही घडतात.

### खातेदारांना घेता येणार हरकत

- नोंद प्रमाणित करण्यासाठी नोटीस बजावल्यानंतर १५ दिवसांचा अवधी देण्यात येतो. खातेदाराला या अवधीत नोटीस मिळाल्यास तो त्यावर हरकत घेऊ शकतो. मात्र, नोटीस न मिळाल्यास सामाईक मिळकतपत्रिकेत फेरफार करणारा अर्जदार ही नोंद प्रमाणित करून घेत होता. अशावेळी संबंधित खातेदार फेरफारविषयी अनभिज्ञ राहत होता. त्यावर नंतर त्याला हरकत घेता येत नव्हती. सर्व त्रुटी आता दूर होतील, अशी माहिती भूमिअभिलेख विभागातील सूत्रांनी दिली.

## मार्गशीर्षमुळे खाण्याच्या पानांची मागणी वाढली

**पुणे :** मार्गशीर्ष महिन्यात पूजेसाठी पानांची मागणी वाढली असून उठावही होऊ लागला आहे. त्यामुळे गेल्या आठवड्यापासून पानांच्या दरात वाढ झाली आहे. मंगळवार, बुधवार आणि गुरुवार या दिवशी पानांना मोठी मागणी असते. त्यामुळे शुक्रवार, शनिवार, रविवार आणि सोमवार या चार दिवसांत पानांच्या काढणीचे नियोजन शेतकरी करतात. सध्या पानांच्या प्रति डागासाठी ५०० ते ७०० रुपयांनी वाढ झाली आहे.

गेल्या आठवड्यापासून पानांच्या प्रति डागासाठी ५०० ते ७०० रुपयांची वाढ झाली आहे. हे दर येत्या महिनाभर दर टिकून राहतील, असा अंदाज पान उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# संपले आयुर्मान; आता रस्त्यावर नो एन्ट्री; वाहने करणार स्क्रॅप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** व्हेईकल स्क्रॅपिंग पॉलिसी २०२१ अंतर्गत जुन्या वाहनांबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासकीय कार्यालयांतील १५ वर्षे पूर्ण झालेली जुनी वाहने स्क्रॅप केली जाणार आहेत. त्यानुसार मागील काही वर्षांपासून ही प्रक्रिया राबविली जाते. १५वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान असलेली राज्यभरातील जवळपास १३ हजार वाहने 'स्क्रॅप' करण्यात येणार असून, यामध्ये पुणे शहरातील एक हजार २६५ वाहनांचा समावेश आहे. ही वाहने येत्या डिसेंबरअखेरपर्यंत 'स्क्रॅप' केली जाणार आहेत. ज्या शासकीय वाहनांकडे अशा वाहनांची संख्या अत्यल्प आहे, त्यांची प्रक्रिया आरटीओकडून केली जाणार आहे.

सद्यःस्थितीतील राज्यभरातील विविध शासकीय कार्यालयांत १३ हजार वाहने १५ वर्षांपुढील आहेत. त्यांचे आयुर्मान संपले आहे. यामध्ये पुणे शहरातील एक हजार २६५ वाहनांचा समावेश असून, येत्या डिसेंबरअखेरपर्यंत ही वाहने स्क्रॅप करण्यात येणार आहेत. संबंधित कार्यालयांना त्यांच्याकडील आयुर्मान संपलेल्या वाहनांची माहिती 'एमएसटीसी' या पोर्टलवर भरावी लागणार आहे. यामध्ये गाडीचा नंबर, फोटो आणि इतर संपूर्ण माहिती ऑनलाइन अपलोड करावी लागेल.

> सरकारी कार्यालयांतील 15 वर्षे पूर्ण झालेली वाहने दरवर्षी 'स्क्रॅप' केली जातात. यंदा शहरात अशी 1200 वाहने आहेत. ती स्क्रॅप करण्यात येणार आहेत, त्याबाबतची प्रक्रिया येत्या काही दिवसांमध्येच सुरु करण्यात येणार आहे."
>
> **— स्वप्नील भोसले,**
> उपप्रादेशिक परिवहन अधिकारी

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त विश्रांतवाडीत व्याख्यानमाला संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**येरवडा :** बहुजन हिताय संघ, प्रबुद्ध प्रेरणा विहार,विद्यानगर येथे संविधान दिन ते डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन या कालावधीत गेली 25 वर्ष परिवर्तन व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते.या वर्षीही या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले.या व्याख्यानमालेमध्ये, पुणे शहरातील विविध संस्था आणि संघटना सहभागी झाल्या होत्या.

त्यामध्ये धम्मचारी मैत्रेयनाथ यांचे भारतीय संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका,. संदीप सोनवणे यांचे युगप्रवर्तक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा दीक्षा समारंभ, धनराज जावळे सर यांचे डॉ. बाबासाहेबांचे धर्मांतरानंतरचे भाषण, अक्षय गायकवाड यांचे आर्य, अनार्य ते भारतीय अशी अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सकाळी उपासकांची मनोगते व संध्याकाळी सहा वाजता कँडल मार्चच्या माध्यमातून बाबासाहेबांना अभिवादन. या सर्व कार्यक्रमासाठी विहाराचे अध्यक्ष अशोक औचरे, विश्वस्त सेक्रेटरी महेंद्र जाधव, रमेश मोहोड, बहुजन हिताय महिला संघ,सर्व उपासक उपासिका, कार्यकारिणी, यासर्व कार्यक्रमामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.आनंद कांबळे, सुबोध कांबळे, जगदीश गाणार, सुधीर सरोदे, शिवनाथ मोरे, सुभाष गायकवाड, शैलेश ओव्हाळ,विजय अदमाने, माधव सुरवसे, गोजरताई जेटीथोर,इंदूताई फुलमाळी, सम्यक युवक विकास संस्था, संघमित्र प्रेरणा विहार या सर्वांचे बहुमोल योगदान मिळाले.

# ऑनलाइन सेवा विनाअडचण उपलब्ध करून द्या- डॉ. दिवसे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या सर्व ऑनलाइन सेवा विनाअडचण नागरिकांना उपलब्ध करून द्याव्यात. जे तलाठी, मंडल अधिकारी या सेवा देताना कामात कुचराई करतील, अशांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिला.

ई फेरफार, ई हक्क, ईचावडी, ईपीक पाहणी, ॲग्रीस्टॅक, कजाप नोंदी, ईक्यूजे कोर्ट व महाखनिज या ऑनलाइन प्रकल्पांबाबत आढावा व मंडळ अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालय येथे झाले. त्या वेळी ते बोलत होते.

**इशारा**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुहास मापारी, ई- फेरफार प्रकल्प राज्य संचालक सरिता नरके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे, सर्व प्रांताधिकारी तहसीलदार व अन्य अधिकारी उपस्थित होते. या वेळी जिल्ह्यातील सुमारे १५० मंडल अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.

### चंपाषष्ठीनिमित्त स्वरुपा परिवाराने सजविले हुबेहूब खंडोबा देवस्थान

# कसब्यात घुमला येळकोट... येळकोटचा जयघोष...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जुन्या पुण्यातील वाडा संस्कृती ते नव्या इमारतीपर्यंत यशस्वीतेचा प्रवास १० बाय १० फूट आकारातील रेखीव सजावटीतून कसबा पेठेत साकारण्यात आला आहे. शिंदे परिवार तर्फे ४४५ कसबा पेठ नवदीप मंडळ येथील श्री खंडोबा देवस्थान येथे ही सुरेख प्रतिकृती साकारण्यात आली आहे. यावेळी यळकोट यळकोट जय मल्हारचा जयघोष केला.

चंपाषष्ठी निमित्त स्वरूपा परिवार यांचे वतीने ही प्रतिकृती

> चंपाषष्ठी निमित्त स्वरूपा परिवार यांचे वतीने पुण्यातील वाडा संस्कृती ते नव्या इमारतीपर्यंत यशस्वीतेचा प्रवास १० बाय १० फूट आकारातील रेखीव सजावटीतून कसबा पेठेत साकारण्यात आला आहे. शिंदे परिवार तर्फे नवदीप मंडळ येथील श्री खंडोबा देवस्थान येथे ही सुरेख प्रतिकृती साकारण्यात आली आहे.

व फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. परिवाराचे संस्थापक तुषार शिंदे यांची संकल्पना असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव प्रमुख शिवेन शिंदे, व प्रसाद कारंजकर, अभि निजामपूरकर, ओंकार कवळे, गणेश चव्हाण, श्रीनिवास सातव,विशाल दाभेकर, ज्ञानेश्वर पवार, रविंद्र शिंदे, श्रीनिवास टेमगिरे, प्रतीक भुजबळ, नितीन होले यांनी विशेष परिश्रम घेतले.

तुषार शिंदे म्हणाले, हा वाडा ८४ वर्षांपासून इथे अस्तित्वात असून खंडोबाचा उत्सव आम्ही सन २००७ पासून साजरा करतो. यंदा आमचा शिंदे परिवाराचा खंडोबाचा कृपने झालेला वाडा संस्कृती ते नव्या इमारतीपर्यंतचा यशस्वी प्रवास प्रतिकृतीच्या माध्यमातून मांडला आहे. यामध्ये वाडयातील सर्व खोल्या, चौक, जिने यापासून ते सुसज्ज इमारत हुबेहूब साकारण्यात आली आहे.

तसेच श्री क्षेत्र खंडोबा देवस्थान, पाल (पेंबर) येथील प्रवेशद्वार व मंदिर देखील साकारण्यात आले आहे. तब्बल १५-२० दिवसांपासून आम्ही प्रतिकृतीसाठी तयारी केली. चंपाषष्ठी निमित्ताने असंख्य भाविकानी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. दिवसभरात श्रींचा अभिषेक, भजन, श्री सत्यनारायण पूजा व इतर धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

#रा

**महाराष्ट्राचे नुतन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचारसभांमध्ये आपण आधुनिक अभिमन्यू आहोत, असे म्हटले होते. विधानसभा निवडणुकांमध्ये ऐतिहासिक विजय मिळवत महायुतीची सत्ता तिसऱ्यांदा प्रस्थापित करुन आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन त्यांच्याभोवती निर्माण केला गेलेला चक्रव्यूह यशस्वीपणाने भेदला आहे. पीटर डकर यांनी नेतृत्वासंबंधात सांगितलेले निकष पाहिल्यास देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व परिपूर्ण आहे हे लक्षात येते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाचे समाजशास्त्र अभ्यासले असता त्यांची बांधिलकी ही सातत्याने सामाजिक राहिली आहे. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हे सूत्र घेऊन त्यांनी हिंदुत्त्वाला समरसतेची जोड दिली आहे आणि पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानवदर्शन हा व्यापक विचार त्यांनी प्रत्यक्षात कृतीत आणला आहे. यावरून त्यांच्या नेतृत्त्वाचे समाजशास्त्र किती प्रभावशाली आहे आणि त्यांच्या नेतृत्त्वाची पाळेमुळे लोकजीवनात कशी रुजली आहेत हे स्पष्ट होते.**

# आधुनिक अभिमन्यू

महाभारतामध्ये चक्रव्यूह भेदणाऱ्या अभिमन्यूची कथा मोठी रोमांचक आहे. आपल्या आईच्या पोटात असतानाच अभिमन्यूने चक्रव्यूह भेदण्याची कला अवगत करुन घेतली होती. प्रत्यक्षात युद्धामध्ये अत्यंत कठीण असणारा बहुस्तरीय चक्रव्यूह भेदण्याचे सामर्थ्य अभिमन्यूला प्राप्त झाले; परंतु त्यातून बाहेर त्यांना पडता आलेले नव्हते. महाराष्ट्राचे नुतन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचारसभांमध्ये आपण आधुनिक अभिमन्यू आहोत, असे म्हटले होते. विधानसभा निवडणुकांमध्ये ऐतिहासिक विजय मिळवत महायुतीची सत्ता तिसऱ्यांदा प्रस्थापित करुन आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान होऊन त्यांच्याभोवती निर्माण केला गेलेला चक्रव्यूह यशस्वीपणाने भेदला आहे. विशेषतः पाच वर्षे मुख्यमंत्री या नात्याने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केल्यानंतर त्यांनी बदललेले सत्तेचे समीकरण प्रभावीपणे, योजकतेने परिपूर्ण स्वरुपात नेले. पहिल्या पाच वर्षांत आणि दुसऱ्या अडीच वर्षांत महाराष्ट्राच्या राजकीय स्थैर्याची, आर्थिक विकासाची आणि सांस्कृतिक परंपरेची बैठक उत्तम प्रकारे निर्माण केली आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाला १३२ जागा मिळाल्या आणि मित्रपक्षांनाही त्यांच्या कार्याचे फळ मिळून महायुतीचा आकडा २३० वर पोहोचला. न भूतो न भविष्यती असा विक्रम करुन महाराष्ट्रात स्थिर, भक्कम व जनमान्यता लाभलेले सरकार विराजमान झाले आहे. याचे नेतृत्व देवाभाऊंकडे आले आणि महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात आता सोनेरी पान लिहिले जाणार आहे. चक्रव्यूह छेदल्यानंतर आता आधुनिक अभिमन्यूला महाराष्ट्राच्या राजकीय कुरुक्षेत्रावर नवी उज्वल कामगिरी करावयाची आहे. कृषीक्षेत्रातील हरीत क्रांतीच्या नव्या दिशा, विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र पहिल्या स्थानी राहिला आहे त्याला आता आणखी उंचीवर न्यावयाचे आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात महाराष्ट्राला देशात अव्वल स्थानी न्यायचे आहे. शिवाय महाराष्ट्राचे मानबिंदू असणाऱ्या अनेकविध क्षेत्रात देशात पहिले स्थान प्रस्थापित करावयाचे आहे. त्यादृष्टीने आपल्या स्वयंकर्तृत्वाने चमकत असलेला हा तेजस्वी तारा महाराष्ट्राला स्थैर्याकडे घेऊन जाणार आहे.

**कौटुंबिक पार्श्वभूमी**

राजकीय जीवनाच्या वाटचालीत एखादी व्यक्ती तरुण वयात आपल्या गुणवत्ता आणि चारित्र्याच्या आधारे यशोशिखरावर कशी पोहोचू शकते याचा आदर्श वस्तूपाठ म्हणजे देवेंद्र फडणवीस यांचे चरित्र होय. त्यांचा जन्म २२ जुलै १९७० रोजी झाला. भारताच्या राष्ट्रीय चळवळीत आणि त्यांच्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार होऊ लागले. त्यांचे वडील जनसंघाचे सक्रीय कार्यकर्ते होते आणि आणीबाणीत त्यांनी तुरुंगवासही पत्करला होता. लहानपणी त्यांच्या घरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुत्वाचे वातावरण होते. त्यांचे वडील गंगाधरपंत फडणवीस राष्ट्रीय जनसंघाचे सक्रीय कार्यकर्ते होते. त्यांच्या आईही सामाजिक जीवनात सक्रीय होत्या.

**सर्वांत तरुण महापौर**

यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांच्यानंतर सर्वांत तरुण मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या इतिहासात त्यांची नोंद झाली आहे. नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात आमदार म्हणून नेतृत्त्व केले आहे. तसेच सातत्याने लोकांची कामे करणे, सामाजिक व राजकीय विषयावर स्वच्छ आणि स्पष्ट भूमिका घेणे आणि एखादा विषय विकासासाठी लावून धरणे ही त्यांची कार्यपद्धती होय. नागपूर शहराचे महापौर म्हणून त्यांनी तरुण वयातच संधी मिळवली होती. ते जेव्हा नागपूरचे महापौर झाले तेव्हा देशातील सर्वांत तरुण महापौर असा लौकिक त्यांनी संपादन केला. आणि आपल्या स्वच्छ आणि लोकाभिमुख कार्याची छाप त्यांनी लोकांवर टाकली होती.

**देवेंद्र फडणवीस यांचे शालेय शिक्षण सुरुवातीला इंदिरा कॉन्व्हेंट या शाळेत झाले. पुढे त्यांच्या वडिलांना मिसा कायद्यांतर्गत अटक झाल्यावर त्यांनी ही शाळा सोडली आणि सरस्वती विद्यालयात दाखल झाले आणि तिथे शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे धरमपेठ येथील कनिष्ठ महाविद्यालयात दाखल झाले. बारावीनंतर त्यांनी कायद्याच्या क्षेत्रात पुढील शिक्षण घ्यायचे ठरवले. पाच वर्षांचा कायद्याचा अभ्यासक्रम त्यांनी १९९२ साली पूर्ण केला. फडणवीस यांनी व्यवस्थापन क्षेत्रात अभ्यासक्रम पूर्ण केला आहे तसेच या क्षेत्रात उच्चतम ज्ञान त्यांनी बर्लिन इथे जाऊन संपादित केले आहे. बर्लिन इंटरनॅशनल डेव्हलपमेंट संस्थेचा विशेष अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला. शिक्षणाच्या क्षेत्रातील कायदा किंवा व्यवस्थापन यापैकी कोणतेही ज्ञान हे सुसंगत ठरले. नागपूर परिसरात आणि विद्यापीठ क्षेत्रात ते अत्यंत हुशार, तल्लख बुद्धी आणि कार्यक्षम विद्यार्थी असा त्यांचा लौकिक होता.**

**स्वयंसेवक ते मुख्यमंत्री**

विद्यार्थी चळवळीतील पावले

देवेंद्र फडणवीस यांनी राजकारण आणि समाजकारण यात पावले टाकली ती विद्यार्थी चळवळीतून. महाविद्यालयात शिकत असताना प्रथमतः ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक बनले आणि पुढे महाविद्यालयात गेल्यावर ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषद या संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते झाले. विविध सामाजिक उपक्रम, चळवळी तसे शैक्षणिक प्रश्नावरील आंदोलने यातही ते सक्रीय होते. ज्ञान, चारित्र्य व एकता हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ध्येय असून त्या दृष्टीने त्यांनी आपली अखंड साधना चालू ठेवली आणि हळूहळू त्यांच्या नेतृत्त्वाचा कलाकलाने विकास होत गेला. वडिलांची शिस्त, आईचे संस्कार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील प्रभावशाली वातावरण यातून फडणवीस यांच्या चारित्र्य आकारास आले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यास प्रारंभ करताना, गती देताना त्यांनी मूलगामी संघटन कार्याचे धडे घेतले आणि या संघटन कार्यात त्यांनी प्रवास, भेटी, अभ्यास, बैठका याद्वारे राष्ट्र जीवनाची विविध क्षेत्रांची संपूर्ण माहिती घेतली. या काळात त्यांनी पांचजन्य, विवेक, ऑर्गनायझर, तरुण भारत इत्यादी नियतकालिकातून अभ्यासपूर्ण विचारमंथन घडविले तसेच प्रतिक्रियाही व्यक्त केल्या. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून भारतीय जनता पक्षाकडे वळले आणि भारतीय जनता मोर्चाचे राज्य अध्यक्ष बनले. त्यापुर्वी नागपूर शहरातील महापालिकेत नेतृत्व केले आणि नागपूरचे महापौरही झाले. भारतातील दुसरे तरुण महापौर असा लौकिक त्यांना मिळाला आणि त्याला साजेसे कार्य त्यांनी केले. १९९९ साली ते महाराष्ट्र विधानसभेत निवडून आले आणि पुढे २०१४ पर्यंत विधीमंडळात प्रतिनिधित्त्व केले. भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चा प्रमाणे प्रदेशाध्यक्षपदही त्यांच्याकडे चालून आले आणि प्रदेशाध्यक्ष या नात्याने पक्षात नव चैतन्य आणण्यातही ते यशस्वी ठरले. प्रथम २०१४ साली लोकसभा निवडणूक आणि त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणूक भारतीय जनता पक्षाला जे घवघवीत यश मिळाले त्या यशाचे शिल्पकार देवेंद्र फडणवीसच होते. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याच्या पक्षनेतृत्व म्हणून

**रविवारची टिप्पणी**

निवड केली त्या सभेस राजनाथसिंह हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

**अभ्यासू मुख्यमंत्री –**

विधीमंडळ नेतेपदी एकमताने निवड झाल्यानंतर ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी त्यांनी राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सुत्रे हाती घेतली होती. सातत्याने कार्यरत राहून या पाच वर्षांत त्यांनी राज्याच्या राजकारण आणि समाजकारणावर विलक्षण छाप टाकली. शेती, उद्योग, शिक्षण, संस्कृती, अर्थकारण अशा अनेक क्षेत्रात त्यांनी महाराष्ट्राचा सकल अंगाने अभ्यास केला आहे. विशेषतः शेती प्रश्नावरील त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांच्यानंतर शेतीचा प्रश्नाचा एवढा सूक्ष्म आणि बारकाईने अभ्यास करणारे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा नामोल्लेख केला जातो. जलयुक्त शिवार हा एक अभिनव उपक्रम आखला आणि केवळ घोषणांनीच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीनेच तो प्रत्यक्षात आणला. त्यासाठी चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करून आणि स्वतः श्रमदान करून त्यांनी या योजनेच्या प्रस्थापनेत महत्त्वाचे योगदान दिले. जलयुक्त शिवाराची कामे त्यांनी इतक्या बारकाईने पाहिली की त्यामुळे राज्यात शेतीचे उत्पादन वाढले होते आणि शेतीच्या सिंचनाचा साठासुद्धा वाढला. २०१४ ते २०१९ या काळात त्यांनी शेततळ्यांच्या योजनेला गती दिली आणि जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत ठिकठिकाणी पाण्याचा साठा करून भूजल पातळी उंचावण्यासाठी प्रयत्न केले. परिणामी आटलेल्या नद्या भरून वाहू लागल्या. पूर्णपणे मोकळ्या झालेल्या विहीरी पाण्याने भरू लागल्या. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात या योजनेला खोडा घालण्यात आला; परंतु २०२२ मध्ये पुन्हा सत्तेत आल्यानंतर या योजनांची नव्याने अमलबजावणी सुरू झाली.

**नेतृत्त्वाचे समाजशास्त्र–**

कुठलेही नेतृत्त्व ज्या सामाजिक जीवनातून विकसित होते त्या समाजाचा प्रभाव नेतृत्त्वावर पडणे स्वाभाविक असते. नागपूर परिसरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यसंस्कृतीचा प्रभाव देवेंद्र फडणवीस यांच्यावर पडलेला आहे. त्यानी प्रारंभीच्या काळात, संघ, अभाविप, आणि भाजप मध्ये जी कामे केली त्या कामाची बैठक त्यांना राज्याचे नेतृत्त्व करण्यास मार्गदर्शक ठरली आहे. विकासाचे राजकारण पुढे नेत असताना समाजातील दुःखी, कष्टी आणि पददलित माणसाची दुःखे समजावून घेण्यात ते समर्थ आहेत. मागील काळात 'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमातील त्यांची भाषणे ऐकली असता त्यांच्या अभ्यासू नेतृत्त्वाचे प्रतिबिंब या सर्व भाषणात उमटले असल्याचे दिसून येते. त्यांच्या मुलाखतींचे विश्लेषण केल्यास शाश्वत विकास हा त्यांच्या चिंतनाचा विषय असल्याचे दिसून येते. त्यांनी सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाला गती देण्यासाठी राज्यातील शेती, उद्योग, शिक्षण या मूलभूत समस्यांचा सखोल आणि सूक्ष्म अभ्यास करून या संदर्भात आपली समीकरणे विकसित केली आहेत. महाराष्ट्र हे देशातील प्रगतीशील आणि पाच प्रमुख राज्यांपैकी एक राज्य आहे. हे लक्षात घेऊन राज्यात केले जाणारे विकासाचे प्रयोग हे देशातील इतर राज्यांना पथदर्शक ठरतात हे लक्षात घेऊन देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचे अनेकविध प्रयोग यशस्वी केले आणि ते प्रत्यक्षात आणले. त्यांच्या या कृतीशील विकास कार्यक्रमातून प्रकट झालेले चिंतन पुन्हा एकदा महाराष्ट्राला निश्चितच नवी दिशा देणारे ठरणार आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाचे समाजशास्त्र अभ्यासले असता त्यांची बांधिलकी ही सातत्याने सामाजिक राहिली आहे. हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हे सूत्र घेऊन त्यांनी हिंदुत्त्वाला समरसतेची जोड दिली आहे आणि पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांचा एकात्म मानवदर्शन हा व्यापक विचार त्यांनी प्रत्यक्षात कृतीत आणला आहे. यावरून त्यांच्या नेतृत्त्वाचे समाजशास्त्र किती प्रभावशाली आहे आणि त्यांच्या नेतृत्त्वाची पाळेमुळे लोकजीवनात कशी रुजली आहेत हे स्पष्ट होते.

दुसरे म्हणजे कार्यक्रम कोणताही आणि कुठेही असो त्यांच्या सभा गाजल्या आणि त्यांची भाषणे लोकांची नाडी ओळखणारी ठरली. लोकसभा किवा विधानसभा यांतील त्याचा झंझावाती प्रचार अनेक मतदारसंघात गेमचेंजर ठरला. अनेक अर्थाने देवेद्र फडणवीस यांना संघर्ष करावा लागला पण त्यांनी संघर्ष यात्रेचे रुपांतर संवाद यात्रेत केले.प्रश्नांचा भडिमार झाला तरी देखील स्वकर्तृत्त्वाने आणि स्वयंप्रेझेने प्रश्न सोडवण्यासाठी आवश्यक अशी व्यूहरचना कशी करावी याबाबत त्यांची अभ्यासूवृत्ती त्यांना सर्वच संकटातून बाहेर पडण्यास मार्गदर्शक ठरली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शिस्त, भारतीय जनता पक्षाच्या कार्यातील तडफ आणि समस्या सोडवण्यातील तडफ ही त्यांची बलस्थाने आहेत.

सर्वसाधारण मर्यादांच्या पलीकडे व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास करण्याची नेतृत्व ही कला होय. पीटर डकर यांनी नेतृत्वासंबंधात सांगितलेले निकष पाहिल्यास देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व परिपूर्ण आहे हे लक्षात येते. त्यांनी महाराष्ट्राला प्रगतीची एक नवी दृष्टी दिली आहे. त्यांच्या कामगिरीचा आलेख उच्चतम बिंदूकडे झेपावताना दिसतो. तसेच सर्व दृष्टीने आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करुन प्रत्येक वेळी मर्यादांवर मात केली आहे आणि संधींचे सोने केले आहे. आता या अष्टपैलू नेतृत्वास पुन्हा एकदा महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्याची संधी लाभली आहे.

जलयुक्त शिवारप्रमाणेच अन्य राज्यांत भारतीय जनता पक्षाने अमलात आणलेली लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकारने कृतीमध्ये आणली आणि ती अक्षरशः गेमचेंजर ठरली. याशिवाय शेतकऱ्यांना सौरपंप योजना असो, किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजना असोत किंवा उद्योगक्षेत्रात चैतन्य येण्यासाठी राबवलेल्या योजना असोत अथवा शिक्षणक्षेत्रात गुणवत्तावृद्धीसाठी केलेले प्रयत्न असोत या सर्वांचा परिपाक म्हणजे महाराष्ट्राचा विकासवेग वाढतो आहे.

भविष्यात भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरचा टप्पा पार करेल तेव्हा महाराष्ट्राचा त्यात सिंहाचा वाटा असेल आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र देशाचा खड्गहस्त बनेल. हे स्वप्न साकार करण्याचे सामर्थ्य देवेंद्र फडणवीस यांच्या व्यक्तिमत्वात आहे. नम्रता, विद्वत्ता, बुद्धीमत्ता, प्रचंड अभ्यासूपणा, आकलनक्षमता, प्रशासनावरील पकड, व्यासंग, समन्वयवादीपणा, संवेदनशीलता, प्रभावी वक्तृत्व, प्रचंड कार्यक्षमता, प्रयत्नवादी, विजिगिषु वृत्ती, सौहार्द आणि प्रसंगी आवश्यक असणारा कणखरपणा हे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच्या अंगी आवश्यक असणारे सर्व गुण त्यांच्यामध्ये आहेत आणि त्यांनी ते प्रयत्नपूर्वक जोपासत वृद्धिंगत केलेले आहेत. त्यामुळेच हा आधुनिक अभिमन्यू चक्रव्यूह भेदण्यात यशस्वी झाला.

■ **प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर**
ज्येष्ठ विचारवंत आणि विश्लेषक

# चिंता वाढत्या कर्जबाजारीपणाची

■ **सीए संतोष घारे,**
अर्थतज्ज्ञ

**राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०२२-२३ च्या आकडेवारीवर आधारित सांख्यिकी मंत्रालयाने नुकताच जाहीर केलेला वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षण अहवाल शहरांच्या तुलनेत खेड्यांमध्ये कर्जाच्या वाढलेल्या ओझ्यावर नव्याने प्रकाश टाकणारा आहे. या अहवालानुसार, खेड्यांमध्ये १ लाख लोकांमागे १८,७१४ लोक कर्जदार आहेत; तर शहरांमध्ये हे प्रमाण १७,४४२ असे आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांवर कर्जाचा बोजा जास्त आहे. या कर्जबाजारीपणाला आतबट्ट्याची ठरत असलेली शेती, राहणीमान उंचावण्याच्या आकांक्षांमुळे वाढलेला खर्च, वाढती महागाई आणि बेरोजगारी ही प्रमुख कारणे आहेत. या अहवालांचा मतितार्थ असा की, ग्रामीण भारताच्या सुधारणेसाठी आणि लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी अजून बरेच काही करणे आवश्यक आहे.**

'ऋण काढून सण साजरे करु नयेत', अशी आपल्याकडील 'अंथरुण पाहून पाय पसरावेत' या तत्वानुसार जगणाऱ्या समाजव्यवस्थेची पारंपरिक शिकवण आहे. खायला चार घास कमी असले तरी चालतील, पण डोक्यावर कर्जाचा बोजा नसावा असे मानून आपल्या गरजा कमी ठेवत जीवन गुजराण करावी असा विचार वर्षानुवर्षे भारतीय समाजात प्रभावी होता. परंतु नव्वदीच्या दशकामध्ये आलेल्या जागतिकीकरण, खासगीकरण आणि उदारीकरणाच्या प्रक्रियेने अर्थव्यवस्थेचेच नव्हे तर एकंदरीतच इथल्या समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडण्यास सुरुवात झाली. पाश्चिमात्य विचारसरणीचा भारतीय समाजावरील प्रभाव वाढत गेला आणि त्यातून 'यूज अँड थ्रो' सारख्या अपप्रवृत्तींचे अनुकरण वाढू लागले. त्याचबरोबर विलासी किंवा आलिशान जीवनशैली जगण्याच्या आकांक्षा वाढत गेल्या. उद्याचा विचार न करता आजची चैन महत्त्वाची बनली. तसेच सतत अंथरुण पाहून पाय पसरण्यापेक्षा पाय पसरून मनमोकळे जगता यावे यासाठी अंथरुण मोठे असायला हवे यांसारख्या विचारतत्वांकडे वळणारा वर्ग वाढला. जागतिकीकरणानंतर बदललेल्या अर्थकारणामुळे पैशांचा ओघही वाढत गेला. याची फळे ज्यांना मिळाली त्यांची आर्थिक स्थिती सुधारत गेली. पण त्याचबरोबर आर्थिक विषमताही वाढत गेली. ती वाढत वाढत आता दहा टक्के लोकांकडे देशाच्या एकूण संपत्तीच्या ७० टक्के संपत्ती एकवटण्यापर्यंत येऊन पोहोचली आहे. याचाच दुसरा अर्थ उर्वरीत ९० टक्के जनता केवळ ३० टक्के संपत्तीच्या श्रेणीत आहे. या श्रेणीतील वर्ग एका बाजूला वाढत्या आशाआकांक्षा, वाढलेल्या गरजा, वाढलेली महागाई, त्यातून जीवन जगण्यासाठीचा वाढलेला खर्च, चांगले शिक्षण-आरोग्य यांसाठी मोजावा लागणारा भरमसाठ पैसा आणि दुसरीकडे बेरोजगारी, कामगार कपात, आर्थिक मंदी, कोरोना महामारीसारखे संकट, नैसर्गिक आपत्ती यांमुळे आक्रसलेले उत्पन्न यांचा सामना करत गुजराण करत आहे.

अशा स्थितीमध्ये जगताना तरुन जाण्यासाठी कर्जाचा आधार गरजेचा ठरत गेला. काही वर्षांपूर्वीपर्यंत खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन वर्षानुवर्षे त्यांचे हप्ते भरत राहणाऱ्यांची आणि या कर्जखात्यांचे नुतनीकरण करणाऱ्यांची संख्या मोठी होती. पण कायद्यांच्या मार्गाने सावकारशाहीचे पाश आवळले गेले व पुढे बँकिंग सेवांचा प्रसार-प्रचार आणि विस्तार मोठ्या प्रमाणावर होत गेल्याने कर्जदाता बदलला. आज बँका, सहकारी पतसंस्था, एनबीएफसी यांसारख्या वित्तपुरवठा करणाऱ्यांची सद्दी इतकी झाली आहे आणि त्यांच्यामधील स्पर्धा इतकी तीव्र बनली आहे की, पूर्वी कर्ज मिळवण्यासाठी करावी लागणारी यातायात संपून, आता 'कर्ज हवे आहे का' यासाठी रेटा लावला जात आहे. बदलत्या काळात क्रेडिट कार्ड नावाचा प्लास्टिक मनी अवतरला आणि त्याने बहुतांश जणांच्या खिशातून हजारो कोटी रुपये केवळ दंडाच्या रुपातूनच वसूल केले.

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २०२२-२३ च्या आकडेवारीच्या आधारे सांख्यिकी मंत्रालयाने अलीकडेच जारी केलेला वार्षिक मॉड्यूलर सर्वेक्षण अहवाल देशातील नागरिकांवर वाढलेल्या कर्जाच्या ओझ्यावर नवा प्रकाश टाकणारा आहे. या अहवालानुसार, भारतातील खेड्यांमध्ये १ लाख लोकांमागे १८,७१४ लोक आहेत ज्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे कर्ज घेतले आहे. तर शहरांमध्ये हा आकडा १७,४४२ इतका आहे. विशेष म्हणजे देशाच्या ग्रामीण भागातील महिलांवर कर्जाचा बोजाही जास्त आहे. गावातील एक लाख महिलांपैकी १३,०१६ महिला कर्जबाजारी आहेत. तर शहरांमध्ये केवळ १०,५८४ महिला कर्जदार असल्याचे आढळून आले. शहरांतील लोकांपेक्षा खेड्यातील लोकांवर कर्जाचा बोजा जास्त असल्याचे हे दुष्टचक्र अनेक वर्षांपासून सुरू आहे. २०१६ च्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण अहवालानुसार, खेड्यांतील ३१.४ टक्के कुटुंबांनी कर्ज घेतले होते, तर शहरांमधील २२.४ टक्के कुटुंबे कर्जबाजारी होती. त्या आकडेवारीवरून असेही दिसून आले की खेड्यांमध्ये

व्यावसायिक (बँका) आणि गैर-व्यावसायिक संस्थांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अनुक्रमे ५६ आणि ४४ टक्के होते.

आर्थिक अवलोकनानुसार, देशातील कर्जबाजारीपणा वाढण्यामध्ये कोरोना महामारी आणि त्याकाळात झालेल्या लॉकडाऊनने नव्याने भर घातली असे लक्षात येते. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या २०२१ च्या अहवालात असे देखील दिसून आले होते की, साथीच्या रोगापूर्वी ३५ टक्के ग्रामीण कुटुंबे आणि २२.४ टक्के शहरी कुटुंबे कर्जबाजारी होती. पण लॉकडाऊनच्या काळात जेव्हा असंख्य लोक शहरांतून खेड्यांमध्ये गेले, तेव्हा ते आणखी कर्जात बुडाले. असे अहवाल सतत येत राहणे म्हणजे ग्रामीण भारताच्या सुधारणेसाठी अजून बरेच काही करणे आवश्यक आहे.

देशातील जनतेच्या डोक्यावरील कर्जाचा भार दिवसेंदिवस वाढत असल्याचं समोर आलं आहे. एका अहवालात दिलेल्या माहितीनुसार, ग्रामीणसह शहरी भागातील जनता कर्जाच्या विळख्यात अडकली आहे.

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अहवालात दिलेल्या माहितीनुसार, शहरी भागांतील लोकांप्रमाणेच ग्रामीण भागातही इएमआयवर वस्तू खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. पण कर्जबाजारीपणा वाढण्याचे ते एकमेव किंवा प्रमुख कारण बिलकूलच नाहीये. मुळातच प्रचंड प्रमाणात वाढत चाललेल्या महागाईमुळे आज शहरी आणि ग्रामीण भागातील कुटुंबाचा मासिक खर्च भरमसाठ वाढला आहे. या वाढत्या खर्चामुळे देशात कर्जबाजारीपणाचे वाढत चालले आहे. गेल्या १० वर्षामध्ये ग्रामीण भागात कुटुंबाचा खर्च १६४ टक्क्यांनी वाढला आहे, तर शहरी भागात कुटुंबाचा खर्च हा १४६ टक्क्यांनी वाढल्याची माहिती याच अहवालात देण्यात आली आहे. पण गेल्या दहा वर्षांत उत्पन्न मात्र वाढलेले नाही. उलट बेरोजगारीसारख्या समस्यांमुळे उत्पन्नात घटच झाल्याचे दिसून येते. ग्रामीण भागात शेतकरी मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारी झालेले दिसतात. देशातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जात सातत्याने वाढ होत आहे. प्राधान्य क्षेत्र कर्ज नियमानुसार, सरकारने बँकांना त्यांच्या एकूण कर्जाच्या १८ टक्के कृषी आणि संबंधित क्षेत्राला प्रदान करणे बंधनकारक केले आहे. पाच वर्षांपूर्वी शेतकऱ्यांना दिलेले पीककर्ज ८.२५ लाख कोटी रुपये होते. २०२३-२४ या वर्षात शेतकऱ्यांना दिलेले एकूण कर्ज २५.४७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. वाढता उत्पादन खर्च, शेतकऱ्यांच्या शेतमाला योग्य बाजारभाव नसणे यामुळे देशातील अन्नदाता कर्जबाजारी होत चालला आहे.

**लक्षवेधी**

शहरी भागात सुबत्ता दिसत असली तरी चैनीची प्रवृत्ती वाढत चालल्यामुळे आणि प्रतिष्ठेखातर आलिशान जीवनशैलीसाठी खर्च करण्याची मानसिकता बळावत चालल्याने मोठ्या प्रमाणावर शहरी कुटुंबे कर्जाच्या बोजात बुडाली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या एका आकडेवारीनुसार,एप्रिल २०२३ मध्ये भारतातील क्रेडिट कार्डची एकूण थकबाकी २ लाख कोटींवर गेली आहे. एप्रिल २०२३ मध्ये हा आकडा २लाख २५८ कोटी रुपये इतका होता. २०२२ च्या तुलनेत तो सुमारे ३० टक्क्यांनी अधिक होता. इतिहासात पहिल्यांदाच क्रेडिट कार्डवरील थकबाकीचा आकडा २ लाख कोटींच्या पार गेल्याने आरबीआयनेही याबाबत चिंता व्यक्त केली होती. दुसरीकडे बँका आणि वित्तीय संस्थांकडून दिल्या गेलेल्या वैयक्तिक कर्जांमध्ये मोठी वाढ झाली आहे. जुलै २०२४ अखेरीस ते तब्बल ५५.३ लाख कोटी रुपये झाले आहे. अलीकडील काळात गोल्ड लोन देणाऱ्या कंपन्यांची प्रक्रिया सुलभ झाली आहे आणि ते देणाऱ्या कंपन्याही वाढल्या आहेत. पण यामुळे देशात कधी गरजेसाठी तर कधी हा पैसा शेअर बाजारात गुंतवून भरभक्कम परतावा मिळवण्यासाठी सोने गहाण ठेवणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत सोन्याच्या दागिन्यांसाठी बँकांनी दिलेल्या कर्जात तब्बल ५०.४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. इतर प्रत्येक वैयक्तिक कर्ज विभागातील क्रेडिट सिंगल डिजिटमध्ये वाढले असताना ही वाढ लक्षणीय ठरत आहे. आरबीआयच्या अहवालानुसार ऑक्टोबर २०२४ पर्यंत थकित सोन्याची कर्जे १,५४,२८२ कोटी रुपये होती. मार्च २०२४ अखेर हा आकडा १,०२,५६२ कोटी रुपये होता.

ही सर्व आकडेवारी थक्क करणारी आहे. यामुळे 'विकसित' होऊ पाहणारा भारत कर्जाच्या बोज्याखालचा देश असल्याचे स्पष्ट होत आहे. आर्थिक विकासाचा दर उंचावत असताना, देशाच्या जीएसटी संकलनात, प्रत्यक्ष करसंकलनात वाढ होत असताना, जगभरातील पतमानांकन संस्थांकडून भारताचे आर्थिक भविष्य उज्वल असल्याचे सांगितले जात असताना देशात कर्जात बुडालेल्यांचे वाढते प्रमाण भविष्यात मोठ्या संकटाची नांदी ठरण्याची भीती काही अभ्यासक वर्तवत आहेत. त्यामुळे धोरणकर्त्यांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

## At a Glance

### नऊ किलो गांजा जप्त; तिघांना अटक

**पिंपरी :** शहरामध्ये झोपडपट्ट्यांमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईमध्ये सुमारे चार लाख ४४ हजार रुपये किमतीचा नऊ किलो गांजा जप्त केला आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाने ही कारवाई केली. पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये सूरज पंडित पवार, हफिजअली मेहबुबअली सय्यद आणि मोहिनी आनंद जाधव या तिघांना अटक केली आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, काळाखडक येथे अंमली पदार्थ विरोधी पथक गस्त घालत असताना पोलीस अधिकारी विक्रम गायकवाड यांना माहिती मिळालेल्या माहितीच्या आधारे सुरज पंडित पवार आणि हफिजअली मेहबूबअली यांना ताब्यात घेतले.

### कासारवाडीकडे जाणारी वाहतूक बंद...

**पिंपरी :** सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कामांमुळे पिंपळे गुरव येथील सृष्टी चौकातून कासारवाडी येथे जाणारी वाहतूक बंद करण्यात आली आहे. दुचाकी वगळता इतर वाहनांना महापालिकेने प्रवेशबंदी लागू केली आहे. प्रवेशबंदीचा तिथे फलक लावण्यात आला आहे. त्यामुळे कासारवाडीच्या दिशेने जाणारी वाहतूक कल्पतरु सोसायटीमार्गे भारतरत्न जे. आर. डी. टाटा उड्डाणपुलावर वळवण्यात आली आहे. परिणामी, कासारवाडीत जाणाऱ्या नागरिकांना पुलावरुन वळसा घेऊन कासारवाडीत यावे लागत आहे.

# आता कोणत्याही वेळी होणार मालमत्ता जप्तीची कारवाई !

## जप्ती अधिपत्र सादर केलेल्या मालमत्तांकडे २३४ कोटींची थकबाकी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये ६ लाख ३३ हजार २९४ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यामध्ये सर्वाधिक ५ लाख ४१ हजार १६८ निवासी मालमत्ता, ५७ हजार ७३३ बिगरनिवासी, ४ हजार ५६३ औद्योगिक, ११ हजार ३२३ मोकळ्या जमिनी, १६ हजार १ मिश्र आणि २ हजार ५०६ इतर इतक्या मालमत्ता आहेत. चालू आर्थिक वर्षामध्ये आत्तापर्यंत एकूण ४ लाख ०२ हजार मालमत्ताधारकांकडून ५६५ कोटी रुपयांचा मालमत्ताकर महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये जमा करण्यात आला आहे. एकूण मालमत्ताधारकांपैकी अद्याप २ लाख २२ हजार ६५६ इतक्या मालमत्तांची थकबाकी आहे. थकीत कराची वसुली करण्यासाठी कर आकारणी व कर संकलन विभागाने सर्व विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांची थकबाकी वसुली कार्यवाहीसाठी आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये प्रत्येक प्रकरणांचा आढावा घेण्यात आला व थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचअनुषंगाने, सर्व विभागातील थकबाकी असलेल्या ५०५९ मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आले आहे.

अशा अटकावणी व जप्ती अधिपत्राद्वारे थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्यासाठी करसंकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी यांना नेमण्यात आले आहे. सदर जप्ती अधिपत्राच्या आधारे कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाचे प्रशासन अधिकारी यांना 'नमुना ह' च्या जप्ती अधिपत्राद्वारे

> "ज्या मालमत्ता जप्तीस पात्र आहेत अशा ५०५९ मालमत्ता जप्ती अधिपत्राद्वारे तात्काळ जप्त करण्याचे आदेश संबधित विभागीय कार्यालयांना देण्यात आलेले असून उपरोक्त आदेशाच्या आधारे विभागीय कर संकलन कार्यालयाने जप्तीची कारवाई सुरु केलेली आहे. विशेषत: ज्या मालकांनी आपली निवासी मालमत्ता आर्थिक उत्पन्न मिळण्याच्या अनुषंगाने भाडे तत्वावर दिलेल्या आहेत, तसेच मिश्र व व्यावसायिक कारणांसाठी वापरात असलेल्या मालमत्ता संदर्भात प्राधान्याने जप्ती करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सबब, ज्या मालकांना त्यांच्या मालमत्तेच्या अनुषंगाने आर्थिक उत्पन्न प्राप्त होत असतानाही मालमत्ता कर थकविणाऱ्या थकबाकीदारांनी लवकरात लवकर आपल्या थकीत कराचा भरणा करुन महानगरपालिकेकडून करण्यात येणारी जप्तीची कारवाई टाळावी."
>
> **-अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका




मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे आता ज्या मालमत्ता संदर्भात जप्ती अधिपत्र काढणेत आले आहे.

अशा मालमत्तांची आता कोणत्याही वेळी मालमत्ता जप्त करण्याचे अधिकार कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

ज्या मालमत्तांचे नमुना 'ह' प्रमाणे अटकावणी किंवा जप्ती अधिपत्र काढण्यात आले आहेत अशा मालमत्तांना मालमत्ताकराच्या बिलासोबतच जप्ती पूर्व नोटीस बजाविण्यात आली होती. परंतू तरी सुध्दा सदर मालमत्तांनी विहित कालावधीमध्ये थकीत कराचा भरणा न केल्याने अशा थकीत मालमत्तेच्या थकीत रकमेच्या किमतीची जंगम मालमत्ता अटकावून ठेवावी किंवा थकीत मालमत्तेच्या जागेवरील कोणतीही स्थावर मालमत्ता जप्त करण्याचे आदेश व अधिकार कर संकलन विभागाच्या विभागीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकाऱ्यांना करसंकलन विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडून देण्यात आले आहेत.

करसंकलन विभागाकडून १५ विभागीय कार्यालयामधील ५०५९ मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आलेल्या मालमत्तांकडे २३४.३१ कोटींची थकबाकी असून २८.१९ कोटींची चालू मागणी अशी २६२.५० कोटींची एकूण मागणी आहे.

याच अनुषंगाने मोशी विभागीय कर संकलन कार्यालयाकडून तात्काळ कार्यवाही सुरु करण्यात आली असून स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून शहरातील इतर विभागीय कर संकलन कार्यालयाकडूनसुध्दा थकबाकीदारांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

## रखडलेल्या नियुक्तीचा मार्ग झाला मोकळा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** विधानसभा निवडणूक आचारसंहितेमुळे लाड-पागे योजनेअंतर्गत महापालिकेतील सात जणांचे नियुक्ती रखडल्या होत्या. आता आचारसंहिता शिथिल झाल्याने त्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सेवेत सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना लाड -पागे समितीनुसार वारसा हक्क १९७५ पासून लागू आहे. पण त्या विरोधात काहींनी न्यायालयात धाव घेतल्याने या निर्णयाला स्थगिती स्तक्ती आदेश होता. त्यातच विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाल्याने नियुक्ती रखडल्या आहेत.

दरम्यान, काही प्रवर्गातील अर्जदारांना नियुक्ती देण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार महापालिकेने 55 पैकी 47 जणांना आचारसंहितेपूर्वी नियुक्त दिल्या आहेत. सात जणांचे अर्ज वैद्यकीय विभागाकडे पाठवले आहेत, त्यांची वैद्यकीय चाचणी होऊन पुढील नियुक्त देण्यात येणार आहेत. तसेच निवडणुकीदरम्यान क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनेक अर्ज दाखल झाले आहेत, त्याची विभागणी करून त्या नियुक्ती त्यांनाही येणाऱ्या १५ दिवसात गती मिळणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## तत्कालीन आयुक्त झाले मुख्यमंत्र्यांचे सचिव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आधीच्या महायुती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव राहिलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी श्रीकर परदेशी हे आता मुख्यमंत्री फडणवीस यांचे सचिव असतील.पुण्याच्या बी.जे. मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एमबीबीएस, एमडी असे शिक्षण पूर्ण केले.

त्यानंतर ते आयएएस अधिकारी झाले. यवतमाळ, अकोला आणि नांदेडचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले. नांदेडमध्ये असताना त्यांना जलसंवर्धनासाठी पंतप्रधान पुरस्कार मिळाला होता. पिंपरी चिंचवड महापालिकेचे ते आयुक्तही राहिले आहेत. २०१५ मध्ये पंतप्रधान कार्यालयात रुजू झाले.ग्रामीण, नागरी, जल, कृषी, आरोग्य आणि सामाजिक क्षेत्रातील धोरणांची आखणी व संनियंत्रण अशी जबाबदारी त्यांनी ५ वर्षे सांभाळली. परदेशी यांनी २०२१ मध्ये हॉवर्ड विद्यापीठातून लोकप्रशासनात पदव्युत्तर पदवी संपादन केली. जॉन्स हापकिन्स विद्यापीठाने २०२२ मध्ये त्यांना 'मास्टर ऑफ पब्लिक हेल्थ' प्रदान केले.

# मानवतावाद हाच सर्वोच्च धर्म !

## प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस : भारती प्रतिष्ठान आयोजित पुरस्कार प्रदान सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "मानवतावाद हाच सर्वोच्च धर्म हे ब्रीद आचरणात आणून पोपटराव पवार यांनी हिवरेबाजार या गावाला आशिया खंडाच्या नकाशावर अग्रस्थानी आणले!" असे गौरवोद्गार ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी यशवंतराव चव्हाण ट्रेनिंग सेंटर, आदर्शगाव हिवरेबाजार, जिल्हा अहिल्यानगर येथे पिंपरी येथील लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान आयोजित पुरस्कार प्रदान सोहळ्यात प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. ज्येष्ठ समाजसुधारक पद्मश्री गिरीश प्रभुणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते; तसेच कृषिभूषण सुदाम भोरे, लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेंद्र भारती यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

पाली - मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वार्षिक शब्दोत्सवाच्या सातव्या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य आदर्शगाव संकल्प आणि प्रकल्पाचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार यांना लोकशिक्षक बाबा भारती जीवनगौरव सन्मान प्रदान करून गौरविण्यात आले. त्याचबरोबर ज्येष्ठ बौद्ध साहित्यिक सुरेशचंद्र वारघडे (लोकशिक्षक बाबा भारती स्नेहबंध पुरस्कार), बौद्धाचार्य आणि निवेदक सचिन कांबळे (लोकशिक्षक बाबा भारती पाली भाषा पुरस्कार), कविवर्य भरत दौंडकर (लोकशिक्षक बाबा भारती काव्यसाधना पुरस्कार), चित्रपटनिर्माते, कवी दत्तात्रय जगताप आणि रानकवी जगदीप वनशिव (लोकशिक्षक बाबा भारती काव्यप्रतिभा पुरस्कार) यांना सन्मानित करण्यात आले.

पुरस्काराला उत्तर देताना पोपटराव पवार म्हणाले की, "शिकून, संघटित होऊन आणि आपले हक्क मिळवून आनंदित जीवन जगा, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण होती. धरणांची ब्लू प्रिंट सर्वात पहिल्यांदा बाबासाहेबांनी केली अन् आपल्याला समृद्धीचा मार्ग दाखविला.

### अपघातानंतर टेम्पोत अडकलेल्या दोघांची सुटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** कंटेनर, ट्रक आणि टेम्पो या तीन वाहनांचा चाकण रस्त्यावर शनिवारी (दि. ७) पहाटे अपघात झाला. या अपघातात टेम्पोमध्ये दोन जण अडकल्याची माहिती चाकण एमआयडीसीच्या अग्निशामक विभागास मिळाली. एका तासाच्या अथक प्रयत्नानंतर टेम्पोत अडकलेल्या दोन जणांची सुखरूप सुटका करण्यात आली. विशाल श्रीराम काळदाते (वय २५) आणि वैभव राजेंद्र काळदाते (वय २५, दोघेही रा. चिंचोली, जामखेड) अशी सुटका केलेल्या जखमींची नावे आहेत. चाकण एमआयडीसी अग्निशामक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चाकण-शिक्रापूर रस्त्यावर शेल पिंपळगाव येथे पहाटे साडेपाच वाजताच्या सुमारास कंटेनर, ट्रक आणि टेम्पो यांचा अपघात झाला असून त्यामध्ये दोघेजण अडकले असल्याची माहिती चाकण पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक शेख यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले.

## मनिषा आव्हाळे यांची महापालिकेच्या विविध प्रकल्पांस भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दूरदृष्टीकोनातून शहरवासियांच्या सोयीसाठी दिव्यांग भवन, वेस्ट टू एनर्जी यासारखे सुरू केलेले अनेकविध स्तुत्य उपक्रम आणि प्रकल्प अनुकरणीय आहेत असे मत पुणे स्मार्ट सिटी विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी व्यक्त केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध प्रकल्प, उपक्रम आदी ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी भेट दिली, यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना त्या बोलत होत्या. महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात येत असलेल्या नव्या प्रशासकीय इमारतीची आढावा बैठक महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी महापौर दिवंगत मधुकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीत देखील श्रीमती आव्हाळे यांनी सहभाग घेऊन इमारतीची रचना जाणून घेतली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता मनोज सेठिया, विजय काळे, उप आयुक्त विठ्ठल जोशी, अविनाश शिंदे, नीलेश भदाने, मनोज लोणकर,संदीप खोत, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल,किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.

पान १ वरून

## अखेर वसुलीचे आदेश निघाले

मोहिते पाटील, दिलीप माने, बबनदादा शिंदे, संजय शिंदे, रश्मी बागल यांच्यासह जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेत्यांना मोठा दणका मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.जिल्हा मध्यवर्ती बँक बेकायदेशीर कर्ज वाटप प्रकरणात 2010 साली राजेंद्र राऊत यांनी तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीनंतर कलम 83 आणि 88 नुसार चौकशी करण्यात आली होती. या चौकशीत संचालक मंडळाने नियमबाह्य पद्धतीने कर्ज वाटप केल्याचे स्पष्ट झाले होते. संचालक मंडळाच्या सदस्यांनी स्वतःच्या संस्थांना कर्ज घेतले. मात्र त्या कर्जाची परतफेड केली नसल्याने बँक अडचणीत आल्याचा ठपका या चौकशी अहवालत ठेवण्यात आला होता. त्यामुळे या प्रकरणी बँकेचे तत्कालीन संचालक मंडळासह अधिकारी आणि चार्टर्ड अकाउंटंट यांना देखील जबाबदार धरण्यात आले होते. या चौकशी अहवालनंतर आता विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांनी कलम 98 अन्वये जबाबदार धरण्यात आलेल्या संचालक मंडळाकडून वसुली करण्याचे आदेश दिले आहेत.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी...

व्यवस्थापनाने शाळा स्तरावर विद्यार्थी सुरक्षिततेसाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये प्रसाधनगृह स्वच्छ व वापरण्यायोग्य असणे, सहा वर्षाखालील मुलांची काळजी घेण्यासाठी महिला कर्मचारीच असणे, प्रसाधनगृहामध्ये अलार्म किंवा गजर व्यवस्था असणे, शालेय परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित असणे, सीसीटीव्ही चित्रीकरण किमान एका महिना साठवणे, शालेय विद्यार्थी वाहतुकीसाठी महिला कर्मचारी असणे, शाळेत तक्रार निवारण समिती कार्यान्वित करून नियमित बैठका घेणे, शाळेतील तक्रारपेटी आठवड्यातून किमान दोन वेळा पालक-शिक्षक समितीचे अध्यक्ष, सखी सावित्री समितीचे अध्यक्ष यांच्यासमोर उघडणे, त्यातील तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे, शाळांमध्ये बालसंरक्षण समिती स्थापन करणे, सखी सावित्री समिती कार्यान्वित करून विविध कार्यक्रम राबवणे, शाळा सुटल्यावर शालेय परिसरात एकही विद्यार्थी थांबणार नाही याची खात्री शिक्षकांनी करणे, अशा तरतुदी करण्यात आल्या आहेत.

प्रत्येक शाळेत उपलब्ध शिक्षकांमधून एका शिक्षक विद्यार्थी समुपदेशनासाठी नियुक्त करणे आवश्यक करण्यात आले आहे. समुपदेशक शिक्षकांना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे प्रशिक्षण देण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले.

## नवीन 'नगर परिषद'...

सूचक संकेत मिळत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात नगर परिषद स्थापनेच्या दृष्टीने बैठक झाली. या बैठकीला जिल्हा प्रशासन, नगर परिषदेचे प्रशासक, महापालिकेचे अधिकारी तसेच शासनाने नियुक्त केलेल्या ३४ गावांतील सदस्यांच्या समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये कचरा डेपोमुळे स्थानीक नागरिकांना होणाऱ्या आरोग्याच्या समस्यावर चर्चा झाली. या त्रासातून स्थानीक नागरिकांची सुटका करण्यासाठी महापालिकेने दोन्ही गावांमध्ये पूरक विकासकामे करावीत, अशी मागणी झाली. यापुर्वी ही गावे महापालिकेत समाविष्ट करण्यापुर्वी ग्रामपंयातींच्या हद्दीमध्ये महापालिका प्रशासनाने कचऱ्याच्या समस्येवर उपाययोजना म्हणून पाणी पुरवठा, ड्रेनेज लाईन, रस्ते, पथदिवे अशी विविध कामांसाठी दोनशे कोटी रुपयांहून अधिक निधी दिला आहे. कचरा डेपोमुळे अद्याप समस्या कायम असल्याचे सांगतच काही प्रतिनिधींकडून महापालिकेने निधी द्यावा, अशी मागणी झाल्याची माहिती या बैठकीला उपस्थित असलेल्या अधिकाऱ्याने दिली. या मागणीमुळे महापालिकेसमोर प्रश्नचिन्ह उभे राहीले आहे.

पान १ वरून

## गृहमंत्रीपद भाजपकडेच असायला...

असावे असं मला वाटते.

एकनाथ शिंदे सरकारमध्ये सामील होणार की, नाही याबाबत सस्पेन्स होता. मात्र देवेंद्र फडणवीसांनी समजूत काढल्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारत सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

मात्र तरी गृहमंत्रीपदाचा तिढा अद्याप कायम आहे. महाआघाडी सरकारचा कार्यकाळ वगळता मागील साडे सात वर्षे गृहमंत्रीपद देवेंद्र फडणवीसांकडेच आहे.

आताही भाजप या पदावरील दावा सोडण्यास तयार नसल्याचे दिसते. याबाबत देवेंद्र फडणवीस व एकनाथ शिंदे यांनी एकदाही जाहीर भाष्य केले नाही. नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गृहमंत्रीपदाचा हट्ट धरला आहे का?या प्रश्नावर फडणवीस म्हणाले, शिंदे यांनी असं कुठलंही मंत्रीपद मागितलेलं नाही. त्यांनी फक्त तीन ते चार खात्यांवर चर्चा व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे. त्यावर चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

## मनी लॉंड्रिंग प्रकरणी ईडीचे छापे

महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये छापे टाकले होते. चहा आणि कोल्ड ड्रिंक्सची एजन्सी चालवणारा मेमन आणि त्याच्या काही साथीदारांविरोधात मालेगाव पोलिसांनी ७ नोव्हेंबर रोजी दाखल केलेल्या एफआयआरनंतर मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## समाजवादी पक्ष महाविकास...

विरोधी पक्षातील आमदारांनी शपथ घेण्यास नकार देत सभा त्याग केली. मात्र, मविआच्या बहिष्कारानंतरही सपा नेते अबू आझमी यांनी आमदारकीची शपथ घेतली. शिवसेनेसोबत न राहण्याची भूमिका घेत त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेचे विधान परिषद सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी बाबरी विध्वंसाबाबत केलेल्या पोस्टला प्रत्युत्तर म्हणून सपाने हे पाऊल उचलले आहे. नार्वेकर यांनी मशीद पाडल्याचा फोटो पोस्ट केला.

त्यावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी ज्यांनी हे केले त्यांचा मला अभिमान आहे, अशी कमेंट केली. शिवसेना उबाठा नेत्यांनी या पोस्टमध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि स्वत:चे फोटोही पोस्ट केले आहेत. अबू आझमींच्या या निर्णयामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. तसेच आझमींच्या पक्षातून जाण्याने महाविकास आघाडीचे संख्याबळ दोनने कमी झाले. आझमींच्या जाण्याने महाविकास आघाडीचे संख्याबळ आता ५० वरून ४८ वर आले आहे.

## पुण्यात पहिल्यांदाच 'बालरंगभूमी...

इंदुरकर, गणेश मतकरी, ऋजुता देशमुख व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सलील कुलकर्णी, संदीप खरे, पद्मश्री परशुराम गंगावणे, श्री उदय देशपांडे, मेघना एरंडे, शैलेश दातार यांचा देखील सन्मान करण्यात येणार आहे.

सिने बाल कलावंत मायरा वयकुल, निलेश गोपणार, स्वरा जोशी व इतर बाल कलावंताचे सादरीकरण या निमित्ताने होणार आहे. संमेलनानिमित्त बाल कलावंतांची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे यात विविध कलांचे, चित्ररथांचे प्रदर्शन केले जाणार आहे. बालरंगभूमी संमेलनात महाराष्ट्राभर नावाजलेले बालनाट्य, बालकलावंतांचे सर्वोत्कृष्ट असलेले लोककलेचे कार्यक्रम तसेच महाराष्ट्रातील विविध दिव्यांग संस्थांच्या बालकलावंतांचे नामांकित कार्यक्रम, गायन, वादन, नृत्य, एकपात्री, नाट्यछटा, जादूगार, बोलक्या बाहुल्यांचे खेळ, पपेट शो, नाटुकल्या, ग्रिप्स थिएटर अदी भरगच्च कार्यक्रम संमेलनात सादर होणार आहेत.

संमेलनाच्या निमित्ताने कलादालनाची निर्मिती करण्यात आली असून यात चित्र, शिल्प, रांगोळी, हस्तकला, मुखवटे आदींचे प्रदर्शन व प्रशिक्षण ठेवण्यात आलेले आहे. तसेच उपमंचावर देखील बाल कलावंतांच्या विविध एकल कलांचे सादरीकरण होणार आहे.

## तीन दिवस राज्यावर...

चक्रीवादळानंतर राज्यातील वातावरणात बदल होत आहे. कधी थंडी तर कधी आभाळ अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील काही भागांत पाऊस पडत आहे. आता कोकण-गोवा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.त्यामुळे पुढील तीन दिवस राज्यावर पावसाचे सावट असून काही जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. पुढील ४८ तासांत कोकण गोव्यातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर तर मराठवाड्यातील बीड, लातूर विजांच्या कडकडाटासह पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील.

### जाहीर नोटीस/आवाहन

माझे अशिल **बबन पांडुरंग माथवड रा. १११ नर्मदा निवास, कोथरूड, पुणे - २९** आणि **मे. श्री. शिवशंकर कन्स्ट्रक्टशन भागीदारी फर्म तर्फे श्री. दिलीप शंकराव परिंचेकर व इतर** यांच्या दरम्यान **मौजे कोथरूड, पुणे** येथील सर्वे नं ११४ हिस्सा नं. २, प्लॉट नं. २,३, आणि ८ या मिळकतीवर बांधलेल्या इमारत नं. ३ मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०९ यांसी क्षेत्रफळ १८१. चौ. मी. बिल्टअप **या मिळकतीबाबत दिनांक २०/०९/१९९० रोजी करून दिलेला व १८/०७/२००३ रोजी नोंदणी पूर्ण झालेला मूळ करारनामा या शिर्षकाचा दस्त लिहून घेणार यांचेकडून गहाळ झाला असून शोध घेतला असता तो आढळून आला नाही, तरी यदाकदाचित सदर करारनामा कोणाला आढळून आल्यास / सापडल्यास तो खालील पत्त्यावर आणून द्यावा.**

पुणे . तारीख : ०८/१२/२०२४

**आर. सी. राजूरकर,**
**बी.ए., एल्. एल्. बी. अॅडव्होकेट**
ऑफीस नं.१०१,समृद्धी मार्केट पहिला मजला संघर्ष चौक खराडी, पुणे ४११ ०१४.
मो.नं. ९८५०१०४३३६

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the general public that, our Clients are in the process of purchasing the Schedule property from its owners **Mrs. Manjusha Suhas Gode and Mr. Suhas Deodatta Gode.**

The said owners have informed to our clients that, there are no charges or encumbrances of whatsoever nature existing on the said property, and that, they have clear and marketable title thereto. The Notice is herby given to the public at large that, any person/s claiming/ having any right, title, interest on the scheduled property or any part thereof of whatsoever nature by way of sale, exchange, mortgage, gift, trust, inheritance, bequest, possession, lease, lien, easement or otherwise etc; is hereby requested to communicate in writing in respect of the same to the undersigned at our Office address mentioned below, within **15 days** from the date of issuance of this notice, producing the relevant original documents between 10.00 a.m. & 6.00 p.m., on any working day during the notice period referred to above, as otherwise the said sale agreed/proposed will be completed without any further reference or regard to any such purported claim, right, title or interest of whatsoever nature, received thereafter which shall be deemed to have been waived.

**SCHEDULE**

All that piece and parcel of the Flat No. 201, 2nd Floor, Krishnanayan Society, Plot No. 37, S. No. 129, CTS No. 825, Kothrud, Pune.

**Adv. A. N. Thite**
**Flat No. 4, 2nd Floor, Shefali Apartment, CTS No. 15 A/10, Behind Ashwamedh Hall,Erandwane, Karve , Road, Pune-411004.**

Stamp

राष्ट्रसंचार www.rashtrasanchar.com @rashtrasanchar 08•12•2024

# महाराष्ट्र; भारताचे 'ग्रोथ इंजिन'

**भारतातील महत्त्वाच्या स्टार्टअप मध्ये नायका, शेअरचाट, ओला, स्विगी, झेप्टो, क्रेड इत्यादी आहेत. भारत हा जागतिक स्तरावर पहिल्या तीन सर्वात दोलायमान स्टार्टअप इकॉनोमी मध्ये समाविष्ट आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचे स्थान खूप महत्त्वाचे आहे वर्ष २०३० पर्यंत हा आकडा वाढून आणखीन पुढे जाईल ही अपेक्षा आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा वेग वाढतानाच देवेंद्र फडणवीस २.० सरकार हे शैक्षणिक आणि सामाजिक विकास सार्थ पद्धतीने करण्याकडेही अग्रेसर असेल, ही अपेक्षा आहेचअशा रीतीने महाराष्ट्र राज्य हे देशाचे महत्त्वाचे 'ग्रोथ इंजिन' ठरेल ही आशा करूया.**

देशातील प्रगत राज्य आणि भारताचे महत्त्वाचे 'ग्रोथ इंजिन' असणाऱ्या महाराष्ट्रात या ५ डिसेंबर २०२४ ला देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार सत्तारूढ झाले. त्यांच्याबरोबरच एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे सुद्धा उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. या सरकारचे वैशिष्ट्य असे आहे की ज्याप्रमाणे आपण अठरा पगड जातींच्या एकसंघ महाराष्ट्राची कामना करतो, त्याप्रमाणे राजकारणातील संमिश्र प्रवाह, एक दिलाने, एक होऊन या सरकारची स्थापना झालेली आहे. साहजिकच येणारा काळ, पुढची पाच वर्षे, महाराष्ट्राच्या दृष्टीने कसा असेल याचा विचार करता येतो. देशाच्या जीडीपीमध्ये महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे. यावर्षी देशात झालेल्या थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये मोठा हिस्सा एकट्या महाराष्ट्राला मिळाला आहे.

हे प्रमाण आलेल्या एकंदरीत एफडीआय मध्ये अर्ध्यापेक्षाही जास्त आहे. साहजिकच आपल्याकडे पायाभूत सुविधा आणि उत्तम सामाजिक सलोखा, याच बरोबरीने शांतता आणि सुव्यवस्था नसेल तर या परकीय गुंतवणुकीला तसा अर्थ राहणार नाही. त्यामुळे या सरकारकडून स्थिरतेची आणि विकासाभिमुख, पारदर्शक कारभाराची अपेक्षा आहे. सध्याच्या युगात गतिमानता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन असल्याशिवाय विकास होत नाही. हाच विचार डोक्यात ठेवून फडणवीस २.० सरकार काम करेल हा विश्वास आहे. देवेंद्र फडणवीस २.० सरकार भविष्यातील महाराष्ट्राच्या उभारणीसाठी दिवस-रात्र काम करेल हा विश्वास आहे. फडणवीस सरकार पहिल्यांदा सत्तेवर आले त्यावेळी मुंबई-अहमदाबाद 'बुलेट ट्रेनची 'पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे तत्कालीन पंतप्रधान शिंझो आबे यांच्या हस्ते झाली. त्याचवेळी २०२२ च्या वर्षापर्यंत ती पूर्णत्वास नेण्याचे प्रयोजन होते. परंतु मधल्या अडीच वर्षांच्या महाआघाडी सरकारच्या काळात हा प्रकल्प बऱ्यापैकी रखडला; त्याचमुळे आता याचा पहिला टप्पा अस्तित्वात यायला २०२६ उजाडेल ही स्थिती आहे. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी वेगवान पावले टाकण्यात येतील, ही अपेक्षा करता येईल. तसेच नुकतेच मुंबई जवळ वाढवण बंदराच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली गेली. हे बंदर झाल्यावर पश्चिम किनाऱ्यावरील ते एक महत्त्वाचे बंदर असेल, तसेच मुंबई जवळ असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे. मुंबई मेट्रोच्या उर्वरित टप्प्याला आता वेग येईल. मुंबईत नुकतीच मेट्रो सात च्या भुयारी मार्गाला सुरुवात झाली. त्याचे पुढील टप्पे मुंबईच्या शाश्वत विकासाला कारणीभूत ठरतील. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने शिवाय 'मिनी भारत 'म्हणूनच प्रसिद्ध असल्याने मुंबईचा सर्वांगीण विकास होत आहे, हे देशाच्या दृष्टीने आवश्यक ठरते. मागील काही वर्षांमध्ये मुंबईच्या विकासात मोलाची भर पडली आहे. कोस्टल रोड असो, अटल बिहारी वाजपेयी सागरी सेतू असो किंवा वांद्रे वरळी सी लिंक चा प्रकल्प, याचबरोबर प्रदेशाच्या उपराजधानी नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग असो, या सर्वच प्रकल्पांचे काम अतिशय उत्तमपणे शीघ्रगतीने पार पडेल. येणाऱ्या काळात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे काम आणि पुणे येथील नवीन विमानतळाचे कामही पूर्णत्वास येईल, ही या सरकारकडून अपेक्षा असेल. मुंबईचा पूर्वीपासून रखडलेला, लालफीतशाहीमध्ये अडकलेला 'धारावी पुनर्विकास प्रकल्पाला' अंतिमतः चालना मिळून तो पूर्णत्वास जाण्याची अपेक्षा करता येईल धारावी ही आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणूनच ओळखली जाते. तसेच ती मुंबईच्या मध्यवर्ती स्थानी असल्याने साहजिकच त्याचा पुनर्विकास मार्गी लागल्यास शहराची फार मोठी समस्या संपुष्टात येईल. देवेंद्र फडणवीस सरकार पहिल्यांदा सत्तेवर आले तेव्हा, त्यावेळी त्यांना आधीची पंधरा वर्षे सत्तेवर असलेल्या आघाडी सरकारच्या मुशीतून तयार झालेल्या प्रशासनाचा सामना करावा लागला. त्यातूनच त्यांनी मग कॉर्पोरेट स्टाईलने काम करणाऱ्या सीएमओ (मुख्यमंत्री कार्यालया) ची रचना केली. मुख्यमंत्री कार्यालयात कायमच एक २४x ७ काम करणारी वॉर रूम कार्यरत होती. तिथूनच मग महत्त्वाच्या प्रकल्पांना येणारे अडथळे दूर केले जायचे. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी तिथूनच आढावा घेतला जायचा. त्याच प्रकारे फडणवीस सरकार २.० मध्ये कारभार चालेल ही अपेक्षा करता येईल. अतिशय अनुभवी, मेहनती उपमुख्यमंत्रीही सोबतीला असल्याने प्रशासनात गतिमानता येण्याची अपेक्षा करता येईल.

**राजकीय**
**प्रीतीश पंडित**
**राष्ट्रसंचार**

आधीच्या काळात रखडलेली जलयुक्त शिवार आणि प्रदूषण कमी होण्यासाठी केलेल्या विविध प्रयोजनांची परत जलद गतीने अंमलबजावणी होईल ही अपेक्षा करू या . काही वर्षांपूर्वी लातूर मध्ये उन्हाळ्यात रेल्वे द्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. यासारख्या घटना टाळण्यासाठी आधीच शाश्वत पावले टाकण्याची या सरकारकडून अपेक्षा आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करता मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र तसेच विदर्भात विकासाचा अनुशेष (बॅकलॉग) आहे. हे आपल्याला माहित आहे . त्या दृष्टीने या भागांमध्ये सॉफ्टवेअर पार्क, आयटी सिटी विकसित करणे, त्याचबरोबर कारखाने उभे करणे, हे एक महत्त्वाचे आव्हान सरकार पुढे असेल. देशातील महत्त्वाचे राज्य महाराष्ट्र असल्याने महाराष्ट्राचा चौफेर विकास होणे हे देशाच्या विकासाला उपयोगी ठरेल. देवेंद्र फडणवीस सरकारचे महाराष्ट्राला 'वन ट्रिलियन डॉलर इकॉनोमी 'करण्याचे ध्येय आहे. यासाठी स्टार्टअप इंडस्ट्रीकडे लक्ष देण्याची महत्त्वाची गरज आहे. महाराष्ट्र हे स्टार्टअप मध्ये देशात अग्रस्थानी आहे. सरकारने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार नोव्हेंबर २०२२ पर्यंत देशात सर्वाधिक १३,५१९ स्टार्टअप ची नोंदणी एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. सध्याच्या घडीला ही संख्या २४,०४४ एवढी आहे. त्यानंतर कर्नाटक आणि मग दिल्ली, उत्तर प्रदेश असा क्रमांक लागतो. 'वन ट्रिलियन इकॉनॉमि 'चा उद्देश सार्थ ठरवताना या आकडेवारीकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे लागेल.

भारतातील महत्त्वाच्या स्टार्टअप मध्ये नायका, शेअरचाट, ओला, स्विगी, झेप्टो, क्रेड इत्यादी आहेत. भारत हा जागतिक स्तरावर पहिल्या तीन सर्वात दोलायमान स्टार्टअप इकॉनोमी मध्ये समाविष्ट आहे. त्यामध्ये महाराष्ट्राचे स्थान खूप महत्त्वाचे आहे वर्ष २०३० पर्यंत हा आकडा वाढून आणखीन पुढे जाईल ही अपेक्षा आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा वेग वाढतानाच देवेंद्र फडणवीस २.० सरकार हे शैक्षणिक आणि सामाजिक विकास सार्थ पद्धतीने करण्याकडेही अग्रेसर असेल, ही अपेक्षा आहेच. अशा रीतीने महाराष्ट्र राज्य हे देशाचे महत्त्वाचे 'ग्रोथ इंजिन' ठरेल ही आशा करूया.

# 'टोल'धाडी साठी तब्बल २.४० लाख कोटी !

**देशभरात सर्वत्र राष्ट्रीय महामार्ग उभारल्यानंतर त्याचा वापर केल्याबद्दल सर्व वाहन चालकांकडून, प्रवाशांकडून टोल वसुली केली जाते. या "टोलधाडी" च्या माध्यमातून भारतीयांनी आजवर तब्बल २.४० लाख कोटी रुपये मोजले आहेत. या "टोल धाडी" च्या कमाईची सुरस कथा...**

गेल्या पंचवीस तीस वर्षात विविध राज्यांमध्ये राष्ट्रीय महामार्गांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करण्यात आली. त्यांच्या उभारणीची, देखभालीची सर्व जबाबदारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण ( एन एच ए आय) यांच्यावर सोपवली आहे. दळणवळणाच्या या महत्वाच्या विकासात्मक कामानंतर त्याचा वापर करणाऱ्या प्रवाशांकडून, वाहन चालकांकडून टोल वसुलीची "इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन"( ईटीसी) यंत्रणा अनेक वर्षे आपल्याकडे अस्तित्वात आहे. फास्ट टॅग साठी रेडिया फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन (आरएफआयडी) तंत्रज्ञान वापरले जाते. अर्थात भारतान टोल पद्धती नवीन नाही. १९५० पासून ती अस्तित्वात आहेत. टोलच्या रकमेतून रस्ते बांधणी व देखभाल खर्च उभा करावा अशी मूळ संकल्पना होती. देशात एकूण ५९९ राष्ट्रीय महामार्ग असून त्यापैकी ५२३ महामार्गावर टोल प्लाझा उभारलेले असून तेथे ईटीसी यंत्रणा कार्यरत आहे. राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी १ लाख ३२ हजार ५०० किलोमीटर आहे.

देशातील एकूण रस्त्यांच्या लांबीमध्ये राष्ट्रीय महामार्गाचा वाटा केवळ २ टक्के आहे. त्यात अनेक द्रुतगती महामार्ग आहेत. आज देशाच्या विविध भागांमध्ये साधारणपणे १०४० पेक्षा जास्त टोल असून हे सर्व टोल अस्तित्वात आल्यापासून या सर्व टोलच्या चालकांनी किंवा कंत्राटदारांनी २.४० लाख कोटी रुपयांची रक्कम टोलद्वारे वसूल केले असल्याचे लोकसभेमध्ये एका प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले. भारतातील सर्वात जास्त चाळीस पेक्षा जास्त टोल नाके तामिळनाडूत आहेत. टोल नाक्यात जमा होणारा पैसा हा पैसा केंद्र, राज्य व खासगी कंत्राटदार यांना मिळतो.

राज्यांच्या तुलनेत विविध राष्ट्रीय महामार्गांचा व त्यावरील टोल नाक्यांचा अभ्यास केला असता सर्वाधिक टोलची कमाई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ यांनी केली असून तो सर्वात आघाडीवर आहे. दिल्ली पासून खाली दक्षिणेत चेन्नईपर्यंत हा राष्ट्रीय महामार्ग असून त्याच्यावर आजवर २४ हजार ४९० कोटी रुपये टोल वसुली झालेली आहे. त्या खालोखाल श्रीनगर ते कन्याकुमारी या मार्गावर असणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ याचा दुसरा क्रमांक लागतो. या महामार्गावर २३ हजार ७० कोटी रुपये टोल वसुली झालेली असून तिसरा क्रमांक कोलकत्ता ते चेन्नई या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६ चा असून त्यावर आत्तापर्यंत २१ हजार २८२ कोटी रुपयांची टोल वसुली झालेली आहे. त्या खालोखाल पोरबंदर ते सिलचर या दरम्यान असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २७ वर ११ हजार ६८७ कोटी रुपयांचा टोल वसूल करण्यात आला आहे.

**पोल-खोल**
**प्रा. नंदकुमार काकिर्डे**
**राष्ट्रसंचार**

भारतात टोलद्वारे महसुल संकलन जरी अनेक दशके केले जात असले तरी त्यात अनेक गंभीर अडचणी आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महसुलाची गळती हा गंभीर प्रश्न आहे. अनेक वेळा टोल वसुल केलाच जात नाही. त्यामुळे या क्षेत्रात खासगी गुंतवणूक करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळत नाही. फास्ट टॅग, ईटीसी सारखी टोल संकलनाची यंत्रणा कार्यान्वित असली तरी बहुतेक सर्व टोल नाक्यांवर वाहनांच्या रांगा, इंधनाचा जास्त वापर, हवेतील वाढते प्रदुषण, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रवांशाना प्रवास करताना अनेक वेळा हताश व्हायला होते. अनेकवेळा डिजिटल यंत्रणा न चालणे, कनेक्टिव्हीटीचे प्रश्न निर्माण होत असतात. तसेच प्रत्येक राज्यात टोलचा आकार किती असावा याबाबत कोठेही प्रमाणीकरण नाही. तसेच विविध महामार्गांवरही त्याच्या रचनेत तफावत आढळते. त्यामुळे अनेकदा प्रवासी वर्गात गोंधळाचे वातावरण निर्माण होते तर अनेकदा गैरसोयीला सामोरे जावे लागते.

यामध्ये दरवर्षी ३० ते ३५ टक्के वाढ होत असल्याचे दिसत आहे. नजिकच्या भविष्य काळात टोल संकलन बंद केले जाईल असे केंद्रीय वाहतूक मंत्री श्री नितीन गडकरी यांनी जाहीर केले होते. मात्र त्याद्दष्टीने अद्याप काही हालचाल दिसत नाही. मात्र देशभरातील सर्व टोल नाके अत्यंत कार्यक्षम, पारदर्शकपणे व ग्राहकाभिमूख राहून चांगले काम कसे करतील यावर केंद्र सरकारचा भर दिसत आहे. एकंदरीत या 'टोल धाडीतून' जनतेची सध्या तरी सुटका होण्याची चिन्हे नाहीत.

- पूर्वी सर्व टोल नाक्यांवर वाहनांकडून रोख रकमेमध्ये टोल वसुली करण्यामध्ये खूपच वेळ जात असे, त्यात दिरंगाई होत असे, टोल नाक्यांवर वाहनांच्या रांगा पहावयास मिळत असत. त्यामुळे रोख भरणा करण्याला पर्याय म्हणून केंद्र सरकारने 'फास्ट टॅग' स्वयंचलित कार्यक्षम यंत्रणा २०१४ नंतर कार्यान्वित करून प्रत्येक वाहनाला ती अनिवार्य करण्यात आली. यामुळेच टोलचा महसूल दरवर्षी सतत वाढताना दिसत आहे. आजच्या घडीला देशभरात दहा कोटींपेक्षा जास्त 'फास्ट टॅग' वाहनांवर लावलेले आहेत.

## सर्वाधिक टोल वसुली उत्तर प्रदेशात

- गेल्या काही वर्षातील टोल धाडीच्या माध्यमातून वसूल केलेल्या रकमांचा आढावा घेतला तर यामध्ये सर्वाधिक टोल वसुलीचा मान हा उत्तर प्रदेशला जातो व त्या खालोखाल राजस्थान आणि महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक टोल वसुली करण्यात आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. आजच्या घडीला उत्तर प्रदेशामध्ये सर्वाधिक म्हणजे ३२ हजार ५१० कोटी रुपये इतकी टोल वसुली करण्यात आली आहे. त्या खालोखाल राजस्थानमध्ये २९ हजार ८०८ कोटी रुपये तर महाराष्ट्र टोल वसुलीमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात आजवर २५ हजार ९२९ कोटी रुपये टोल वसुली झालेली आहे. त्या खालोखाल, गुजरात, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, तेलंगणा, बिहार, कर्नाटक, ओडिषा, हरियाणा, तमिळनाडू व छत्तीसगड या राज्यांचा क्रमांक लागतो. मात्र दिल्लीमध्ये सर्वात कमी टोल संकलन झाले असून ते आजवर फक्त २६३ कोटी रुपयांच्या घरात आहे.

- करोनाच्या काळामध्ये प्रवासावर बंदी होती. तसेच सर्व नागरिकांवर मोठ्या प्रमाणावर बंधने लागू केलेली होती. त्यामुळे कोरोनाच्या दोन वर्षाच्या काळामध्ये महसूल मोठ्या प्रमाणावर घटलेला होता.
- चालू आर्थिक वर्षात म्हणजे एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ अखेरपर्यंत अनेक टोल प्लाझांनी १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवलेले आहे. या काळात हरयाणातील घरदुंडा ( Ghardunda) येथील टोलनाक्याने तब्बल २५६ कोटी रुपयांचा रुपयांची वसुली केलेली आहे.
- त्या खालोखाल राजस्थानातील शहाजहानपूर येथे २२४ कोटी रुपयांचा टोल वसूल करण्यात आला होता. त्या पाठोपाठ गुजरातमधील भारथाना येथील टोल नाक्याचा क्रमांक लागतो. त्यांनी २२३ कोटी रुपयांचा टोल जमा केला.
- पश्चिम बंगाल मधील जलधुलागोरी (Jaladhulagori) टोल नावयावर २१७ कोटी रुपयांचे संकलन झाले. त्यानंतर गुजरात मधील चोऱ्यासी (Choryasi) टोल नाक्यावर २०४ कोटी रुपये तर झारखंड मधील बाराजोर ( Barajore ) टोल नाक्यावर २०२ कोटी रुपयांची कमाई झाली.
- २०२३-२४ या वर्षात सर्व टोलवरील महसूल ६५ हजार कोटीच्या घरात जमा झाला. त्या मागील वर्षाच्या तुलनेत त्यात तब्बल ३५ टक्के वाढ झालेली आहे. देशांतर्गत वाढत असलेल्या व्यापारी माल वाहतुकी पोटी व टोलच्या रस्त्यांचा झालेला विस्तार याला कारणीभूत ठरला आहे.
- २०१९ नंतरच्या काळात टोल रस्त्यांची लांबी ७५ टक्के वाढली असून सध्या ५० हजार किलोमीटर पेक्षा जास्त लांब महामार्ग झालेले आहेत. चालू वर्षात दरमहा सरासरी ६००० कोटी रुपयांचे टोल संकलन होत आहे हे लक्षात घेतले तर चालू आर्थिक वर्षात टोल संकलन ७२ ते ७५ हजार कोटींच्या घरात जाईल असा अंदाज आहे.

# 'देवा' शपथ

**कसं होणार? काय होणार? पण काळाच्या पोटात बरीच रहस्ये दडलेली असतात. ते ते क्षण समोर आले की, त्याची उत्तरे सहज मिळत असतात, मतदान झाले, निकाल लागला, अपेक्षे सारखा लागला, अनेक जणांच्या... शपथविधी समारोह तोही कधी होणार, कोण होणार? यातही थोडा काळ गेला. तोपर्यंत सर्वजण आपल्या कल्पनेचे पतंग मोठ्या मोठ्या बावड्या ढगात सोडत होते, ज्यांचे त्यांचे कार्यकर्ते मनासारखे झाले तर हा विचार करून मनातच फटाके फोडत होते, मांजर आडवे आले तर अपशकुन समजतात, तसे आणखीन काही माणसेही अपशकुनाचे विचार मांडतात, या समारंभात विघ्न संतोषी माणसे आडवी येतील काय याची पण ही भीती वाटत होती. त्या मानाने आमंत्रण देऊन सुद्धा न येऊन आपली नाराजी दाखवत होती आणि एक दोन-चार अशाही व्यक्ती असणारच? त्या वगळता बाकी सर्व लोकांनी मात्र या समारंभाचे साक्षीदार होण्यासाठी हजेरी लावली होती. आनंदाने या आनंदात सहभागी सहभागी झाली होती.**

मुळातच.. "शपथ "हा शब्द तीन अक्षरी, बिना काना मात्रा वेलांटीचा साधासोपा असला, तरी खूप मोठा अर्थपूर्णच आहे, ती मोठी जबाबदारी आहे, इतक्या लोकांच्या साक्षीने ही शपथ घेतलेली असते.

राजकीय
-सुनेत्रा पंडित
राष्ट्रसंचार

इतरवेळी सुद्धा आपण बोलतो ती गोष्ट खरी आहे हे पटवून देण्यासाठी स्वतः च्या गळ्याला हात लावून गळ्याशप्पथ हा शब्द उच्चारला की समोरच्याचा विश्वास बसतो, कोर्टामध्ये गीतेवर हात ठेवून शपथ घेतली जाते, ती मात्र वादी प्रतिवादी पैकी नेमकी कोणाची खरी असते ते घेणारा जाणे,

राजकारणातला हा शपथविधी सोहळा मात्र जरा वेगळा असतो, आणि असंख्य जनसमुदायासमोर घ्यायची असते आणि ते पदग्रहण करायचे असते, याचे साक्षीदार होण्यासाठी अनेक गावावरून शहरावरून माणसे आलेली असतात इतकेच नव्हे तर घराघरात बसून दूरदर्शनच्या समोर उत्सुकतेने हा सोहळा पाहण्यासाठी आतुर झालेल्यांची संख्या काही कमी नव्हती.

शिवरायांच्या "जिजाई "ला जसा मान, तसेच या शपथविधीमध्ये थोडे वेगळेपण म्हणजे पित्याबरोबर मातेच्याही नावाचा आवर्जून उल्लेख केला गेला, ते छानच वाटले. यापुढे चांगल्या कार्याची "सरिता", "गंगा" "छान वहात पुढे जाईल अशी "आशा "दायी एक खात्री सर्वांना या मुलांच्या कृतीतून समाजाला जाणवत राहील. पंतप्रधानपदी असलेले मोदीजी मातेच्या चरणी मस्तक ठेवताना पाहिलेले होते. देवेंद्रच्या आईने ते मुख्यमंत्री झाल्यावर आपल्या भावना व्यक्त करताना, मुलाखतीत आपल्या मुलाच्या सर्व सूप्त गुणांचे वर्णन केले आहे. बाळाचे पाळण्यातले पाय व गुणांचा पाढा तिलाच जास्तच परिचित असतो. यशस्वी मुलाचा आभाळभर आनंद होणारी आईही तीच असते आणि मुलाची जबाबदारी आता वाढली याची अंतरी अखंड काळजीही करणारी माऊली तिचं असते.

घराबाहेर पडताना देवेंद्र आईला लवून नमस्कार करून मगच बाहेर पडतो, असा त्यांनी उल्लेख केला. आई म्हणजे कुटुंबाच्या देवघरातली सगुण देवस्वरूप मूर्ती! तिच्या आशीर्वादाचे सुरक्षा कवच मुलाबरोबर असेल तर, यशच मुलाच्या मागे धावत येते," गळ्यात यशाचा हार, माथी चिंतेचा भार "याची प्रचिती, या पदाबरोबर सहजच प्राप्त होते,,"जावे त्याच्या वंशा, "तोच जाणे, शेवटी या "देवाभाऊची "देवालाच काळजी ना. ज्याची त्याची योग्यता बघूनच तोच सर्व कार्याची अदृश्यपणेच योजना करतो, लहानपणी चहा देणारे मोदीजी कोटी जनतेचे चहाते होतील, पंतप्रधान पदावर विराजमान होऊन देशाच्या प्रगतीत एवढी घोडदौड करतील असे भविष्य कोणी सांगितले असते तर ते कोणाला पटले नसते, त्यांच्या हस्ते अयोध्येत रामलल्लाची स्थापना झाली.

अयोध्येतल्या रामाने त्यानेच आता रामराज्यही एकदा आणावे, रामाला हनुमंताने साथ दिली, वानरांनी पूल बांधायला साथ दिली,

तशीच सर्व "नरांनी "हीसाथ द्यायला हवी, हिच त्यांचे चरणी विनम्र प्रार्थना करीत व त्याच्याच नावाचा जप करीत मी हा शपथ सोहळा पाहिला.

**कुर्यात सदा मंगलम्**

**शुभमंगल सावधान...."** हे मंगलाष्टकाचे सूर म्हणजे वधूसाठी एका डोळ्यात हसू आणि दुसऱ्या डोळ्यात आसू अशा स्वरूपाचे असतात. कारण, अंतरपाट सरला की गळ्यात माळ पडल्यावर अचानक एक नवीन जबाबदारी अंगावर आल्यासारखी वाटते. व.पुं. नी किती छान म्हटलं आहे," संसार असाच असतो. लाकडाचा धूर डोळ्यात जातो म्हणून चूल पेटवायची थांबवायचं नसतं. दरी निर्माण झाली म्हणजे आपण खोल जायचं नसतं. तर ती दरी पार करायची असते.."



ललित
मानसी देशपांडे (विरार)
राष्ट्रसंचार

हीच शिकवण प्रत्येक आई मुलीला देतेच. आज अचानक माझ्या मनात एक विचार आला, लग्नात मंगलाष्टकं सुरू असताना तिथे मुलीची आई उपस्थित नसते. का बरं? बहुदा, सनईच्या सुरांनी हृदय गलबलते. ती मंगलाष्टकं आता काहीच क्षणांवर मुलीची पाठवणी येऊन ठेपली आहे असं जणू सुचवत असतील. आणि शिवाय सर्व कार्य निर्विघ्नपणे पार पडू दे अशी प्रार्थना ती माऊली परमेश्वरा जवळ करतच असते..

मुलीचं लग्न म्हणजे आई वडीलांसाठी एक सुखद सोहळाच असतो नाही का! मुलगी सुद्धा आनंदात असतेच पण जेव्हा ती बोहल्यावर चढते त्यावेळी मात्र हृदयातली धडधड तिलाच कळू जाणे. या वर गाण्याची ओळ अगदी साजेशी अशी आहे,

**" लग्न मंडपी तिच्या समोरी उभी तिकडची स्वारी.."**

सनई हे तसं म्हटलं तर एक शुभ प्रसंगी वाजवले जाणारे वाद्य. पण या वाद्यातील सुरांचा आणि मुलीच्या व जास्त करून तिच्या वडिलांच्या मनातील भावना यांचा खूप जवळचा संबंध व.पुं.नी दाखवला आहे," लग्न सोहळ्यात मुलीच्या बापाची भूमिका सनई बजावीत असते. मांगल्या बरोबरीने ते सूर करुण का वाटतात? तर मुलीच्या बापाला मुलीच्या विरहाचं दुःख प्रकट करता येत नाही. त्याच्या डोळ्यातलं पाणी सनईच्या रुपानं वाहत असतं.." ही वेळ खरंच संमिश्र भावनांनी ओतप्रोत भरलेली असते. आई रडून मोकळी होते पण वडील जास्त रडू शकत नाहीत. कारण, वडिलांच्या मनात तेव्हा

**"घेऊ कसा निरोप तुटतात आर्त धागे, हा देह दूर जाता मन राहणार मागे**
**धन आत्मजा दुजाचे ज्याचे तयास देणे.."**

हेच चालू असते.

सनईचे सूर असो, आई वडीलांच्या मनातील भावना असो, व.पुं.नी मांडलेले विचार यावर शब्दच थिटे पडतात. जे जे विचार व.पुं.नी व्यक्त केले आहेत ते सर्व प्रत्येक आई वडील अनुभवत असतात. म्हणून तर हा सोहळा प्रत्येकाच्या कायम स्मरणात राहतो.. थोडक्यात व.पु. म्हणजे काय तर, या ओळी,

**" पार्टनर रुपी सखी, दोस्त तो रंग**
**मनाचे अचूक हेरतो**
**प्रेममयी स्वर शब्दांनी**
**छेडून,अवघे जगणे महोत्सव करतो.."**

# महिला आमदारांची संख्या नगण्य

**भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या महिलांची आहे. चूल आणि मूल ही महिलांची जुनी ओळख आता पुसली गेली आहे. महिला आज कोणत्याच क्षेत्रात मागे नाहीत. सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहे म्हणूनच सर्व क्षेत्रात महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले आहे मात्र एक क्षेत्र असे आहे ज्यात आजही महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही ते क्षेत्र म्हणजे राजकारण. राजकारणात आजही महिला लोकप्रतिनिधींची संख्या पुरुषांच्या तुलनेत अतिशय नगण्य आहे आता हेच पहा ना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे.**

राज्यात २८८ जागांसाठी एकूण २५० महिलांनी निवडणूक लढवली पण निवडून आल्या फक्त २१ महिला. याचाच अर्थ एकूण आमदारांपैकी महिला आमदारांची संख्या फक्त ७.२९ टक्के इतकी आहे. विशेष म्हणजे गेल्या विधानसभेत निवडून आलेल्या आमदारांची संख्या यापेक्षाही अधिक होती. मागील विधासभेत २४ महिला आमदार निवडून आल्या होत्या यावेळी ती संख्या ३ ने घटली आहे. यावेळी निवडून आलेल्या महिला आमदारांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या सर्वाधिक १४ महिलांचा समावेश आहे. शिवसेना ( शिंदे ) गटाच्या २, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ४ आणि काँग्रेसची १ महिला आमदार म्हणून जिंकून आली आहे. इतर पक्षामध्ये निवडून आलेल्या महिला आमदारांची संख्या शून्य आहे. वास्तविक ज्या देशात पंतप्रधान आणि राष्ट्रपती अशी महत्वाची पदे ज्या महिलांनी भोगली त्या देशात महिला लोकप्रतिनिधींची नगण्य संख्या भारतासारख्या पुरोगामी देशाला भूषणावह नाही. भारताच्या महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु या महिला आहेत. डॉ प्रतिभा ताई पाटील या देखील भारताच्या राष्ट्रपती राहिल्या आहेत. इंदिरा गांधी या महिला पंतप्रधानाने सर्वाधिक काळ देशाचे पंतप्रधानपद भूषवले. नुसतेच भूषवले नाही तर यशस्वीरीत्या सांभाळले आणि महिलांकडे देशाचे नेतृत्व दिले तर महिला काय करू शकतात हे दाखवून दिले. महिलांना जर राजकारणात पुरेसे प्रतिनिधित्व दिले तर महिला त्यांना दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकतात हे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. देशात अशा अनेक महिला आहेत की ज्यांनी आपल्या नेतृत्वाने देशपातळीवर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यात इंदिरा गांधी तर आहेतच पण त्यांच्यासोबत दिवंगत जयललिता, सुषमा स्वराज, शिला दीक्षित, ममता बॅनर्जी, उमा भारती, मायावती, वसुंधरा राजे यांनी आपापल्या राज्याचे मुख्यमंत्रीपद यशस्वीपणे सांभाळले. अनेक महिलांनी राज्यांचे राज्यपालपद भूषवले.

राजकीय
श्याम ठाणेदार
राष्ट्रसंचार

महाराष्ट्रातून सुप्रिया सुळे, रक्षा खडसे या खासदारांनी राष्ट्रीय राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे याचाच अर्थ जर राजकारणात महिलांना पुरेशी संधी मिळाली तर त्या त्यात यशस्वी होतात. दुर्दैवाने महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात आजही महिला आमदारांची संख्या अतिशय नगण्य आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अजून एकदाही महिला मुख्यमंत्री बनू शकली नाही यासारखी दुसरी शोकांतिका नाही. मुख्यमंत्रीच कशाला ? अगदी मंत्री बनणाऱ्या महिलांची संख्या देखील हाताच्या बोटावर मोजता येईल इतकीच आहे. मागील मंत्रिमंडळात तर अदिती तटकरे या एकमेव महिला मंत्री होत्या. यावेळी तरी ही संख्या वाढून मंत्रिमंडळात महिलांना पुरेसा स्थान मिळून त्यांचा योग्य मान राखला जाईल अशी अपेक्षा आहे.

राजकारणात महिलांना ५० टक्के आरक्षण मिळावे अशी मागणी केली जाते त्या मागणीला सर्वच राजकीय पक्ष पाठिंबा देतात मात्र त्यासाठी पुढाकार घेण्याचे टाळतात. राजकारणात ५० टक्के आरक्षण मिळाले तर महिला राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवतील यात शंका नाही. नाही म्हणायला स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण आहे त्याचा फायदा महिलांना मिळाला आहे. ग्रामपंचायतिच्या सरपंचापासून जिल्हा परिषद अध्यक्ष, महापौर अशी महत्वाची पदे महिलांनी यशस्वीपणे भूषवली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेप्रमाणे लोकसभा आणि विधानसभेतही महिलांना आरक्षण मिळाले तर महिला तिथेही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतील यात शंका नाही.

# व्हॉट्सअॅप आणि इंस्टंट मेसेजिंग घोटाळे




व्हॉट्सअॅप आणि इतर इंस्टंट मेसेजिंग अॅप्सचा वापर सर्वत्र वाढला आहे, परंतु याच सोयीचा गैरवापर करून अनेक प्रकारचे घोटाळे होत आहेत. व्हॉट्सअॅप सारख्या प्लॅटफॉर्म्सवर रोज नवीन फसवणूक तंत्रज्ञान समोर येत आहेत, ज्यामुळे लाखो लोकांचे आर्थिक नुकसान होत आहे. यामध्ये अनेक प्रकारचे घोटाळे असू शकतात, ज्या माध्यमातून लोकांच्या वैयक्तिक माहितीचा दुरुपयोग केला जातो आणि त्यांना आर्थिक फसवणुकीचा शिकार बनवले जाते.

**व्हॉट्सअॅप घोटाळ्याचे प्रकार**

**1. फेक लॉटरी किंवा बक्षीस घोटाळे :**

यामध्ये व्हॉट्सअॅपवर अचानक तुमच्याशी संपर्क साधला जातो आणि सांगितले जाते की तुम्ही लकी ड्रॉमध्ये बक्षीस जिंकलात. या घोटाळ्यात अनेक वेळा एका फॉर्ममध्ये तुमची बँक माहिती, पिन, आणि अन्य गोपनीय माहिती भरायला सांगितली जाते. त्यानंतर बँक खाते रिकामे केले जाते.

**2. बनावट ग्राहक सेवा (Customer Service Scams) :**

व्हॉट्सअॅपवर फेक ग्राहक सेवा प्रतिनिधी बनवून लोकांना गोड बोलून पैसे उकळले जातात. उदाहरणार्थ, "तुमचं अकाउंट लॉक झाले आहे" किंवा "तुम्ही बक्षीस जिंकले आहे," अशा प्रकारच्या संदेशांद्वारे लोकांना भुलवले जाते. त्यानंतर त्यांच्याकडून बँक डिटेल्स किंवा कार्ड पिन मागितले जातात.

**3. फेक अपडेट्स आणि लिंक शेरिंग :**

अनेक वेळा व्हॉट्सअॅपवर खोटी माहिती, हवामान अहवाल किंवा सरकारी योजनांचे अपडेट्स पाठवून लोकांना शंका निर्माण केली जाते. त्यामध्ये लिंक दिली जाते, ज्यावर क्लिक केल्यास तुमचा डेटा चोरला जातो.

तंत्रज्ञान
ज्योती हांडगे
सायबर अभ्यासक, पुणे
राष्ट्रसंचार

**इंस्टंट मेसेजिंग फसवणूक आणि सुरक्षेचे उपाय :**

इंस्टंट मेसेजिंग अॅप्सच्या वापरामुळे लोक एकमेकांशी जलद संवाद साधू शकतात, परंतु यामुळे काही धोके देखील निर्माण झाले आहेत. या अॅप्सवर फसवणूक करणारे अनेक गट आणि व्यक्ती सक्रिय असतात. त्याचबरोबर अनेक खोटी वेबसाइट्स आणि अॅप्ससुद्धा याच प्लॅटफॉर्म्सवर प्रचार केला जातो.

**सुरक्षा उपाय :**

**1. वापरकर्ता माहिती तपासणे :**

व्हॉट्सअॅपवरील कोणत्याही संदेशाच्या सत्यता तपासा. सरकारी संस्थांकडून किंवा बँकेकडून कधीच तुमच्या खात्याशी संबंधित माहिती मागितली जात नाही.

**2. लिंकवर क्लिक करताना सावधगिरी :**

कोणतीही लिंक किंवा अनोळखी संदेश मिळाल्यास त्यावर क्लिक करणे टाळा. विशेषतः जर त्यात पैसे देण्याची किंवा माहिती मागण्याची मागणी केली जात असेल.

**3. तंत्रज्ञानाचा वापर :**

अँटी-व्हायरस आणि सायबर सुरक्षा साधनांचा वापर करा. तसेच, तुमच्या व्हॉट्सअॅप किंवा अन्य मेसेजिंग अॅप्समध्ये दोन-घटक प्रमाणीकरण (Two-factor authentication) सक्षम करा.

**4. जनजागृती :**

व्हॉट्सअॅप आणि इंस्टंट मेसेजिंग अॅप्सवरील फसवणुकीविषयी लोकांना जागरूक करा, तसेच अशा प्रकारच्या फसवणुकीसाठी सरकारच्या सायबर क्राइम हेल्पलाइनचा वापर करा.

व्हॉट्सअॅप आणि इंस्टंट मेसेजिंग अॅप्सचा वापर जितका सोयीस्कर आहे, तितका तो धोका निर्माण करतो. सावधगिरी आणि योग्य सायबर सुरक्षा उपाय लागू करून या प्रकारच्या फसवणुकीपासून आपला बचाव केला जाऊ शकतो.

# कबुतर : सार्वजनिक आरोग्यासाठी धोकादायक

कबुतरं ही माणसांच्या शहरी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहेत. त्यांच्या शांत स्वभावामुळे आणि उघड्यावर सहज अन्न मिळाल्यामुळे त्यांची संख्या झपाट्याने वाढते. धार्मिक श्रद्धा आणि कबुतरांना अन्न टाकण्याच्या सवयी यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळते. मात्र, या पक्ष्यांमुळे श्वसनसंस्थेशी संबंधित अनेक गंभीर आजार होऊ शकतात. कबुतरांच्या पिंता आणि विष्ठेतून होणाऱ्या आजारांबाबत पुणे महानगरपालिका सातत्याने इशारे देत आहे. कबुतरांची अनियंत्रित संख्या आता सार्वजनिक आरोग्यासाठी मोठा धोका बनली आहे.

### पुण्यातील वाढती समस्या

- पुणे शहरात कबुतरांची संख्या वेगाने वाढत आहे. उघड्यावर अन्न टाकण्याच्या सवयीमुळे आणि त्यांच्या पोषणासाठी अनुकूल वातावरण मिळाल्यामुळे त्यांच्या वावरात मोठी वाढ झाली आहे.
- सार्वजनिक ठिकाणी, सोसायट्यांमध्ये आणि व्यस्त रस्त्यांवर कबुतरांचे मोठे थवे दिसून येतात.
- त्यांच्यामुळे पिंता आणि विष्ठेचे प्रमाणही वाढले आहे, ज्यामुळे शहरातील हवेचा दर्जा खराब होतो.
- या समस्यांमुळे पुणे महानगरपालिकेला शहरातील स्वच्छतेवर विशेष लक्ष द्यावे लागत आहे.

## कबुतरांपासून होणाऱ्या आरोग्यविषयक समस्या

**कबुतरांच्या पिंता आणि विष्ठेमध्ये सूक्ष्म जीवजंतू, प्रथिने, आणि फफुंदीजन्य घटक असतात, जे हवेत मिसळून श्वसनमार्गातून शरीरात जातात. हे कण अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरतात:**

- **हायपर सेंसिटिव्ह न्यूमोनिया (HP):** हा आजार कबुतरांच्या विष्ठेतून बाहेर पडणाऱ्या सूक्ष्म कणांमुळे होतो. फुप्फुसांवर परिणाम करणारा हा आजार दीर्घकालीन आणि गंभीर असतो. पुणे महानगरपालिकेच्या अहवालानुसार, श्वसनविकारांनी ग्रस्त नागरिकांमध्ये HP आजार होण्याचे प्रमाण 60-65% आहे.
- **एलर्जी आणि दमा:** कबुतरांच्या पिंतात असलेल्या प्रथिनांमुळे श्वसनमार्गात सूज येते, ज्यामुळे दमा आणि एलर्जी होऊ शकते.
- **त्वचाविकार:** कबुतरांच्या संपर्कामुळे काही व्यक्तींना त्वचेला खाज, पुरळ, किंवा चट्टे येण्याची तक्रार असते.
- **जीवाणूजन्य आणि फफुंदीजन्य संसर्ग:** कबुतरांच्या विष्ठेमुळे सैल्मोनेलोसिस आणि क्रिप्टोकोकोसिस यांसारख्या आजारांचा धोका असतो.
- **श्वसनाचे दीर्घकालीन विकार:** सतत कबुतरांच्या संपर्कात राहणाऱ्या लोकांना दीर्घकालीन श्वसन समस्या होऊ शकतात, ज्यामुळे जीवनशैलीत मोठा अडथळा निर्माण होतो.

## महानगरपालिकेच्या उपाययोजना

**पुणे महानगरपालिका या समस्येवर प्रभावीपणे काम करत आहे. त्यांनी खालील उपाययोजना हाती घेतल्या आहेत:**

1. कबुतरांना अन्न टाकण्यावर बंदी: कबुतरांना उघड्यावर अन्न टाकणे हा त्यांची संख्या वाढवण्याचा प्रमुख घटक असल्याने, महापालिकेने अशा कृतींवर कडक बंदी घातली आहे.
2. दंडात्मक कारवाई : जर कोणी अन्न टाकताना आढळले, तर संबंधित व्यक्तींवर दंड आकारण्याचा आदेश दिला आहे.
3. आरोग्यविषयक जनजागृती: नागरिकांना कबुतरांपासून होणाऱ्या आजारांविषयी माहिती देण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत.
4. सार्वजनिक स्वच्छता मोहिमा : शहरातील कबुतरांच्या विष्ठेचे प्रमाण कमी करण्यासाठी स्वच्छता मोहिमा राबवल्या जात आहेत.

## नागरिकांची जबाबदारी

महानगरपालिकेच्या सूचनांचे पालन करणे आणि कबुतरांची संख्या कमी करण्यासाठी प्रयत्न करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

1. खाद्य टाकणे टाळा : कबुतरांना उघड्यावर अन्न देऊ नका.
2. घर आणि परिसर स्वच्छ ठेवा : कबुतरांचे घरटे तयार होणार नाही, याची खबरदारी घ्या.
3. आरोग्यविषयक सावधानता: कबुतरांच्या संपर्कात येण्यापासून बचाव करण्यासाठी मास्क घाला.
4. डॉक्टरांचा सल्ला घ्या: श्वसनाचे कोणतेही त्रास जाणवल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या.

लक्षवेधी
प्रा. योगेश हांडगे-पाटील
(सहाय्यक प्राध्यापक)
राष्ट्रसंचार

## धार्मिक आणि भावनिक दृष्टिकोन

कबुतरांना अन्न टाकणे ही धार्मिक श्रद्धांशी संबंधित कृती असते. मात्र, सार्वजनिक आरोग्यासाठी याचा त्रास होतो. त्यामुळे श्रद्धा पाळतानाही आरोग्याला प्राधान्य दिले पाहिजे. कबुतरांना अन्न टाकण्याऐवजी अन्य पर्याय शोधणे योग्य ठरेल.

कबुतरांपासून होणाऱ्या समस्यांवर प्रतिबंध लावणे ही आजची गरज आहे. पुणे महानगरपालिकेच्या आदेशांचे काटेकोर पालन करून आपण आपल्या आरोग्याचे रक्षण करू शकतो. नागरिकांनी स्वच्छता राखून आणि कबुतरांच्या संपर्कात येण्यापासून बचाव करून या समस्येवर तोडगा काढावा. आरोग्य टिकवा, कबुतरांना उघड्यावर अन्न टाकणे थांबवा!

# सहमतीने घटस्फोट घेताय? प्रत्यक्ष हजेरी आवश्यक नाही..!

आजकाल सोशल मीडिया आणि वाढत्या अपेक्षा यामुळे कुटुंबामध्ये गैरसमजातून वादविवाद होत आहेत. त्यातून पती पत्नी वेगळे होण्याचे प्रमाण वाढले आहे. मात्र, घटस्फोटासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक असते. त्यासाठी दोघांनाही समुपदेशनाचा आणि पुनर्विचार करण्यासाठी ठराविक वेळ दिला जातो. परंतु, ज्या जोडप्यांना सहमतीने घटस्फोट हवा आहे अशा जोडप्यांचा विवाह कायद्याने संपुष्टात आणून त्यांची लवकरात लवकर सुटका करणे अपेक्षित आहे, असे मत मद्रास उच्च न्यायालयाने एका प्रकरणात नोंदवले आहे.

आजकाल नाती खूपच संवेदनशील बनली आहेत. किरकोळ कारणावरून देखील आत्मसन्मान दुखावला तर वाद होतात. काही परिवारात समजूतदारपणे निर्माण झालेला वाद मिटविला जातो. परंतु, काही कुटुंबांमध्ये किरकोळ वाद विकोपाला जातात. सहमतीने प्रश्न सोडवण्याऐवजी शब्दाला शब्द वाढत जाऊन गैरसमज सत्य वाटू लागतात आणि प्रकरण न्यायालयापर्यंत पोचते. पती पत्नी विभक्त होण्याच्या निर्णयापर्यंत जातात. काही वेळा अपत्यांचा विचार करून मध्यम मार्ग काढला जातो. परंतु, काही जोडपी घटस्फोटासाठी दावा दाखल करतात. त्यांना न्यायालयीन प्रक्रियेनुसार पती पत्नीने समजूतदारपणे पुनर्विचार करावा यासाठी वेळ दिला जातो. पण, ज्या जोडप्यांना सहमतीने घटस्फोट हवा आहे अशा जोडप्यांचा विवाह कायद्याने संपुष्टात आणून त्यांची लवकरात लवकर सुटका करणे अपेक्षित आहे. असे असले तरी त्यातही अनेकानेक अडचणी येतात, अशा प्रकरणातल्या जोडीदारांची न्यायालयातील भौतिक अर्थात प्रत्यक्ष उपस्थिती ही अशीच एक महत्त्वाची अडचण असते. याबाबतच्या एका सुनावणीत मद्रास उच्च न्यायालयाने हा निकाल दिला आहे. अशाच अडचणीशी संबंधित काही प्रकरणे मद्रास उच्च न्यायालयात पोहोचली होती.

कायदा
ॲड. गायत्री कांबळे
राष्ट्रसंचार

या प्रकरणांतील जोडीदारांना सहमतीने घटस्फोट हवा होता, मात्र जोडीदार बाहेरगावी, बाहेरदेशी असल्याने त्यांना न्यायालयात प्रत्यक्ष हजेरी लावणे शक्य नव्हते, आणि म्हणून त्यांनी ऑनलाईन हजेरीच्या मान्यतेकरता अर्ज केला. त्यांच्या अर्जाच्या कारवाईस यश न आल्याने मद्रास उच्च न्यायालयात दाद मागण्यात आली होती. मद्रास उच्च न्यायालयाने व्हिडीयो कॉन्फरन्सिंग रुल्सप्रमाणे भारतीय दुतावासामार्फत ऑनलाईन हजेरीचा आग्रह धरण्यात आला, मात्र दोन्ही देशांतील वेळांच्या फरकामुळे हे जवळपास अशक्य होते, प्रत्यक्ष हजेरीकरता भारतात उपस्थित राहण्यात याचिकाकर्त्यांना व्हिसा नियम आणि रजा या दोन समस्या आहेत. या प्रकरणांमध्ये तांत्रिक आणि प्रक्रियात्मक अडचणी हाच महत्त्वाचा मुद्दा आहे. तांत्रिक मुद्दे आणि प्रक्रिया यांमुळे कायद्याचा उद्देश विफल न होणे हे देखिल महत्त्वाचे आहे, ऑनलाईन सुनावणी प्रक्रिया जगातल्या कोणत्याही कोपऱ्यातून दाद मागायची सोय पक्षकारांकरता देत असल्याने ही प्रक्रिया अत्यंत सोयीची आहे. सहमतीने घटस्फोट प्रकरणात अशी सहमती दबावाखाली किंवा धाकदपटशाने घेतलेली नसल्याची खात्री करण्यापुरती न्यायालयाची भूमिका मर्यादित आहे आणि हे काम ऑनलाईन करणे शक्य आहे, अशी महत्त्वाची निरीक्षणे नोंदविली आणि सहमतीने घटस्फोटाच्या प्रकरणांबाबत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

हा निकाल मद्रास उच्च न्यायालयाचा असल्याने सध्या तरी तामिळनाडू राज्यापुरता मर्यादित आहे. बदलत्या काळातील बदलती परीस्थिती लक्षात घेऊन याचिकाकर्त्यांची भौतिक हजेरी आणि तांत्रिक समस्येतून सुटका करणारा म्हणून हा निकाल निश्चित कौतुकास्पद आहे. इतर राज्ये आणि न्यायालयांनीसुद्धा अशा याचिकांची वाट न बघता स्वत:हून या निकालाच्या धर्तीवर नियम बनविल्यास ते याचिकाकर्त्यांच्या फायद्याचे ठरेल.

सहमतीने घटस्फोट प्रकरणांमध्ये न्यायालयाला केवळ सहमतीची खात्री करण्याचीच मर्यादित भूमिका असल्याने सर्व कौटुंबिक आणि दिवाणी न्यायालयांनी आठवड्यातील एक दिवस किंवा रोज काही वेळ केवळ याच प्रकरणांकरता राखून ठेवल्यास अशा प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होईल. असे झाल्यास सहमतीने घटस्फोटाची प्रक्रिया जलद, सुटसुटीत बनून लोकांची लवकर सुटका होण्यास मदत होणार आहे.

# बडे अच्छे लगते है...

माय tech

गाणं म्हणजेच गीत आणि बरोबरीने संगीत, हे शाश्वत असतं, आपणच अपूर्ण असतो' असे मध्यंतरी कुठेतरी वाचनात आले होते. आता अमित कुमार यांच्या गायक म्हणून असणाऱ्या कारकिर्दीचा, विचार करताना याचा अनुभव येतो. अमित कुमार यांचा फिल्मी प्रवास वडिलांप्रमाणे तसा दीर्घकालीन नव्हताच, पण जो होता तो नक्कीच अजरामर झालाय. तसे बघायला गेलो तर तो कालखंड भारतीय सिनेमाच्या गीत संगीत विषयक बाबतीत 'गोल्डन एरा' होता. संवेदनशील मनाला जोडणारे, भावस्पर्शी संगीत, जे सामाजिक जाणीवा जपणारेही होते आणि जीवन समृद्ध, परिपूर्ण करणारे ही होते. असा हा काळ होता. साधारण सत्तरच्या दशकापासून अगदी नव्वदीच्या दशकाला जोडणारा, म्हणजे साधारण दोन दशकांहून अधिक मोठा हा कालखंड होता. तो जमाना असा होता की मुकेश पण होता आणि मोहम्मद रफी पण होता, किशोर कुमार तर राजेश खन्ना यांच्या सुपरस्टारडम मुळे 'टॉप गियर' मध्ये होता. यांच्या बरोबरीने येसूदास, भूपेंद्र आणि शैलेंद्रसिंग हे टॅलेंटेड नवोदित गायक पण उपलब्ध होते आणि अशावेळी आर डी बर्मनला अमित कुमारला आणायचे होते. याबद्दल खुद्द किशोर कुमारनेच विचारले असता, पंचमदांनी उत्तर दिले की 'दादा, प्रोड्यूसर के पास आपका बजेट नही है, इसीलिए नये किसी गायक की जरूरत है'. त्यानंतर मात्र असे झाले की किशोर कुमारचा चार्म आणि आवाज हवा, पण किशोर कुमार नको बजेटमुळे, तर मग हमखास अमित कुमारचे नाव पुढे यायचे. अमित कुमारचा आवाज तसा मधुर आणि श्रवणीय तरीही भारदस्त असा होता. त्याची आई रुमा ठाकूरता हिच्याकडूनच त्याला संगीताचा वारसा मिळालेला होता. ती बंगाली संगीताचे एक नावाजलेले व्यक्तिमत्व होते. त्यामुळे त्याचे बालपण ज्या कलकत्त्यात गेले, तिथेच त्याला संगीताचे प्राथमिक धडे घेता आले. वडील किशोर कुमार यांचे तर अमित कुमारला आकर्षणही होते आणि मार्गदर्शन सुद्धा होते. त्यामुळे त्याच्या कारकीर्दच्या सुरुवातीच्या काळात अमित कुमार आणि किशोर कुमार यांची 'बाप बेटे की जोडी' लाईव्ह म्हणजे, प्रत्यक्ष 'स्टेज शो' चे कार्यक्रम करायची, त्यावेळेस किशोर कुमार चा अष्टपैलू आवाज, उत्साह, हजरजवाबीपणा, विनोदीस्वभाव आणि टॅलेंट (गुणवत्ता) ,यांच्या बरोबरीने अमित कुमारचे उभरते टॅलेंट आणि आवाजातील वेगळेपणा हे कार्यक्रमाचे मानबिंदू असायचे.

व्यक्तीवेध
कॅप्टन पी
राष्ट्रसंचार

व्यक्तिशः अमित कुमार हा स्वतः त्यांच्या रोमँटिक युगलगीते आणि भावस्पर्शी, आत्मभान जपणाऱ्या गाण्यांबरोबरच तरल, हळुवार गाण्यांसाठीही प्रसिद्ध होता. त्याची गाणी ही प्रेक्षकांना हळूच स्पर्श करून जायची आणि मनोमन आवडायची. म्हणूनच त्याचे १९७६चे 'बालिका वधू' मधील 'बडे अच्छे लगते हो, यह धरती, यह नदीया..' हे गाणे असो किंवा त्यानंतर तब्बल दहा वर्षांनी गायलेले 'जीवा' मधील 'रोज रोज आखो तले..' हे गाणे असो, मेलोडी आणि रिदम कमी असूनही, त्यातील भावबंध आणि शब्दरचनेमुळे अजरामर झाली आहेत. १९८१ मध्ये कुमार गौरव आणि विजयता पंडित यांचा 'लव्ह स्टोरी' हा सिनेमा आला. त्या सिनेमात कुमार गौरव ने गायलेली सर्वच गाणी अमित कुमारच्या वाट्याला आली. 'लव्हस्टोरी' सुपरहिट झाला, त्या बरोबरीने घराघरात पोहोचला अमित कुमारचा आवाज. याच सिनेमासाठी त्याला त्यावर्षीचे सर्वोत्कृष्ट गायकासाठी असलेले फिल्मफेअर पारितोषिक मिळाले. त्यानंतरच्या वर्षी आलेल्या कुमार गौरव यांच्याच 'तेरी कसम' मधील 'यह जमीन गा रही है, आसमा गा रहा है,साथ मेरे यह सारा जहाँ गा रहा है..' हे भावस्पर्शी गाणं आणि १९८८ मधील 'तेजाब' मधील 'एक, दो, तीन, चार,पाच...' हे 'कॅची' गाणं,जे त्या वेळी सुपरहिट ठरले होते,आज ही आवर्जून ऐकले जाते. 'कुर्बानी' मधील 'लैला हो लैला', हे एकल गीत आणि 'जवानी' मधील 'तू रुठा तो.....' हे युगलगीत लाजवाब ठरले आहेच आणि आजही प्रसिद्ध आहेच. 'टिप टिप टिप बारिश शुरू हो गयी..' तसेच 'बागी'मधील 'कैसा लगता है..' त्या काळात हिट झालेले गाणे, आजही तेवढेच श्रवणीय आहे.

मोझार्ट च्या चाळिसाव्या सिम्फनी वर आर डी बर्मन ला एक रचना करायची होती,पण असे लक्षात आले की आधीच सलील चौधरी यांनी ती रचना 'इतना ना मुझे तू प्यार जता..' मध्ये वापरली आहे. मग पंचमने तीच रचना अमितकुमारला 'ऐसे ना मुझे तुम देखो, सिने से लगा लुंगा..'मध्ये गायला लावून अजरामर केली.

असा अमितकुमार यांचा सांगीतिक प्रवास आहे,जो आजही मनामनात घर करून आहे.

# वैद्यकशास्त्रातल्या रंजक कथांचे आधुनिक वैद्यकीची शोधगाथा

आधुनिक वैद्यकीची शोधगाथा" हे, डॉक्टर शंतनू अभ्यंकर यांचं पुस्तक वाचकांना, जन्म रहस्येच्या जन्म कहाणी पासून ते वैद्यकीय क्षेत्रांतील झालेले मूलगामी संशोधन, जंतू शास्त्राचा इतिहास, अनेक औषधांच्या, आजारांच्या कुळकथा, मानवी शरीराची बुद्धी थक्क करणारी अंतर्गत जटील रचना आणि वैद्यकशास्त्रात घडून आलेली आजची अभूतपूर्वक्रांती या सगळ्या गोष्टींची रंजकतेने सफर घडवून आणते. वैद्यकशास्त्रातल्या चुरस व चमत्कारिक गोष्टी वाचताना वाचक मंत्रमुग्ध होतो. वैद्यकीय विश्वातील ही शोधगाथा धुंडाळताना अनेक पौर्वात्य, पाश्चिमात्य संशोधनाचे दाखले, रंजक कथा ; विनोदी ढंगाने आपल्याला वाचायला मिळतात. त्यामुळेच, हे पुस्तक विशिष्ट वाचक वर्गापुरतं मर्यादित राहत नाही .

लेखक स्वतः स्त्रीरोग प्रसूतिशास्त्र तज्ञ असले तरीही विषय फक्त तिथंच मर्यादित न ठेवता सर्वसमावेशक असं वैद्यकीय शास्त्रांबद्दल विश्लेषण करतात. "समाजपुरुषाच्या वर्मी लागलेली गोळी "या शीर्षकाखाली केलेलं लिखाण प्रभावी आहे. एड्समधेही संशोधन, प्रबोधन,प्रतिबंध आणि शास्त्रीय उपचार ही विश्वव्यापी प्रयत्नांची पराकाष्ठा कशी होती हे लेखकानं वाचकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचवलं आहे . टेस्ट ट्यूब बेबी तंत्रज्ञानमधील डॉ सुभाष मुखर्जी या भारतमातेच्या डॉ.ची कृतज्ञतेने आठवण येते. कष्ट आणि श्रेय यापलीकडं झोकून देऊन निरपेक्ष भावनेनं केलेलं हे संशोधन आज अनेकांना वरदान ठरलं आहे.

संशोधन करण्यासाठी तज्ञांचे, शास्त्रज्ञांचे अथक प्रयत्न, संघर्ष आणि त्यातून उपचारांसाठी मिळणारी समाज मान्यता हे सगळं वाचताना आपण अचंबित होतो .आज वैद्यकीय शास्त्राने मोठी मजल मारलेली आहे . पुराव्याअभावी, संशोधनाअभावी हे सगळं अशक्य आहे यावरच हे पुस्तक वारंवार आणि परखडपणे भाष्य करतं. वैद्यकशास्त्रांत नवनवीन शोध लागतातच, शस्त्रक्रियेच्या पद्धती बदलतात, तंत्रज्ञान बदलतं, उपचार सुरक्षित आणि खात्रीशीर बनतात हे सांगताना लेखकांनी हा प्रगतीचा आलेख सुंदररित्या अक्षरबद्ध केला आहे.



पुस्तक परीक्षण
- डॉ गौरी कहाते.
राष्ट्रसंचार

मानवी जीवनात डॉक्टर हा महत्त्वाचा घटक आहे. डॉक्टर आशेचा किरण पेशंटच्या जीवनात आणतात त्यामुळेच तर रोगी बरा होतो. अशी शोधक आणि निरीक्षण वृत्ती डॉ. शंतनू अभ्यंकर यांच्या लिखाणातून अनुभवायला मिळते. नाविन्यपूर्ण कल्पनांचा ध्यास घेऊन त्या प्रत्यक्षात उतरवण्याची आणि वाचकांपर्यंत पोहोचवण्याची डॉ.शंतनू अभ्यंकर यांची जिद्द कौतुकास्पद आहे. त्यांची सकारात्मक लेखणी ही वैद्यकीय क्षेत्रांतील आधुनिकतेवर आणि उपचार पद्धतीत झालेल्या सुधारणा यावर मार्मिक टिप्पणी करते.

**पुस्तक :** आधुनिक वैद्यकीची शोधगाथा
**लेखक :** डॉ. शंतनू अभ्यंकर
**प्रकाशक:** समकालीन प्रकाशन
**पृष्ठे :** १४८
**मुल्य:** रू. २००/-

## बॉलीवूडमध्ये पर्दापण

मराठमोळी अभिनेत्री श्रुती मराठेने मालिकांसह चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. याशिवाय अलीकडेच तिने साऊथ सिनेमात देखील काम केले आहे. 'देवरा' या साऊथ सिनेमात ती महत्त्वाच्या भूमिकेत दिसली होती. सोशल मीडियावर देखील ती सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. नुकतेच तिने इनस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करत तिच्या बॉलीवूड चित्रपटातील एन्ट्रीची माहिती चाहत्यांना दिली आहे. श्रुती मराठे आता लवकरच बॉलिवूड सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'वनवास' या नाना पाटेकरांच्या सिनेमात श्रुतीची वर्णी लागली आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. ज्यात तिची झलक पाहायला मिळत आहे. श्रुतीने तिच्या इन्स्टाग्रामवरुन सिनेमाचा ट्रेलर शेअर केला आहे. ज्यानंतर तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# बिग बॉस: वितंडवादाचे घर

सिनेविशेष

■ दिलीप कुमार पाठक
सिनेअभ्यासक

प्रेक्षकांची अभिरुची जसजशी बदलत आहे, तसतसा मनोरंजनाच्या क्षेत्रातील कार्यक्रमांचा दर्जाही ढासळत आहे. १९८० च्या दशकांत दूरचित्रवाणीवर हमलोग, नुक्कड, देख भाई देख, रामायण, महाभारत यासारख्या दर्जेदार मालिकांनी भारतीय समाज मनावर सखोल आणि सकारात्मक परिणाम केला होता. याउलट आताच्या बहुतांश मालिका द्वेषावर किंवा अश्लिलतेचा कळस गाठणाऱ्या आहेत. गेल्या दीड दोन दशकांपासून बिग बॉसने भारतीय दूरचित्रवाणीवर बस्तान मांडले आहे. लोकांच्या घरातील भांडणे टिव्हीवर पाहण्याची संधी या मालिकेने लोकांना करून दिली आहे. आपल्याला दुसऱ्याच्या घरातील भांडणे ऐकण्याचा आणि पाहण्यात 'इंटरेस्ट' असतो. याच मानसिकतेचा फायदा घेत कलाविश्वातील टाकाऊ कलाकार आपल्या तथाकथित कलागुणांचे सादरीकरण या मालिकेत करत असतात. सवंग लोकप्रियता मिळवण्याच्या नावाखाली नितीमत्तेचे भान राखले जात नाही, हे दुर्देव.

काही काळापूर्वी बिग बॉसची लोकप्रियता एवढी होती की मलाही ते पाहण्याचा मोह आवरता आला नाही. त्याचे एक दोन भाग दोन चार मिनिटांसाठी पाहिले आणि डोकं सुन्न झाले. प्रारंभी या फसव्या जगात राहणाऱ्या लोकांच्या खऱ्या आयुष्याचे प्रतिबिंब दिसेल, असे वाटले होते. पण मनातील संभ्रम दूर झाला. तद्दन फालतू आणि त्याला पाहणारे लोक देखील अतिशय सुमार विचार करणारे असून एकंदरीत त्यांच्याकडे विचार करण्यासारखे काही राहिलेले नाही का? असे वाटू लागते. ही मालिका एवढी निकृष्ट वाटली की ती दोन मिनिटेही सहन झाली नाही. या मालिकेत दाखविला जाणारा गलिच्छपणा हा कोणत्याही सामान्य माणसासाठी असू शकत नाही.

प्रेक्षकांसाठी तो तर एखाद्या 'ट्रॉमा'पेक्षा कमी नव्हता. तरीही एक गोष्ट अस्वस्थ करते आणि ती म्हणजे आजही हा शो प्रचंड लोकप्रिय आहे. साहजिकच असंख्य लोक ते पाहत असतील. परंतु मला प्रेक्षकांना विचारायचे की तुम्ही या मालिकेत काय पाहता?

यात सर्वकाही स्क्रीप्टेड म्हणजे ठरलेले असते आणि ठरवून दिलेले असते. कोण कधी काय बोलणार, कोण कोणाला भिडणार, शिवीगाळ, धटिंगपणा, मस्ती, अश्लितता हे सर्व नियोजनबद्ध असते. यातील स्पर्धक एकमेकांवर तुटून पडतात, काही वेळा तर मारही लागतो. मुलगा काय, मुलगी काय ते सर्वच्या सर्व एकमेकांना मागे खेचण्यासाठी कोणत्याही पातळीपर्यंत घसरण्यास आतूर असतात. यात सर्व गोष्टींची पातळी सुटलेली असते. वास्तविक हा शो एका मोठ्या घरात होतो आणि तेथील स्पर्धक सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी आतूर झालेले असतात. यातील स्पर्धक किंवा खेळाडू पाहिले तर ते आताच मनोरुग्णालयातून सुटून इथे तर आला नाही ना? अशी शंका वाटू लागते.

बिग बॉसमध्ये राहण्यासाठी एवढे आचरट चाळे करावे लागतात की ते पाहून सामान्य व्यक्ती देखील आश्चर्यचकीत होतो. यातील स्पर्धक एवढा आरडाओरड करतात, की जणू त्यांच्या शेपटीवर कोणीतरी पाय दिलाय. एक दिवस माझ्या मोबाईलवर अचानक एक क्लिप आली. त्यात स्पर्धक दुसऱ्याला विचारतो की, क्या चल रहा है, आप की लाइफ मे. दुसरा स्पर्धक म्हणतो, सर्वकाही ठिक असते तर मी कशाला बिग बॉसमध्ये दिसलो असतो. याचाच अर्थ स्पर्धक सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी बिग बॉसमध्ये जाणे पसंत करतात. मला आश्चर्य वाटते की, सामान्य बुद्धिचा माणूस ही मालिका कशी पाहू शकतो? बिग बॉससारख्या फालतू शो पाहणाऱ्यांना एकप्रकारे स्वस्तात नशा दिली जात आहे. आज जे या कार्यक्रमांचे प्रेक्षक आहेत, त्यांच्यावर खरच उपचाराची गरज आहे.

कदाचित सर्वकाही ठरल्याप्रमाणे घडत असते. यातील सहभागी स्पर्धक वैयक्तिक जीवनातील काही प्रसंग शेअर करतात. अर्थात या गोष्टी सोप्या नाहीत. पण बहुतांश स्पर्धक लोकप्रियता मिळवण्यासाठी आणि 'टीआरपी'साठी बोलतात. परंतु त्यानंतर त्यांच्या खासगी आयुंष्यावर परिणाम होतो. समाज, कुटुंबांच्या टीकेला सामोरे जावे लागते. यापूर्वी अनेक स्पर्धकांना मानसिक आजारांना सामोरे जावे लागले आहे. मग 'बिग बॉस' याचा विचार करतो का? त्याचे थेट उत्तर अजिबात नाही, असेच आहे. बिग बॉस देखील असेच म्हणतो, की समाजाला जे आवडते, ते आम्ही दाखवतो. अशावेळी एक विचार येतो की प्रत्यक्षातही अनेक लोक असेही असतात की ते अनैतिक वर्तनातून, असभ्येतून आणि अतार्किक वागण्यातून लोकांचे लक्ष वेधून घेतात? त्याचवेळी सभ्य गोष्टी या चिल्लर वाटू लागतात. आपला समाज एवढा नादीस्ट आहे की, धिंगामस्तीशिवाय आयुष्य निरस वाटू लागते. या कारणामुळेच बिग बॉसची लोकप्रियता आज शिखरावर आहे आणि ती आपल्या समाजाचे वास्तव सांगण्याचे काम करत आहे.

बिग बॉसच्या मते, समाजावर परिणाम करणारेच यात सहभागी होतात. पण हे ऐकून हसू आल्यशिवाय राहत नाही. बिगबॉसमध्ये मला असा एकही व्यक्ती दिसला नाही की त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम झालेला आहे. याचाच अर्थ बिगबॉसध्ये प्रवेश करायचा असेल तर प्रसिद्ध असणे गरजेचे आहे. मग तो कोणत्याही मार्गाने प्रसिद्धी मिळवणारा असो. बिग बॉसमध्ये आजपर्यंत असा एकही स्पर्धक दिसला नाही की त्याने जागतिक पातळीवर भारताचे नाव गाजवले आहे. काही अपवाद असू शकतात आणि त्याबाबत सांगता येणार नाही. अशा स्थितीत भजनसम्राट अनुप जलोटा एकदा आपल्या शिष्यासमवेत बिग बॉसमध्ये गेले. तेथे ती शिष्या अनुप जलोटा यांची प्रेमिका असल्याचे दाखविले गेले. अनुप जलोटा यांचे नाव भजन विश्वात आदराने घेतले जाते आणि ते एक व्यक्ती म्हणून तितकेच नम्र आहे. परंतु ते बिग बॉसमध्ये गेल्याने त्यांची प्रतिमा ढासळली. अत्युच्च कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला किंवा वलय निर्माण करणाऱ्या व्यक्तीला तत्कालिन काळात माध्यम, मासिकात मुख्य स्थानी ठेवले जाते. परंतु त्यानंतर त्याची जागा अन्य कोणीतरी घेतो तेव्हा तो कोणत्या ना कोणत्या माध्यमातून लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न करत राहतो. हेच तर बिग बॉसला हवे की तुम्ही चर्चेत राहा. वास्तविक आजच्या काळात टिव्ही हा समाजाचा सर्वात मोठा शत्रू आहे. मालिका, चित्रपट, बातम्या, संगीत आदी गोष्टी असंवेदनशील, हिंसात्मक , प्रक्षोभक दिसतात. जाणीवपूर्वक या गोष्टी समाजासमोर आणल्या जात असल्याचे वाटते. जेणेकरून भारतीय नागरिकांची विचारशक्ती खुंटली जावी. त्यामुळे मुलभूत मुद्द्यावर विचार करण्यासाठी आवश्यक तो वैचारिक खाद्य पुरवठा समाजाला होत नाही. म्हणून या विषयावर समाजाच्या अग्रभागी राहणाऱ्या लोकांनी विचार करायला हवा. आपण सर्वांनी विचार करावा की आपण काय पाहतोय? आणि का पाहत आहोत? आपल्यां आयुष्यावर त्याचा काय परिणाम होतो. वास्तविक अशा प्रकारच्या कार्यक्रमातून त्याचा परिणाम अधिक राहतो. शेवटी चांगल्या कंटेटसाठी वेळ खर्च करायला हवा. आजघडीला आपल्या देशात एवढी बेरोजगारी आहे की रिकामे लोग काहीही करत वेळ गमावताना दिसत आहेत. 'बिग बॉस' तर पालकही मुलांसमवेत बसून आवडीने पाहत असतात. बाजाराचे आपले धोरण असते, विचार असतो. त्याला ठाऊक असते की काय विकायचे आहे. सर्वांना स्वातंत्र्य असते, काहीही पाहण्याचे. पण पाहणाऱ्यांनी एकदा तरी आत्मपरिक्षण करायला हवे की आपण 'बिग बॉस' का पाहतोय? ◆◆◆

## सिल्क स्मितावर येणार बायोपिक

साऊथ सिनेमात बोल्ड भूमिकांमुळे चर्चेत असलेली अभिनेत्री सिल्क स्मिताच्या आयुष्यावर आधारित एका सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. हा तिचा बायोपिक असणार आहे. यापूर्वी 'द डर्टी पिक्चर' हा चित्रपट सिल्क स्मिताच्या आयुष्यावर होता. ज्यात विद्या बालन मुख्यभूमिकेत होती. तर नसीरुद्दीन शाह, इमरान हाश्मी, तुषार कपूर यांच्या प्रमुख भूमिका होत्या.

२०११ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरला होता.

डिसेंबरमध्ये साउथ फिल्म इंडस्ट्रीची क्वीन सिल्क स्मिताच्या जयंतीला अभिनेत्रीच्या आयुष्यावर आधारीत बायोपिक फिल्मची घोषणा करण्यात आली. अभिनेत्री चंद्रिका रावने या बायोपिकचा टीझर शेअर केला. सुरुवातीला तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधींकडे मॅगझीन आणि वृत्तपत्र येतात. त्यामध्ये प्रत्येक ठिकाणी सिल्क स्मिताच्या बातम्या आलेल्या असतात. इंदिराजी झअ ला ही कोण आहे असं विचारतात? तेव्हा झअ म्हणतो, तुम्ही आयर्न लेडी आहात तर ही मॅग्नेटिक लेडी आहे.

**कोण आहे सिल्क स्मिता ?**

सिल्क स्मिताचा जन्म एलुरु (आंध्र प्रदेश) येथे झाला. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आपल्या १७ वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये पाच भाषांमध्ये ४५० चित्रपट केले होते. त्यांचे खरे नाव विजयालक्ष्मी विदलपती होते. त्याच वेळी तिचे स्टेजचे नाव सिल्क स्मिता झाले. ◆◆◆

## नीनांचे भयानक रूप

सध्या सोशल मीडियावर 'गंजी चुडैल' हा व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यात सुप्रसिद्ध अभिनेत्रीला ओळखणे देखील कठीण झाले आहे. ज्यामध्ये तिचा भयंकर लूक पाहायला मिळत आहे. 'पंचायत' फेम बॉलीवूड अभिनेत्री नीना गुप्ता ह्या या भयानक रुपमध्ये पाहायला मिळत आहे.

नीना गुप्तांच्या आगामी प्रोजेक्टमधील लेटेस्ट लूक सोशल मीडियावर समोर आले आहे. त्यात त्या 'गंजी चुडैल'च्या लूकमध्ये दिसत आहे. त्यांचीही अजब स्टाईल पाहून चाहतेही थक्क झाले आहेत. नीना गुप्ता यांच्या यूट्यूब इंडिया इंस्टाग्राम पेजवर एक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत ६५ वर्षांच्या नीना गुप्ता यांच्यासोबत शिवशक्ती सचदेव, इशिता मंगल आणि शक्ती सिधवानी दिसत आहेत. यांचा हा एक मजेशीर व्हिडिओ आहे. ◆◆◆

## उत्सुकता स्वप्नीलच्या 'जिलबी'ची

२० २४ वर्षात ज्याने दुहेरी भूमिका साकारून प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन केलं असा अभिनेता निर्माता स्वप्नील जोशी पुन्हा एक नवा चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येतोय ! जिलबी गोड ही.. गूढ ही अशी कल्पक टॅगलाईन असलेला हा चित्रपट नक्कीच काहीतरी वेगळा असणार यात शंका नाही.

स्वप्नीलने सोशल मीडिया वर पोस्ट करून त्याचा नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. मराठी चित्रपटसृष्टीत पहिल्यांदाच रहस्याचा थरार घेऊन येणारा जिलबी चित्रपट नक्की काय असणार या बद्दल सगळ्यांना उत्सुकता आहे. चित्रपटाच्या पोस्टर मध्ये स्वप्नील खूप जास्त वेगळ्या लूक मध्ये दिसतोय आणि या नव्या लूक ची जोरदार चर्चा देखील होताना दिसतेय.

'जिलबी' मधल्या भूमिके बद्दल बोलताना स्वप्नील सांगतो गेली काही वर्ष मी सातत्याने प्रयत्न करतोय की वेगळे चित्रपट आणि वेगळ्या गोष्टी असलेले चित्रपट करावे कारण मला स्वतःला वेगळ्या गोष्टी बघण आणि करण यात मज्जा येते कधीतरी हे वेगळेपण यशस्वी ठरत कधी ठरत नाही पण वेगवेगळ्या गोष्टी करण्यातल सातत्य मी जपतोय याचा आनंद आहे. अश्या प्रयोगशील भूमिकांमधून वाळवी असेल किंवा आता जिलबी असे चित्रपट घडतात म्हणून काम करताना देखील तितकीच मज्जा येते. जिलबी बद्दल सांगायचं झालं तर हा एक थरार आहे नाट्य आहे कमालीचे कलाकार आहेत आणि कहाणी मध्ये ट्विस्ट आहे असं म्हणायला हरकत नाही. माझी भूमिका ही आधीच्या सगळ्या रोल पेक्षा नक्कीच खूप वेगळी आहे त्यामुळे मला देखील खूप उत्सुकता आहे. पोस्टरला खूप उत्तम प्रतिसाद मिळाला असून ही एक अंडर कॉपची गोष्ट आता तुम्हाला सांगण्यासाठी सगळ्या भूमिकांना भेटवण्यासाठी आम्ही सगळेच खूप वाट बघतोय नवा लूक आणि नवा चित्रपट घेऊन स्वप्नील नव्या वर्षात प्रेक्षकांच्या भेटीला येणार तर आहे पण सोबतीने स्वप्नील ने या वर्षात बॅक टू बॅक वेगवेगळ्या विषयावर आधारित वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या आणि ही बाब नक्कीच कौतुकास्पद आहे. निर्मितीच्या सोबतीने अभिनय करून प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा सुपरस्टार स्वप्नील येणाऱ्या काळात अजून वेगवेगळ्या भूमिका साकारणार आहे ! ◆◆◆

■ किर्ती कदम

## रिंकू राजगुरूचा 'जिजाई'

अभिनेत्री रिंकू राजगुरूला 'सैराट' चित्रपटामुळे मोठे यश मिळाले. या चित्रपटाच्या यशानंतर तिने मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये देखील काम केले. यानंतर आता तिने नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे.

'जिजाई' असे या चित्रपटाचे नाव आहे. नुकतेच तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत चाहत्यांना ही माहिती दिली आहे.

नुकताच या चित्रपटाच्या मुहूर्ताचा कार्यक्रम पार पडला. झी स्टुडिओज व कोकोनट फिल्म्स यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये रिंकू राजगुरू हातात 'जिजाई' चित्रपटाच्या मुहूर्ताची पाटी घेऊन उभी असलेली दिसत आहे. हा फोटो शेअर करत झी स्टुडिओजने कॅप्शनमध्ये लिहिले, शुभारंभ झाला, आता आपला आशीर्वाद असू द्या! झी स्टुडिओज व कोकोनट फिल्म घेऊन येत आहेत रिंकू राजगुरूची प्रमुख भूमिका असलेला, नवा कोरा मराठी सिनेमा जिजाई. या पोस्टमध्ये रिंकूला टॅग केले आहे.

दरम्यान, रिंकू राजगुरू सोशल मीडियावर देखील सक्रिय असल्याचे पाहायला मिळते. अनेक फोटो ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. सैराट' नंतर तिने 'कागर', '२०० हल्ला हो', 'अनकहीं कहाँनिया', 'झुंड' आणि 'झिम्मा २' यासारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता तिच्या या नवीन चित्रपटाची प्रेक्षकांना उत्सुकता लागली आहे.

## मी रिटायर नाही

अभिनेता विक्रांत मेस्सीने टीव्ही मालिकांसह अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर त्याने सिनेसृष्टीत मोठे नाव कमवले आहे. मात्र अलीकडेच विक्रांतने चाहत्यांना मोठा धक्का दिला होता.

विक्रांतने त्याच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले होते की, हॅलो, गेली काही वर्षे खूप चांगली गेली. तुमच्या अद्भुत पाठिंब्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे आभारी आहे. पण जसजसा मी पुढे जात आहे तसतसे मला हे समजले आहे की, माझ्यासाठी स्वतःला एकत्र खेचून घरी परतण्याची वेळ आली आहे. एक पती, वडील आणि मुलगा आणि अभिनेता म्हणूनही. विक्रांतने पुढे लिहिले, येत्या २०२४ मध्ये, योग्य वेळ येईपर्यंत आम्ही एकमेकांना शेवटच्या वेळी भेटू. शेवटचे २ चित्रपट आणि अनेक वर्षांच्या आठवणी. सर्व काही आणि दरम्यान घडलेल्या सर्व गोष्टींसाठी पुन्हा एकदा धन्यवाद. त्याबद्दल मी तुमचा सदैव ऋणी राहीन, असं तो म्हणाला आहे. मात्र, यावर आता पुन्हा एकदा अभिनेत्यानं स्पष्टीकरण दिलं आहे. विक्रांत मेस्सीनं म्हटलं की, तो रिटायर होत नाहीय. तर, त्याला सिनेसृष्टीपासून एका मोठ्या ब्रेकची गरज आहे. विक्रांत म्हणाला की, मी रिटायर नाही, फक्त खपू थकलोय आणि एका मोठ्या ब्रेकवर जातोय. माझी तब्येतही ठीक नाहीय. लोकांनी माझ्या पोस्टमध्ये चुकीचं वाचलं आणि गैरसमज करुन घेतला. असं अभिनेता यावेळी म्हणाला.

विक्रांत मॅसीच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, २००४ मध्ये 'कहां हूँ मैं' या टीव्ही शोमधून करिअरला सुरुवात केली होती. यानंतर त्याने 'धरमवीर', 'बालिका वधू' आणि 'कुबूल है' सारख्या अनेक टीव्ही शोमध्येही काम केले. त्याने २०१३ मध्ये 'लुटेरा' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले, या सिनेमात त्याने देवदास मुखर्जीची भूमिका साकारली होती. गेल्या वर्षी रिलीज झालेला '१२ वी फेल' हा त्याच्या आयुष्यातला मोठा टर्निंग पॉइंट ठरला. नुकताच प्रदर्शित झालेल्य 'द साबरमती रिपोर्ट'ला देखील चांगलाच प्रतिसाद मिळत आहे. देशातील सर्वात वादग्रस्त घटनांपैकी एक असलेल्या गोध्रा घटनेवर आधारित या चित्रपटाचे राजकीय वर्तुळात खूप कौतुक झाले. यानंतर आता 'आंखों की गुस्ताखियां' आणि 'झिरो से रीस्टार्ट' हे त्याचे शेवटचे दोन चित्रपट पुढील वर्षी रिलीज होऊ शकतात.

## साऊथचा सुपरस्टार छत्रपतींच्या भूमिकेत

अभिनेता ऋषभ शेट्टीला 'कांतारा' चित्रपटामुळे मोठी लोकप्रियता मिळाली. यातील त्याच्या उत्कृष्ट अभिनयाने सर्वांचीच मनं जिंकली. यानंतर 'कांतारा २' चित्रपटाची देखील घोषणा करण्यात आली आहे. यादरम्यान आता ऋषभ शेट्टीचे आगामी चित्रपटाचे एक पोस्टर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. ज्यात तो एका ऐतिहासिक भूमिकेत पाहायला मिळणार आहे. या पोस्टरमध्ये ऋषभ शेट्टी छत्रपती शिवाजी महाराजांच्या रुपात दिसत आहे.

ऋषभच्या या आगामी चित्रपटाचे नाव 'द प्राईड ऑफ भारत : छत्रपती शिवाजी महाराज' असे आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन संदीप सिंह करत आहेत. या सिनेमाचा फर्स्ट लुक शेअर केल्यानंतर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेन्टचा वर्षाव केला आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता अभिनेता ऋषभ शेट्टी आणि दिग्गज दिग्दर्शक संदीप सिंह यांनी महाराजांची शौर्यगाथा रुपेरी पडद्यावर साकारण्याचा निर्णय घेतला आहे.

ऋषभ शेट्टीने आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये लिहिलं आहे की, 'आपला सन्मान आणि विशेषाधिकार, भारताचा महान योद्धा राजाची महाकाव्य गाथा प्रस्तुत करतोय. द प्राइड ऑफ भारत: छत्रपति शिवाजी महाराज. हा फक्त एक चित्रपट नाही तर, एका योद्धाच्या सन्मानार्थ एक लढाईचा युद्धघोष आहे, ज्यानं सर्व अडचणींविरुद्ध लढा दिला, बलाढ्य मुघल साम्राज्याच्या सामर्थ्याला आव्हान दिलं आणि कधीही न विसरता येणारा वारसा निर्माण केला.'

दरम्यान, छत्रपती शिवरायांची भूमिका साकारताना ऋषभला पाहण्यासाठीचाहतेही उत्सुक आहेत. मात्र त्यासाठी प्रेक्षकांना वाट पाहावी लागणार आहे. २१ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट रिलीज होणार असल्याचे या पोस्टरद्वारे सांगण्यात आले आहे.

### केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांचे शेतकऱ्यांना आश्वासन

# सर्व शेतमालाची खरेदी हमीभावाने!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** 'केंद्र सरकार सर्व शेतमाल किमान हमीभावाला खरेदी करील,' असे प्रतिपादन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी राज्यसभेत केले. प्रश्नोत्तरांच्या तासात हमीभावावरील प्रश्नाला त्यांनी उत्तर दिले.पंजाब-हरियाणा सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन पेटले असताना त्यांनी हमीभावाने शेतमाल खरेदीची माहिती दिली.

शेतकऱ्यांच्या आंदोलनातील हमीभाव ही मुख्य मागणी आहे. चौहान म्हणाले, शेतकऱ्यांचे सर्व उत्पादन किमान हमीभावाने खरेदी करण्यात येईल. हे मोदी सरकार असून, मोदींची गॅरंटी निभावण्याची ही हमी आहे. ज्या वेळी विरोधक सत्तेत होते, तेव्हा त्यांनी एम. एस. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारू शकत नाही, असे सांगितले होते. विशेष करून उत्पादन किमतीच्या ५० टक्के अधिक रक्कम देण्यास त्यांनी नकार दिला होता. पंतप्रधान मोदी यांनी २०१९ पासून उत्पादन किमतीवर ५० टक्के अधिक धरून किमान हमीभाव मोजण्याचा निर्णय घेतला होता.'

> किमान हमीभावाबद्दल माझ्या मनात सुस्पष्ट चित्र आहे. आम्ही शेतकऱ्यांना ५० टक्क्यांहून अधिक फायदा गृहीत धरून किमान हमीभाव ठरवू आणि शेतमाल खरेदीही करू.
> **– शिवराजसिंह चौहान,** केंद्रीय कृषीमंत्री

मोदी सरकार शेतकऱ्यांना शेतमालाला चांगल्या किमती देत असल्याचा दावा त्यांनी केला. गहू, ज्वारी, सोयाबीन उत्पादन किमतीहून अधिक ५० टक्के रक्कम देऊन तीन वर्षांपासून खरेदी केले जात आहेत, असे शिवराजसिंह चौहान राज्यसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नाच्या उत्तरादाखल म्हणाले.

**राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा**

## महाविकास आघाडी रडीचा डाव खेळत आहे : पवार

**मुंबई :** महायुतीला इतके मोठे बहुमत मिळाले आहे की आता ईव्हीएमचा विषय काढून महाविकास आघाडी रडीचा डाव खेळत आहे असा थेट हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर माध्यमांशी बोलताना केला. आम्ही महाविकास आघाडीमध्ये काम केले आहे. त्यामुळे ईव्हीएम मशीनला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. लोकसभेला ईव्हीएमने ३१ जागा महाविकास आघाडीला दिल्या त्यावेळी ईव्हीएम मशीन खूप चांगली होती. मात्र विधानसभेत महायुतीच्या बाजुने जनतेने कौल दिला तर ईव्हीएमला दोष द्यायला मविआने सुरुवात केली आहे. लोकशाहीत प्रत्येकाला वक्तव्य करण्याचा अधिकार आहे. परंतु महाविकास आघाडीच्या आमदारांना शपथ घेण्याचा उद्याचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल. तरच त्यांना सोमवारी कामकाजात भाग घेता येणार आहे. याबाबतची माहिती सर्वांना आहे. परंतु पहिल्याच दिवशी आम्ही संख्येने कमी असलो तरी आम्ही काही वेगळ करतोय. त्यांचे अस्तित्व दाखवण्याचा केविलवाणा प्रकार सुरू आहे असा खोचक टोलाही अजित पवार यांनी केला. सुरुवातीला महाविकास आघाडीचे आमदार शपथविधीसाठी सभागृहात बसले होते मात्र काही वेळाने ते सर्व बाहेर निघून गेले. इतकी वर्षे मी त्यांच्यासोबत होतो तेव्हा मी चांगला होतो. मी कुणासोबत उपमुख्यमंत्री म्हणून काम केले नाही ते सांगा अशी विचारणा करत मी जर दोषी असतो किंवा भ्रष्टाचारी असतो तर त्यांनी मला उपमुख्यमंत्री केलेच नसते. मात्र सध्या ते राजकीय भूमिकेतून मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला. परंतु मी योग्यठिकाणी न्याय मागत होतो आणि तो मला मिळाला आहे असेही अजित पवार यांनी पत्रकारांच्या प्रश्नांला उत्तर देताना स्पष्ट केले.

**» Selected**

## विरोधी आमदारांना शपथ घ्यावीच लागेल : छगन भुजबळ

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सुमारे दोन आठवड्यानंतर महायुती सरकारच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी पार पडला. आता आजपासून सुरू झालेल्या विशेष अधिवेशनात राज्यातील नवनिर्वाचित आमदारांच्या शपथविधीला सुरुवात झाली आहे. दरम्यान ईव्हीएमच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांतील आमदारांनी, आमदारकीची शपथ न घेण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादीचे (अजित पवार) येवल्याचे आमदार छगन भुजबळ विरोधी आमदारांच्या शपथ न घेण्याच्या भूमिकेवर बोलताना म्हणाले की, "मी १९८५ पासून आमदार आहे. त्यामुळे यापूर्वी असे काही घडल्याचे मला आठवत नाही. या आमदारांना उद्या शपथ घ्यावीच लागेल. जर नाही घेतली तर विधानसभेच्या अध्यक्षांच्या निवडीनंतर त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन या आमदारांना शपथ घ्यावी लागेल. या आमदारांना जर सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घ्यायचा असेल तर त्यांना शपथ घ्यावीच लागेल असे भुजबळ म्हणाले.



## निर्दयीपणाचा कळस, श्वानाचे हातपाय, तोंड बांधून पोत्यात भरले

**गोंदिया :** गोंदिया शहरा जवळील आशीर्वाद कॉलनीतील काही नागरिकांनी वस्तीतील ४ ते ५ कुत्र्यांना पकडले व त्यांचे पाय व तोंड बांधून पोत्यात टाकून एका पिकअप वाहनमध्ये टाकून जंगलात सोडून दिले.शहरातील श्वानप्रेमी सामाजिक संघटनेच्या काही लोकांना याची माहिती मिळाली असता त्यांनी घटनास्थळी पोहोचून विरोध केला. आणि स्वयंसेवी संस्थेने गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार केली.

# राज ठाकरे भाजपच्या हातातील खेळणे : संजय राऊत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या काळात राज ठाकरे म्हणाले होते की, मनसे सरकारमध्ये सहभागी असेल व भाजपचे देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील. त्यानंतर फडणवीस यांनी ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राज ठाकरेंनी ट्विट करत फडणवीसांचे अभिनंदन केले व या सरकारच्या निर्णयांना आपला पाठिंबा असेल असंही सांगितलं आहे.

त्याचबरोबर फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींमध्ये राज ठाकरेंना महायुतीत सहभागी करुन घेण्याबाबत सूचक वक्तव्य केलं. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते व खासदार संजय राऊत यांनी खोचक शब्दांमध्ये राज ठाकरेंना टोला लगावला आहे. संजय राऊत यांनी मुंबईत प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

राज ठाकरेंनी लोकसभेत खुलेपणाने आम्हाला पाठिंबा दिला, त्याचा खूप फायदा झाला. मात्र विधानसभेत त्यांना सामावून घेणे शक्य नसल्याने त्यांनी स्वबळावर लढून चांगली मते मिळवली. त्याचं व आमचं विचार जुळतात, यामुळे राज ठाकरेंना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सोबत घेऊ, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत म्हटलं आहे. यावर पत्रकाराने संजय राऊतांना प्रश्न विचारला. त्यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, राज ठाकरेंना खेळवलं जात आहे. राज ठाकरे भाजपाच्या हातातलं खेळणं झालं आहे, हे स्पष्ट दिसत आहे. फडणवीसांच्या विधानावरुन स्पष्ट झालंय की, राज ठाकरे भाजप सांगेल त्याप्रकारे भूमिका घेत आहेत. त्याबद्दल मला मत व्यक्त करायचं नाही.

## २ लाख रुपयांपर्यंत कर्ज विनातारण

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने शेतकऱ्यांना खुशखबर देत त्यांच्यासाठी मोठी घोषणा केली आहे. आरबीआयने शेतकऱ्यांसाठी कॉलेटरल फ्री लोनची (विना तारण कर्ज) मर्यादा वाढवली आहे. आता शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्ज विनातारण मिळणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये आरबीआयने ही मर्यादा १ लाख ६० हजारांपर्यंत केली होती. आता ५ वर्षांनी आरबीआयनं शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत ही मर्यादा २ लाखांपर्यंत वाढवली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शेतकऱ्यांना कृषी कर्ज देण्याबाबतचे नियम शिथिल केले आहेत. या अंतर्गत शेतकऱ्यांना आता कोणत्याही गॅरंटीशिवाय दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळणार आहे. सध्या ही मर्यादा १.६ लाख रुपये आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले की, महागाई आणि शेतीत वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत झालेली वाढ लक्षात घेता हमीमुक्त कृषी कर्जाची मर्यादा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला.

# अन्नदाता सुखी तेंव्हाच देश सुखी : राहुल गांधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंजाब आणि हरियाणा सीमेवरील शंभू सीमेवर शेतकऱ्यांचा दिल्लीकडे मोर्चा थांबवण्यात आला आहे. 101 शेतकऱ्यांच्या गटाने शुक्रवारी दिल्लीकडे पायी मोर्चा काढला. मात्र, काही मीटरनंतर त्यांना थांबवण्यात आले. हरियाणा पोलिसांनी या शेतकऱ्यांना पुढे न जाण्यास सांगितले आहे. अंबाला जिल्हा प्रशासनाने एकाच ठिकाणी 5 किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घातली आहे. दरम्यान, हरियाणाच्या सीमेवरही मोठ्या प्रमाणात सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत.

या प्रकरणावरून आता राजकारण सुरू झाले असून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी याबाबत वक्तव्य केले आहे. राहुल गांधींनी सोशल मीडिया साइट X वर लिहिले, 'शेतकऱ्यांना दिल्लीत येऊन त्यांच्या मागण्या सरकारसमोर मांडायच्या आहेत आणि त्यांच्या वेदना मांडायच्या आहेत. त्यांच्यावर अश्रुधुराचे नळकांडे डागून त्यांना विविध प्रकारे रोखण्याचा प्रयत्न करणे निंदनीय आहे. त्यांच्या मागण्या आणि समस्या सरकारने गांभीर्याने ऐकून घ्याव्यात. आज देशात दर तासाला एका शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागत आहे, यावरून अन्नदात्याच्या दुरवस्थेचा अंदाज येतो.

मोदी सरकारच्या टोकाच्या असंवेदनशीलतेमुळे पहिल्या शेतकरी आंदोलनात सातशेहून अधिक शेतकऱ्यांचे हौतात्म्य देश विसरलेला नाही. नी पुढे लिहिले की, 'आम्ही शेतकऱ्यांचे हाल समजतो आणि त्यांच्या मागण्यांना पाठिंबा देतो. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींनुसार एमएसपीची कायदेशीर हमी, शेतीमालाच्या सर्वसमावेशक खर्चाच्या दीडपट एमएसपी, कर्जमाफी यासह सर्व मागण्या सरकारने तातडीने लागू कराव्यात. अन्नदाता सुखी तेव्हाच देश सुखी होईल.

आम्ही तुम्हाला सांगतो की, शेतकऱ्यांच्या काही मागण्या आहेत ज्यात एमएसपी हमी कायदा करणे, स्वामीनाथन आयोगाच्या अहवालानुसार किंमत निश्चित करणे, शेतकऱ्यांची कर्जमाफी, भूसंपादन कायदा 2013 पुन्हा लागू करणे, वीज दुरुस्ती विधेयक 2020 रद्द करणे, चौकशीचा समावेश आहे. लखीमपूर खेरी घटनेतील दोषींना शिक्षा व्हावी, अशी मागणी केली आहे.

## खिशात मोबाईलचा स्फोट, शिक्षकाचा जागीच मृत्यू

**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातून धक्कादायक माहिती समोर आली. खिशात ठेवलेल्या मोबाईचा स्फोट झाल्याने एका शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, त्यांच्या शेजारी बसलेले नातेवाईकही जखमी झाले आहेत.

त्यांच्या जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगाव बांध येथे गुरुवारी संध्याकाळी ही घटना घडली. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली. सुरेश संग्रामे (वय, ५५) असे मृत्यू झालेल्या शिक्षिकेचे नाव आहे. तर, नत्थु गायकवाड (वय, ५६) असे गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. हे दोघेही डारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील सिरेगावटोला येथील रहिवासी आहेत.

## आमदारांनी केला निषेध...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा

**मुंबई :** अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षाच्या आमदारांनी आमदारकीच्या शपथ कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचे ठरवले आहे. सोलापूर जिल्ह्यातील मारकडवाडी येथे पोलीसांनी स्थानिक गावकऱ्यांना मतपत्रिकेवर मतदान घेऊ दिले नाही. या घटनेचा विरोधी पक्षाच्या आमदारांनी निषेध केला आहे.

# विरोधी पक्षातील आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभेत महायुतीच्या आमदारांचा शपथविधी सोहळा पार पडला आहे. दरम्यान आदित्य ठाकरे, नाना पटोले, जितेंद्र आव्हाड, विजय वडेट्टीवार आदी विरोधी पक्षातील आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतला आहे. आपल्या सगळ्यांना माहीत आहे की आमदारकीची शपथ आम्ही निषेध म्हणून घेतलेली नाही. जल्लोष, उत्साहाचं वातावरण असतं. त्यामुळे मनात हाच प्रश्न पडतो की जनतेने दिलेला कौल आहे की नवडणूक आयोगने दिलेला कौल आहे? असा प्रश्न आदित्य ठाकरेंनी विचारला आहे. एवढ्या बहुमताने सरकार निवडून आले आहे.

पण कुठलाही जल्लोष नाही. मध्यंतरीच्या काळात काँग्रेस किंवा आम्ही सगळे असू आम्ही निवडणूक आयोगाकडे आमचे प्रश्न उपस्थित केले आहेत. ते प्रश्न जनतेच्या मनातले प्रश्न आहेत. आम्ही राजकीय पक्ष म्हणून उपस्थित करतो तसंच मार्कडवाडी नावाचं गाव आहे तिथेही जनतेने मॉकपॉल मागितला होता. जनतेच्या मनातल्या शंका आहेत त्यासाठी हे तिथल्या लोकांनी मागितलं होते.

> **विश्वास कसा बसेल?**
> ● निकालांवर महाराष्ट्राचा विश्वास कसा बसेल हा प्रश्न आहेच. मार्कडवाडीने भूमिका घेतली ती बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची. बॅलेट पेपरवर निवडणूक घ्यायची असताना निवडणूक आयोग मधे आला. मला माझ्या गावात निवडणूक घ्यायची असेल तर पोलिसांचा काय संबंध? तुम्ही हे घ्यायचंच नाही असं का? गावातल्या लोकांच्या निर्णयावर वरवंटा फिरवण्याचं काम लोकशाहीने निवडून आलेले लोक करत असतील तर हे लोकशाहीने निवडूनच आलेले नाहीत.

बॅलेट पेपरवर किती जागा कोण जिंकतं आणि त्याविरोधात ईव्हीएमवर कोण कसे जिंकते हे आम्ही दाखवून दिलं आहे. मात्र त्या गावात कर्फ्यू लावण्यात आला.

२० जणांना अटक करण्यात आली. आम्ही हरलेले नाहीत. तरीही आमच्या मनात ईव्हीएमबाबत शंका आहे.

आम्ही जनतेचा मान राखून शपथ घेणार नाही. लोकशाहीचा मोर्चा आम्ही हाती घेत आहोत त्याची सुरुवात होते आहे. २०१४ पासून लोकशाही मारण्याचं काम सुरु आहे असं आदित्य ठाकरे म्हणाले. विधानसभेचे निकाल लागले आणि अनेक ठिकाणी अनेकांच्या मनात खदखद सुरु झाली.

पाच वाजताचं मतदानाचं प्रमाण वेगळे, त्यानंतरचं वेगळं असं कसं होऊ शकतं? १ ची बेरीच पाचवेळा केल्यावर ते पाच होतात सहा कसे आले? निवडणूक आयोगाने जो प्लान आखला होता त्यावर बोलावंच लागेल." असं जितेंद्र आव्हाड म्हणाले.

महाराष्ट्रातल्या जनतेच्या ज्या जनभावना आहेत ते पाहून आम्ही शपथ घ्यायची नाही हा निर्णय आम्ही घेतला आहे. महाराष्ट्रातलं सरकार जनतेतलं नाही. जनतेतलं सरकार असतं तर आझाद मैदानावर जनतेचे कोट्यवधी रुपये खर्च केले नसते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु आहेत आणि सरकार शपथविधीसोहळा हा राज्याभिषेकासारखा होत असेल तर आम्ही जनतेच्या बाजूच उभा राहणार आहे. आम्ही शपथ न घेण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. आम्ही उद्धव ठाकरे, शरद पवार, राहुल गांधींशी चर्चा करुन यापुढचा निर्णय घेऊ असे नाना पटोले म्हणाले आहेत.

# अखेर प्रतिक्षा संपली ! वंदे भारत स्लीपर ट्रेनचा पहिला प्रोटोटाइप तयार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वंदे भारत ट्रेन सध्या देशभरात लोकप्रिय होत आहे. आता त्याचे स्लीपर व्हर्जन लवकरच उपलब्ध होणार आहे. स्लीपर वंदे भारतच्या मदतीने प्रवाशांना झोपून आरामात लांबचा प्रवास करता येणार आहे. वंदे भारत स्लीपर ट्रेनचा पहिला प्रोटोटाइप तयार करण्यात आला असून तो ट्रॅकवर चाचणीसाठी तयार आहे. या ट्रेनची चाचणीही लवकरच सुरू होऊ शकते. पहिली स्लीपर वंदे भारत ट्रेन कोणत्या तारखेपासून धावणार हे रेल्वेने अद्याप अधिकृतरित्या जाहीर केले नसले तरी पुढील वर्षी जानेवारीत धावणारी दिल्ली-श्रीनगर वंदे भारत स्लीपर ट्रेन व्हर्जनमध्ये चालवली जाऊ शकते आणि ही ट्रेन पहिली स्लीपर व्हर्जन ट्रेन असेल, अशी अपेक्षा आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राज्यसभेत स्लीपर वंदे भारतबाबत अनेक महत्त्वाची माहिती दिली आहे.

यापूर्वी २ डिसेंबर रोजी रेल्वेमंत्र्यांनी 'वंदे भारत' या चेअर कारबाबत सांगितले होते की, सध्या अशा १३६ गाड्या धावत आहेत. यापैकी १६ वंदे भारत एक्स्प्रेस सेवा तामिळनाडू राज्यातील स्थानकांच्या गरजा पूर्ण करत आहेत. दिल्ली ते बनारस दरम्यान सर्वात लांब पल्ल्याच्या वंदे भारत ट्रेन धावत असून ती ७७१ किमी चे अंतर पार करते. राज्यसभेत अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लांब आणि मध्यम पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या नियोजित वंदे भारत स्लीपर ट्रेन आधुनिक सुविधा आणि प्रवासी सुविधांनी सुसज्ज आहेत.

# राज्याच्या विविध भागांत अवकाळी पावसाचा दणका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याच्या विविध भागांत अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे शेतकरी चिंतेत आहेत. या पावसाचा फळपिकांना मोठा दणका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जालना शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली.जिल्ह्यात अनेक भागांत गुरुवारपासून ढगाळ वातावरण होते. शुक्रवारी सकाळी अचानक अवकाळी पावसाचा जोर वाढला.

या पावसामुळे मोसंबी, द्राक्ष व डाळिंबासारख्या फळपिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. लातूर जिल्ह्यात देखील अनेक भागांत मध्यरात्री पावसाने हजेरी लावली. वातावरणात गारठा वाढला आहे. मध्यरात्री अचानक आलेल्या पावसामुळे लोकांची तारांबळ उडाली होती. अचानक झालेल्या पावसामुळे पिकांवर रोगराई पडण्याची शक्यता दाट झाली आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. जिल्ह्यातील काही भागांत रिमझिम पाऊस सलग दोन दिवस पडल्यामुळे आंबा, काजू उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. नाशिक शहरासह जिल्ह्याला दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने झोडपून काढले. शेतात पाणीच पाणी दिसत आहे.

**मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा; मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पाठपुराव्याला यश**

# बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेच्या अटी शिथिल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजने'चे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच दरमहा २० हजार रुपये सन्मान निधी देण्याच्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर प्रथेप्रमाणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रालयातील पत्रकार कक्षात येऊन पत्रकार परिषद संबोधित केली. यावेळी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी आवर्जून हा मुद्दा उपस्थित केला. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या ९ मे २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात सन्मान निधी वाढविण्याची घोषणा केली होती. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मार्च २०२४ मध्ये राज्य सरकारने राज्यातील निवृत्त पत्रकारांना देण्यात येणाऱ्या सन्माननिधी योजनेची दरमहा देण्यात येणारी रक्कम रुपये ११ हजारांऐवजी २० हजार रुपये करण्याचा शासन निर्णय (जीआर) जारी केला. मात्र त्याची अजूनही अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे अध्यक्ष डोईफोडे यांनी निदर्शनास आणले. महायुती सरकारने लाडक्या बहिणींचा सन्मान केला तसा सन्मान राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा करून त्यांनाही दिलासा द्यावा, अशी मागणी डोईफोडे यांनी केली. आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान निधीचे निकष शिथिल करण्याचा निर्णय तसेच २० हजार रुपये दरमहा सन्माननिधी देण्यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयावर येत्या आठवड्यात कार्यवाही केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या या घोषणेमुळे राज्यातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांना याचा फायदा होणार आहे. सन्मान निधीत वाढ करून ते ११ हजाराऐवजी २० हजार रुपये करण्यात यावे तसेच शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने पाठपुरावा केला होता.

#रा

### तळी भंडारसह भंडाऱ्याची उधळण : साधू संतांनी घेतले दर्शन

# येळकोट येळकोट जयमल्हार

**जेजुरी :** महाराष्ट्र राज्याचे ख्यातनाम कुळदैवत जेजुरीच्या खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सव यात्रेस शनिवारी भविकांनी गडावर गर्दी करीत कुलधर्म कुलाचार करीत आपल्या कुलस्वामीचे दर्शन घेतले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** महाराष्ट्र राज्याचे ख्यातनाम कुळदैवत जेजुरीच्या खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सव यात्रेस शनीवारी भविकानी गडावर गर्दी करीत कुलधर्म कुलाचार करीत आपल्या कुलस्वामीचे दर्शन घेतले तर खंडोबा देवाने याच दिवशी मली आणि मल्य या दोन क्रूर राक्षसांचा वध करून पृत्वीवरील मानवांचे धर्मसंस्कृती रक्षण केलं म्हणूनच दूर करून येऊन साधू संतांनी ही हरिद्रचूर्ण भंडाऱ्याची उधळण करुण देवाची प्रार्थना केली सहा दिवस सतत चालणाऱ्या या उत्सवाची सांगता तळीभंडारा पूजन दिवट्या नाचवून भाविकांनी सांगता केली चंपाषष्ठी करीता भोर विभगिय पोलिस उपा अधिक्षक. तानाजी बरडे यांच्या मार्गदर्शना खाली जेजुरी पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

जेजुरी आरोग्य विभागा कडून आरोग्यसेवक अनिल शिंदे सहकाऱ्यांनी भाविकांना मोफत आरोग्य सेवा दिली. चंपाषष्ठी हा देवाचा महत्वाचा पवित्र उत्सव मानला जातो या दिवशी महाभयंकर घनघोर युद्धातून जयाद्री पर्वतावर आलेल्या मार्तंड भैरव स्वरूप साक्षात खंडोबा देवास शांत करण्या कारित संपूर्ण देव दानव गण भक्त साधू संतांनी देवावर चाफ्याच्या फुलांचा आणि हरिद्रचूर्ण भंडाऱ्याचां वर्षाव केला. तो हा दिवस म्हणूनच ओळखला जातो.

येथील मंदिर संस्कृती उपासक गुरव वीर कोळी घडशी सेवक कर्मचारी वर्गाकडून स्थापन केलेल्या गेलीं वीस वर्ष सातत्याने सुरु असलेल्या अन्नकोट अन्नदान केले जात असते या करीता सतत सात दिवस मिष्टअन्न भोजन प्रसाद मोफत वाटप केली जाते लाखो भाविक याचा लाभ घेत असतात.

येथील पारंपरिक पुजारी वर्ग गुरव सातभाई बारभाई आगलावे दीडभाई हरिश्चंद्रे आणि सेवेकरी कोळी विर् घडशी दांगट, समाजाचे लांघि, मोरे कदम सह देवस्थान कर्मचारी वर्ग आयोजन करीत असतात या यात्रा करिता राज्य सह कर्नाटक, आन्ध्र मध्यप्रदेश येथून भाविक साधू संत हि दाखल झाले होते.

## वनपुरीच्या विद्यालयात विद्यार्थ्यांच्या बाजाराला प्रचंड प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील वनपुरी येथील श्री भैरवनाथ विद्यालयात शनिवारी सकाळी विद्यार्थ्यांनी आठवडे बाजार भरविला होता. सकाळी ८ ते १० या वेळात बाजार भरविला होता. केवळ दोन तासांत दहा हजार पेक्षा जास्त रकमेची उलाढाल झाली. पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मच्छिंद्र कुंभारकर यांच्या सह विद्यालयातील शिक्षक तसेच पालकांनी उपस्थित राहून वस्तू खरेदी केल्या. या शैक्षणिक वर्षात प्रथमच अशा प्रकारचा बाजार भरविला होता. त्यास प्रचंड प्रतिसाद दिला.

शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण वर्षभर सुरूच असते. त्याच बरोबर त्याच्या ज्ञानात भर पडून समाजातील व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी शिक्षक वेगवेगळे उपक्रम राबविण्याचा प्रायत्न करीत असतात. त्यातून त्यांना आपल्या कौटुंबिक परिस्थिती बरोबरच आर्थिक, व्यावहारिक, सामाजिक आदी गोष्टींची जाणीव होण्यास मदत होत असते. याच दृष्टीकोनातून वनपुरीच्या श्रीभैरवनाथ विद्यालयाच्या मुख्याध्यपिका लता बोकड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयात आठवडे बाजार भरविण्याची संकल्पना मांडली. सहशिक्षिका अनिता खेसे यांच्यासह क्रीडाशिक्षक जनार्धन कांबळे, दत्तात्रय सणस, सुरेश गोरे, सुहास वाघमारे, दत्तात्रय रोकडे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुर्यकांत काळे, सहशिक्षिका संगीता कुदळ, तसेच संदीप इंदलकर तसेच संदीप इंदलकर, कैलास कुंजीर आदींनी यास सकारात्मकता दाखवली.

शनिवारी सकाळी ८ ते १० यावेळेत प्रत्यक्षात बाजार सुरु झाला. यामध्ये विद्यार्थ्यांनी शेतातील कांदे, टोमाटो, व्हेज पुलाव, उपमा, चहा आदी प्रकारची खाद्य पदार्थ विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. अंजीर, पेरू, थंड पेये, लिंबू सरबत हेही ठेवण्यात आले होते.

### व्यावहारिक ज्ञान...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा

**सासवड :** वनपुरीच्या श्री भैरवनाथ विद्यालयात भरविलेल्या बाजारात वस्तू खरेदी करताना पुरंदर शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक मच्छिंद्र कुंभारकर, मुख्याध्यपिका लता बोकड आणि उपस्थित.

### Selected

## शिक्रापुरातील शिक्षकांकडून आदिवासींना उबदार कपडे वाटप

गणेशखिंड ता. खेड येथे उबदार कपडे व खाऊ वाटप प्रसंगी पदाधिकारी.

**शिक्रापूर :** येथील राहुल चातुर या शिक्षकाने मायेची ऊब फाउंडेशन स्थापन करुन दहा वर्षापासून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राहुल चातुर व कल्याण कोकाटे हे हिवाळ्यामध्ये उबदार कपडे वाटपाचा उपक्रम हाती घेतला असून सदर उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी व्यक्त केले आहे. शिक्रापूर ता. शिरुर येथील राहुल चातुर या शिक्षकाने स्थापन केलेल्या मायेची ऊब फाउंडेशनच्या माध्यमातून खेड तालुक्यातील गणेशखिंड येथे बालकांना उबदार कपडे व साहित्य वाटप वाटप करण्यात आले, यावेळी शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल पलांडे, जिल्हाध्यक्ष शांताराम नेहेरे, शिरूर तालुकाध्यक्ष अशोक कर्डिले, खेड तालुकाध्यक्ष नारायण करपे, शिक्षक पतसंस्थेचे सभापती चंद्रकांत खैरे, केंद्रप्रमुख संजय सुतार, सुरेश नाईकरे, फाऊंडेशनचे सदस्य युवराज थोरात, रामचंद्र नवले, खंडेराव होळकर, मुख्याध्यापक रामचंद्र शिंगाडे, संतोष मगर, रवींद्र निंबाळकर, संदीप शेलार आदी उपस्थित होते, दरम्यान गणेशखिंड व परिसरातील ऐंशी विद्यार्थ्यांना उबदार रजई, चादर, सॉक्स, कानटोपीचे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना शिरूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षक मायेची ऊब फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातू विद्यार्थ्यांसाठी करत असलेले कार्य प्रेरणा देणारे असल्याचे मत जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी व्यक्त केले. तर पुढील वर्षापासून मायेची ऊब परिवाराच्या या उपक्रमाचे स्वरूप आणखी विस्तृत करुन विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात येणार असल्याचे पदवीधर शिक्षक संघटनेचे अध्यक्ष अनिल पलांडे यांनी सांगितले.

## खेडमध्ये महसूल दफ्तर तपासणीची मोहीम जोरात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** पुणे अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांनी जिल्ह्यातील तलाठी आणि मंडलाधिकारी यांच्या दफ्तरतपासणीची मोठी मोहीम राबविली आहे. सातबारा अभिलेखातील फेरफारनोंदीची सोळाव्या दिवसी निर्गती करावी, तक्रारी, केसेस दोन महिन्यांत संपवाव्यात; अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशाराच मापारी यांनी दिला आहे. यामुळे खेड तालुक्यातील कामचुकार तलाठी, मंडलाधिकारी हादरले आहेत.

अपर जिल्हाधिकारी मापारी नव्यानेच कार्यरत झालेले आहेत. त्यांनी तत्काळ तलाठी व मंडलाधिकारी यांच्या कामकाजावर करडी नजर ठेवली आहे. जिल्ह्यातील सर्वांना पदभार घेतल्यानंतर मापारी यांनी तत्काळ सूचना दिल्या आहेत. सातबारा अभिलेखातील नागरिकांच्या फेरफारनोंदी तत्काळ निर्गती कराव्यात, नोंद धरल्यानंतर सोळाव्या दिवशी मंडलाधिकारी यांनी मंजूर करावी, फेरफारवर तक्रार आली असेल तर दोन ते तीन महिन्यांच्या आत केस निकाली काढावी, वरिष्ठांचे आदेशांची तत्काळ अंमलबजावणी करावी, नागरिकांच्या अर्जाची तत्काळ दखल घ्यावी, अशा सूचना देऊन कामात दिरंगाई केल्यास कारवाईस सामोरे जावे लागेल, असा इशाराच अपर जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याने काही कामचुकार आणि लफडेबाज तलाठी व मंडलाधिकारी पुरते भेदरले आहेत.

## मासूमच्या वतीने हिंसाविरोधी पंधरवड्याचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) संस्थेच्या माध्यमातून २१ वर्षांपासून पुरंदर, पारनेर व भोर तालुक्यात २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर असा जागतिक हिंसाविरोधी पंधरवडा साजरा केला जात आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रम राबविले जातात. यावर्षी देखील मासूम संस्थेच्या वतीने 'संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त' वेगवेगळ्या गावात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पुरंदर तालुक्यातील ७० गावांमध्ये तसेच शाळा, कॉलेजमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून या विषयाबद्दल जनजागृती करण्यात येत आहे. पुढील १५ दिवस वेगवेगळ्या गावात,शाळा, कॉलेजबरोबर मासूमचे कार्यकर्ते संवाद साधणार आहेत.

## मानगडाच्या महादरवाज्यातून महामानव व महाराजांस मानाचा मुजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** सह्याद्री खोऱ्यात दुर्ग भटकंती करित रायगड जिल्ह्यातील कोकणदिवा, मानगड आणि कुर्डुगड हे तीन गिरीदुर्ग २५ किलोमीटरची पदभ्रमंती करीत एका दिवसात सर करीत येथील टीम पॉइंट ब्रेक अॅडवेंचर्सच्या गिर्यारोहकांनी मानगडाच्या महादरवाज्यातुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वाफगाव (ता. खेड) येथील महाराजा यशवंतराव होळकर यांना मानाचा मुजरा केला. या मोहिमेत राजगुरुनगर आणि पुणे येथील गिर्यारोहक सहभागी झाले होते.

या मोहिमेची सुरुवात पहाटे पाच वाजता सांदोशी गाव (ता. महाड, जि. रायगड) येथुन झाली. सर्वात आधी कोकणदिवा, गड उतार होऊन मशिदवाडी मानगड (ता. माणगाव, जि. रायगड) येथे जाऊन मानगड, तर सर्वात शेवटी उंब्रे गाव (ता. माणगाव, जि. रायगड) येथे जाऊन कुर्डुगड सर करण्यात आला.

गिर्यारोहकांची मानसिक आणि शारीरिक कसोटी पाहणारी भटकंती, घनदाट जंगलातील चकवा देणाऱ्या पाऊलवाटा, रात्रीच्या काळोखातील पायपीट, दुर्गम परिसर अश्या सर्व आव्हानांना सामोरे जात टीम पॉइंट ब्रेक अॅडवेंचर्सच्या जॅकी साळुंके, रोहिदास भऊड, महेश मोरे, पल्लवी चाळके, सुलेमान मुलाणी, विवेक गायकवाड, रोहित माने, कल्पेश तोरस्कार, विघ्नेश गावणंग, सुरेश सावंत, मंदार मोहिले, गणेश बागुले, डॉ.अदित्य शर्मा, स्मिता पेडणेकर आणि डॉ. समीर मिसे यांनी मोहिम सुरक्षितपणे सफल केली.

## 'आधुनिक अध्यापन कौशल्ये व पद्धती' या विषयावर विशेष कार्यशाळा

**पुणे :** रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ (RTMSSU) यांच्या वतीने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) अंतर्गत 'आधुनिक अध्यापन कौशल्ये व पद्धती' या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT) मधील प्रा. योगेश हांडगे, प्रा. पराग जांभुळकर, डॉ. श्वेता धर्माधिकारी आणि प्रा. मृणाल मुळे यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. अपूर्वा पालकर, कुलगुरू, RTMSSU यांनी 'शैक्षणिक प्रणालीतील नवकल्पना व स्टार्टअप्स' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक अध्यापन कौशल्ये विकसित करण्यासाठी विविध दृष्टिकोन मांडले.

कार्यशाळेत शिक्षकांसाठी प्रभावी अध्यापन पद्धती, विद्यार्थी सहभाग वाढवण्यासाठीच्या युक्त्या आणि केस स्टडी पद्धतीचा शैक्षणिक क्षेत्रातील उपयोग यावर सखोल चर्चा करण्यात आली. हार्वर्ड बिजनेस स्कूलसारख्या संस्थांच्या उदाहरणांचा संदर्भ देऊन केस स्टडी पद्धतीचे महत्त्व पटवून देण्यात आले.'केस स्टडी विश्लेषण: अध्यापन पद्धती' या सत्रात विविध गटचर्चा व कृती कार्यक्रमांद्वारे केस स्टडी कशी तयार करावी आणि ती कशी निवडावी, यावर मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रासाठी भावेश कोठारी (CEO, आय स्पार्क), निलेश सरवटे, आणि डॉ. अमर सक्सेना ( RTMSSU) यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

### खरपुडी देवस्थानाचा वाद मिटता मिटेना..

## चंपाषष्ठी निमित्त लाखो रुपयांचे नुकसान...अन्नदानही रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खरपुडी खुर्द (ता खेड ) येथील खंडोबा देवस्थान ट्रस्टचा वाद गेले चार वर्ष मिटत नसल्यामुळे देवस्थानचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. चंपाषष्ठी निमित्त काही लाख रुपयाचे नुकसान झाले असून भाविक नाराजी व्यक्त करत आहे.

खरपुडी खंडोबा महाराष्ट्र राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणारे देवस्थान आहे. दरवर्षी माघ पौर्णिमा, चैत्र पौर्णिमा , चंपाषष्ठी यात्रेनिमित्त खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक येतात.अनेक भाविकांचे कुलदैवत असल्यामुळे येथे नेहमी भाविकांची गर्दी असते. देवस्थानला तीर्थक्षेत्राचा क दर्जा प्राप्त आहे. गेल्या चार वर्षापासून देवस्थान ट्रस्टचा भोंगळ कारभार सुरु आहे. बोगस शिक्के व बनावट पावती पुस्तके छापून वर्गणी गोळा केल्याचा आरोप झाला. गावातील ग्रामस्थांचा एकोपा नसल्यामुळे परस्पर तीन ट्रस्ट मंडळ तयार करून मंदिरावर आम्हीच ट्रस्ट मंडळ असा दावा ठोकला जात आहे. सध्या कार्यरत असलेले ट्रस्ट मंडळाचा मनमानी कारभार सुरु आहे. दुसऱ्या ट्रस्ट मंडळाने मागील यात्रेत मंदिर परिसरात भाविकांकडून देणगी स्वीकारली म्हणून हे मंदिर परिसरात खंडणी मागतात असा पत्रव्यवहार पोलीस ठाण्यात करण्यात आला होता.

परपस्परविरोधी तक्रार धर्मदाय आयुक्ताकडे दाखल आहेत. मात्र देवस्थानाचा वाद मिटत नसून भाविकांमध्ये प्रंचड नाराजी आहे. गेल्या दोन वर्षात मंदिर परिसरात कुठलीही विकासकामे झाली नाही. गावाचे मतभेद टोकाला गेल्यामुळे गेल्या चार वर्षात एकही यात्रा, सोमवती आमवस्या,चंपाषष्टी सुरळीत पार पडली नाही. पोलिसांच्या मदतीने वाद तात्पुरता मिटतो. गेल्या चार वर्षात सुमारे २५ ते ३० लाख रुपायांचे नुकसान झाले असल्याचे ग्रामस्थ सांगतात. दि. ७ डिसेंबर रोजी चंपाषष्ठी निमित्त भाविकांनी मंदिरावर दर्शनासाठी गर्दी केली होती. मात्र वादामुळे भाविकांकडून देणगी स्विकारण्यात आली नाही. त्यामुळे सुमारे तीन लाख रुपायांचे नुकसान झाले. तसेच दरवर्षी मंदिर परिसरात अन्नदानाचा कार्यक्रम होतो. मोकळे क्षेत्र नसल्याने नीरा परिसरातील नीरा - शिवतक्रार, गुळूंचे, राख,पिंपरेखुर्द, थोपटेवाडी, जेऊर येथील शेतक-यांमध्ये मोठे आर्थिक नुकसान होत असल्याने मोठी नाराजी पसरली आहे. त्यामुळे नीरा परिसरातील शेतक-यांची अवस्था आई जेवू देईना आणि बाप भिक मागू देईना अशी झाली असल्याची चर्चा नाराज शेतकरी वर्गात सुरू आहे.

दरम्यान, शासनाने पुढील वर्षी तरी साखर कारखान्यांना गाळप हंगामास ऑक्टोंबरमध्ये परवानगी द्यावी अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहे.

## माळेगाव येथे आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** अनंतराव पवार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव व एचडीएफसी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाच्यावतीने आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजित करण्यात आले.

यावेळी माळेगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी बालाजी लोंढे, आरोग्यवर्धिनी केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ संपदा हिंगोले, अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन लोखंडे, एचडीएफसी बँकेचे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक सागर शिंदे, गटनिदेशक संतोष सपकळ, सचिन देवकते, निवास काळे आदी उपस्थित होते.

डॉ हिंगोले यांनी प्रशिक्षणार्थींना रक्तदानाचे महत्व नमूद करुन तरुणांनी तीन महिन्याला एकदा रक्तदान करण्याचे आवाहन केले. रक्तदान करतांना रक्तदात्यांच्या मनामध्ये उद्भवणाऱ्या विविध शंकाचे त्यांनी निरसन केले.

श्री. लोखंडे यांनी शिबिरास भेट देवून रक्तदान व आरोग्य तपासणी शिबीराचे कौतुक केले. आजच्या बदलत्या जीवनशैलीमध्ये नागरिकांनी नियमितपणे तपासणी करावी, असेही श्री. लोखंडे म्हणाले या रक्तदान शिबिरात प्रशिक्षणार्थ्यांनी एकूण 68 युनिट रक्तदान केले.

### नीरा परिसरातील शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता

## कारखाने उशिरा सुरू झाल्याने शेतकऱ्यांना दुहेरी फटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** राज्य शासनाने साखर कारखाने सुरू करण्यास यंदा १५ नोव्हेंबरला परवानगी दिल्याने साखर कारखान्यांचा दरवर्षापेक्षा एक महिना उशिराने गाळप हंगाम सुरू झाला आहे. शासनाच्या चुकीच्या निर्णया मुळे ऊसतोड लांबल्याने शेतक-यांना चार पैसे मिळवून देणारी रब्बी हंगामातील दुबार पिके घेता येत नाही तर दुसरीकडे उशिरा तुटून जाणा-या ऊसाचे टनेज घटण्याची शक्यता असल्याने शेतक-यांना दुहेरी मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे.
परिणामी, नीरा परिसरातील

> शासनाने ऊस गाळपास उशिरा परवानगी दिल्याने तुटणाऱ्या उसाच्या तोडीस विलंब होणार असल्याने टनेज मध्ये घट होऊ शकते, शिवाय ऊस तुटून गेल्यानंतर गहू पिकाचे नियोजन विस्कळीत झाले आहे. तसेच गरवी कांदा, टोमॅटो या पिकांचे नियोजन कोलमडून जाणार आहे.त्यामुळे दुसरे कोणते ही पिक शेतकरी घेऊ शकत नसल्याने आर्थिक अडचणीत येईल."
>
> — दिपक उर्फ कांचन निगडे देशमूख, शेतकरी, गुळूंचे

१५ नोव्हेंबरपासून साखर कारखान्यांना गळीत हंगाम सुरू करण्यास परवानगी दिली. त्यामुळे ऑक्टोंबर मध्ये तुटून जाणा-या आडसाली ऊसाची तोड उशिरा सुरू झाली. मात्र बहुतांश शेतकरी ऊसाचे टनेज मध्ये घट येण्याची शक्यता असल्याने शेतक-यांमध्ये मोठा आर्थिक फटका बसण्याची भिती आहे.

रब्बी हंगामातील बहुतांश पिकांचा पेरा १५ डिसेंबर पर्यंत केला जातो.त्यामुळे साखर कारखाने सुरू होऊन २३ दिवस झाल्याने बहुतांश शेतक-यांच्या ऊसास तोड आली नसल्याने चार पैसे मिळवून देणारी रब्बी हंगामातील गहू, हरभरा,कांदा अशा प्रकारची दुबार पिके घेण्यास

"विनोद कांबळी हा कदाचित मला भेटलेल्या सगळ्यात छान मुलांपैकी एक होता. विनोदकडे चेंडू मारण्याची अप्रतिम क्षमता होती. मला राजकोटमधील एक सामना आठवतो, विनोदने त्या सामन्यात श्रीनाथ आणि कुंबळेविरुद्ध १५० धावा केल्या होत्या. — राहुल द्रविड

त्यावेळी मी क्रिकेटचा गांभीर्याने विचार केला आणि मग मी पुढे जात होतो. मी कठोर मेहनत केली आणि मी एक मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगा असल्याने मला खूप अभिमान आहे की माझ्यामुळे माझे वडील खूश आहेत. — नितीश रेड्डी

### निम्मा संघ पाठवला माघारी : ऑस्ट्रेलियाची दादागिरी

# भारतीय संघ संकटात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ॲडिलेड :** मिचेल स्टार्कच्या ६ विकेट्सनंतर ट्रॅव्हिड हेडने पुन्हा एकदा टीम इंडियाची डोकेदुखी वाढवली. Pink Ball Test चा दुसरा दिवस वादग्रस्त राहिला. मिचेल मार्शला नाबाद देण्यावरून वाद सुरू झाला ते हेड व मोहम्मद सिराज यांच्या शाब्दिक बाचाबाचीने संपला. पण, एडिलेडवर यजमान ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व राहिले. भारताच्या १८० धावांच्या प्रत्युत्तरात त्यांनी ३३७ धावा करताना १५७ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात भारताचे ५ फलंदाज स्वस्तात माघारी परतले आहेत.

जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखाली पर्थ कसोटी जिंकणारा भारतीय संघ एडिलेडवर रोहित शर्माच्या कॅप्टनशीपमध्ये पुर्णपणे बदललेला दिसतोय. फलंदाजांनी पुन्हा एकदा माना टाकल्या, परंतु गोलंदाजीचा संपूर्ण भार जसप्रीत बुमराह खांद्यावर घेऊन फिरताना दिसतोय. मोहम्मद सिराजनेही ४ विकेट्स घेतल्या, परंतु त्याला गोलंदाजीत सातत्य राखता येत नव्हते. त्यामुळेच त्याच्यातला आक्रसताळेपणा वाढलेला दिसला.

काल मार्नस लाबुशेनला त्याने बॉल फेकून मारल्यानंतर आज त्याने ट्रॅव्हिस हेडसोबत हुज्जत घातली. दोघांनी एकमेकांसाठी अर्वाच्च भाषा वापरला. सिराजला अम्पायरनी ताकिद दिली आहे. त्याआधी मिचेल मार्शच्या विकेटवरून मैदानावरील वातावरण तापले होते. बॉल आणि पॅडचा आधी संपर्क झाला होता आणि त्याचवेळी बॅट बॉलजवळ आली होती. तरीही तिसऱ्या अम्पायरने फलंदाजाच्या बाजूने निकाल दिल्याने वादाला तोंड फुटले होते. पण, मार्शला ९ धावांवर नंतर माघारी जावे लागल्याने तो निर्णय महागात पडला नाही.

ऑस्ट्रेलियाकडून नॅथन मॅकस्वीनी ( ३७) व मार्नस लाबुशेन ( ६४) यांच्यानंतर हेडने एकट्याने खिंड लढवली. अर्थात सिराज व ऋषभ पंत यांनी झेल सोडून त्याला साथच दिली. त्यामुळे हेडचे मनोबल उंचावले आणि त्याने १४१ चेंडूंत १७ चौकार व ४ खणखणीत षटकारांसह १४० धावांची खेळी साकारली. सिराजच्या यॉर्कवर हेडचा त्रिफळा उडाला आणि दोघं भांडू लागले. हेडच्या विकेटनंतर ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव ३३७ धावांवर गुंडाळला गेला.

### परमार ऑल स्टार्स, जॅग्वार्स,

## एएसआर स्ट्रायकर्स, द व्हर्लविंड्स संघ उपांत्य फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुना क्लब लिमिटेड आयोजित व मनिषा कन्स्ट्रक्शन प्रायोजित तिसऱ्या पीसीबीएसएल(पुना क्लब बिलियर्ड्स अँड स्नूकर लीग) स्पर्धेत साखळी फेरीत परमार ऑल स्टार्स, जॅग्वार्स, एएसआर स्ट्रायकर्स, द व्हर्लविंड्स या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पुना क्लब स्नूकर हॉल येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत जॅग्वार्स संघाने ओबेरॉय किंग्स संघाचा ३-२ असा पराभव केला. विजयी संघाकडून राजेश जंदियाल, तुषार आसवानी, राजीव खांडके, फारुख मोदी यांनी सुरेख कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात एएसआर स्ट्रायकर्स संघाने संघवी शुटर्स संघाचा ३-२ असा पराभव करून आगेकूच केली. एएसआर स्ट्रायकर्स संघाकडून रुसी मरोलिया, अयान खान, मृणाल शहा, दशमेश कालरा यांनी अफलातून कामगिरी केली. अन्य लढतीत हुजेफा ताहेरभॉय, रोहित चोप्रा, सनत परमार, प्रशांत राजघरिया यांच्या सुरेख खेळीच्या जोरावर परमार ऑल स्टार्स संघाने बॉल ब्रेकर्स संघावर ३-२ असा विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली.

## अनमोल खारबकडून गतविजेतीचा पराभव

**नवी दिल्ली :** भारताची उदयोन्मुख बॅडमिंटन खेळाडू अनमोल खारब हिने शांत आणि संयमी खेळ करत गतविजेत्या थायलंडच्या लालिनर चैवान हिचा पराभव करून गुवाहाटी मास्टर्स सुपर १०० श्रेणी बॅडमिंट स्पर्धेत पराभव करून उपांत्य फेरी गाठली. अनमोलने हा धक्कादाय विजय उपांत्यपूर्व फेरीत मिळवला. तिने २१-१२, २२-२४, २२-२० अस पराभव केला. हा सामना एक तास १४ मिनिटे रंगला. ही लढत तिने दु गेममध्येच जिंकली असती; परंतु थोडक्यात हा गेम गमवल्यामुळे तिर तिसऱ्या गेममध्ये लढावे लागले. दुसऱ्या गेममध्ये अनमोल ११-१६ अ पिछाडीवर होती, त्यावरून तिने १६-२० अशी लढत दिली होती. अखे २२-२४ अशा फरकाने हा गेम गमावला. उपांत्य फेरीत अनमोलचा स मानसी सिंग हिच्याविरुद्ध होईल. मानसी सिंगने उपांत्यपूर्व सामन्यात थायलंडच्या यतावीमीन काटेकलिंग हिच्यावर २२-२०, २१-१८ अशी गेममध्ये मात केली.

## शांभवी महाराष्ट्र राज्य शुटिंग चॅम्पियन २०२४ ची मानकरी

**पुणे :** बालेवाडी, पुणे येथे झालेल्या ३१ व्या महाराष्ट्र राज्य शुटिंग चैम्पियनशिप स्पर्धा २०२४ मध्ये ६५० पैकी ६३५.१ गुण करुन शांभव श्रावण क्षिरसागर हिने सीनियर जूनियर यु व सब यूथ या चार प्रकारात ४ गोल्ड मेडल ४५०००/- रुपये कॅश प्राइज़ मिळवून शां ही महाराष्ट्र स्टेट चैम्पियन २०२४ ची मानव ठरली आहे .शांभवी ही मुळची पुण्यातील असून सध्या ती कोल्हापूर येथे राहते. ३१ व महाराष्ट्र राज्य शूटिंग चैम्पियन स्पर्धा २०२ आयोजन पुण्यातील बालेवाडी क्रीडा संकु एक डिसेंबर पासून सुरू आहे .शांभवी क्षीर हिने सिनिअर ज्युनियर व सब यूथ अशा ए चारीही गटा मध्ये सुवर्ण पदक मिळवले अ ४५ हजार रुपयाचे विशेष पारितोषिक ही पटकावले आहे .अतिशय जिद्द आणि मेहनतीच्या बळावर तिने हे यश संपादन केले असून पुण्यातील क्रीडाप्रेमीनी व मार्गदर्शकांनी तिचे कौ करून अभिनंदन केले आहे .

## 5 लाख धावा! इंग्लंडचा कसोटी क्रिकेटमध्ये वर्ल्ड रेकॉर्ड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** इंग्लंड आणि न्यूझीलंड संघांमध्ये तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जात आहे. पहिल्या कसोटीत इंग्लंडने शानदार विजय मिळवला. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखाली संघाने पहिल्या सामन्यात जबरदस्त विजय मिळवला होता आणि मालिकेत १-० ने आघाडी घेतली होती. आता उभय संघांमधील दुसरी कसोटी वेलिंग्टन येथे खेळवली जात आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी इंग्लंडने कसोटीत ५ लाख धावा पूर्ण करून नवा विश्वविक्रम केला. अशी कामगिरी करणारा हा जगातील पहिला संघ ठरला आहे. इंग्लंडने शनिवारी ७ डिसेंबर रोजी दुसऱ्या डावात ही कामगिरी केली.

इंग्लंड संघाने कसोटी क्रिकेटमध्ये ५ लाख धावांचा टप्पा गाठत नवा इतिहास लिहिला आहे. इंग्लंडने १०८२ कसोटी सामन्यांमध्ये आणि ७१७ क्रिकेटपटूंच्या साथीने ही कामगिरी आपल्या नावे केली आहे. इंग्लंड कसोटीत सर्वाधिक धावा करणारा संघ आहे. इंग्लंडनंतर कसोटीत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे. कांगारू संघाने कसोटी क्रिकेटमध्ये आतापर्यंत ४,२८,७९४ धावा केल्या आहेत. तर भारतीय संघाने कसोटी क्रिकेटमध्ये २,७८,७०० धावा केल्या आहेत. इंग्लंडच्या फलंदाजांनी आतापर्यंत ८९२ कसोटी शतकं केली आहेत. भारतीय फलंदाजांनी आतापर्यंत ५५२ कसोटी शतकं झळकावली आहेत.

## एकेरीत भारताच्या अर्जुन राठी, रिशीता रेड्डी बासिरेड्डी यांचा अंतिम फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयटीएफ ग्रेड ३ कुमार १८ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या गटात रिशीता रेड्डी बासिरेड्डी हिने तर, मुलांच्या गटात अर्जुन राठी या भारतीय खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीत मुलांच्या गटात रशियाच्या अॅलन आयउखानोव व फेडर अल्तुखोव यांनी, तर मुलींच्या गटात जपानच्या कोकोमी सायटो व रिओ वाकायामा यांनी विजेतेपद संपादन केले.

डेक्कन जिमखाना टेनिस कोर्ट,येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉच्या उपांत्य फेरीत मुलांच्या गटात भारताच्या अर्जुन राठी याने अमेरिकेच्या विहान रेड्डी चा ७-५, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. हा सामना १ तास ४५ मिनिटे चालला. सामन्यात पहिल्या सेटमध्ये ५-२ अशा फरकाने पिछाडीवर असताना अर्जुनने जोरदार कमबॅक करत विहानची आठव्या, दहाव्या व बाराव्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व हा सेट ७-५ असा जिंकून आघाडी घेतली.

दुसऱ्या सेटमध्ये देखील अर्जुनने आपले वर्चस्व कायम ठेवत विहान विरुद्ध हा सेट ६-२ असा सहज जिंकून विजय मिळवला. दुसऱ्या उपांत्य फेरीच्या लढतीत फ्रांसच्या पाचव्या मानांकित ऍरोन गॅबेट याने रशियाच्या फेडर अल्तुखोव्हचा ७-५, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. दुहेरीत मुलांच्या गटात अंतिम फेरीत रशियाच्या अॅलन आयउखानोव व फेडर अल्तुखोव यांनी दुसऱ्या मानांकित न्यूझीलंडच्या कोडी ऍटकिन्सन व अमेरिकेच्या रोशन संतोष यांचा ७-५, ७-६(७) असा पराभव करून विजेतेपद पटकावले. मुलींच्या गटात अंतिम फेरीत जपानच्या कोकोमी सायटोने रिओ वाकायामाच्या साथीत भारताच्या रिया सचदेवा व जपानच्या आओई वटनाबीचा ६-३, ३-६, १०-८ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

## महाराष्ट्राचे माजी क्रिकेटपटू अन्वर शेख यांचे पुण्यात निध

**नाशिक :** महाराष्ट्र क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू अन्वर शेख यां पुणे येथे निधन झाले. नाशिक येथे क्रिकेट खेळायला सुरुवात करता त्यांनी पुढे आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर महाराष्ट्राच्या रणजी संघात स्थान मिळविले होते. जलदगती गोलंदाजाच्या भूमिकेतून त्यां संघासाठी अनेक सामन्यांमध्ये भरीव योगदान दिले होते. रणजी सामन्यात महाराष्ट्र संघाकडू खेळताना १०० बळी घेणारा पहिला नाशिक खेळाडू होण्याचा बहुमान जलदगती गोलंदाज अन्वर शेख यांनी पटकावला होता. १९६५ सा पदार्पण करणाऱ्या अन्वर यांनी पुढे बारा वर्षे आघाडी गोलंदाजीची समर्थपणे धुरा वाहिली. त्यांनी ५५ सामन्यांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधि केले आणि १४८ बळी टिपले. यामध्ये पाच किंवा अधिक बळी ३ वेळ टिपतांना संघाच्या यशात हातभार लावला होता. ५५ धावा देतांना ५ ग बाद करण्याचा त्यांची सर्वोत्तम कामगिरी होती. भेदक गोलंदाजीत अ चुणूक दाखवितांनाच शेवटच्या फळीतील फलंदाज म्हणून त्यांना फ संधी मिळाली नाही. तरी त्यांनी १४.५४ च्या सरासरीने ७७१ धावा के

## भारताचा अंडर-१९ संघ आशिया चषकाच्या अंतिम फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पुरुष अंडर-१९ आशिया कपच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा पराभव केला आहे. भारतीय संघाने श्रीलंकेचा ७ गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत दणक्यात प्रवेश केला. भारताच्या या शानदार विजयात १३ वर्षीय वैभव सूर्यवंशीने महत्त्वपूर्ण योगदान दिले. वैभवने २४ चेंडूत अर्धशतक झळकावत भारताला विजयाच्या जवळ नेले. वैभवच्या या खेळीपूर्वी भारताच्या गोलंदाजांनी श्रीलंकेच्या धावांवर अंकुश ठेवला.

श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय संघासाठी योग्य ठरला नाही आणि श्रीलंकेचा संघ संपूर्ण ५० षटकेही खेळू शकला नाही. श्रीलंकेचा संघ ४६.२ षटकांत अवघ्या १७३ धावांवर सर्वबाद झाला.अशारितीने श्रीलंकेने भारताला विजयासाठी १७५ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरात भारताची जबरदस्त सुरूवात झाली.

वैभवने अवघ्या ३६ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ६७ धावांची तुफान खेळी केली. सलामीवीर आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी यांच्यात पहिल्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी झाली. आयुष म्हात्रे ९व्या षटकात ३४ धावा काढून बाद झाला. यानंतर वैभव सूर्यवंशीने १०व्या षटकात आपले शानदार अर्धशतक पूर्ण केले. भारतीय संघाची धावसंख्या १० षटकांत १०० च्या पुढे गेली होती.

वैभव सूर्यवंशी जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत होता पण १४व्या षटकात तो प्रवीण मनीशाच्या गोलंदाजीवर बाद झाला.

### इंडियाची अवस्था पाहून शास्त्री चिंतित

**नवी दिल्ली :** जसप्रीतवरील वाढत जाणारे दडपण माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांची चिंता वाढवतेय. त्यांनी लवकरात लवकर मोहम्मद शमीला ऑस्ट्रेलियात बोलवा, असे आवाहन केले आहे. समालोचन करताना शास्त्री यांनी हे मत मांडले, कारण जसप्रीत ( ४-५९) वगळता भारताच्या अन्य गोलंदाजांना काही खास कामगिरी करता आलेली नाही. हर्षित राणाचा अनुभव पिंक बॉल कसोटीसाठी कमी पडताना दिसतोय. नितीश कुमार रेड्डीने चांगला मारा केलाय, परंतु त्याला १ विकेट घेता आली आहे.

## हरियाणाचा पाटणावर शानदार विजय; अव्वल स्थान कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पिछाडीवर असतानाही कोणतेही दडपण न घेता उत्कृष्ट अष्टपैलू खेळ करीत हरियाना स्टीलर्स संघाने पाटणा पायरेट्स संघाला ४२-३६ असे हरविले. प्रो कबड्डी लीग या सामन्यात मध्यंतराला पाटणा संघाकडे १७-१६ अशी केवळ एक गुणाची नाममात्र आघाडी होती.

या स्पर्धेत हरियाना संघाने १६ सामन्यांत १३वा विजय नोंदवला. यामध्ये हरियानाच्या शिवम पटारे याने ११, मोहम्मद रेझा शादलूइने नऊ आणि संजय याने पाच गुण मिळवून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. तर, पाटणा संघाकडून देवांकने १३ गुण मिळवले. हरियानाने गुणतक्त्यातील अव्वल स्थान कायम ठेवले आहे.

हरियाना व पाटणा या दोन्ही तुल्यबळ संघांमध्ये सामन्यात सुरुवातीपासूनच आघाडी घेण्यासाठी चुरस होती. सामन्याच्या सोळाव्या मिनिटाला पाटणा संघाने हरियानावर पहिला लोण चढविला. उत्तरार्धात सुरुवातीला पुन्हा पाटणा संघ लोण नोंदवण्याची संधी मिळाली होती; मात्र हरियानाच्या खेळाडूंनी त्यांना या संधीपासून वंचित ठेवले.

शेवटची दहा मिनिटे बाकी असताना हरियाना संघाने ३०-२९ अशी एक गुणाची आघाडी घेतली होती. पाच मिनिटे बाकी असताना हरियाना संघाने पाटणा संघावर लोण चढवत ३७-३० अशी महत्त्वपूर्ण आघाडी घेतली.

## राजस्थानच्या युवा स्टारची मैदानाबाहेर फटकेबाजी

**नवी दिल्ली :** आयपीएल लिलावात राजस्थान रॉयल्सने करारबद्ध केलेला १३ वर्षिय वैभव सूर्यवंशी १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्ध

चांगल्या फॉर्ममध्ये पाहायला मि आहे. स्पर्धेत त्याने २ अर्धशतके ठोकली आहेत. श्रीलंकाविरूद्ध उपांत्यफेरीच्या सामन्यात त्याने ६७ धावांची दमदार खेळी केली ज्यामध्ये दुसऱ्या षटकात तब्बल धावा ठोकल्या. एक चेंडू त्याने मैदानाबाहेर मारला. भारताने १९ धावांचे लक्ष्य अवघ्या २२ षटकां पुर्ण केले, ज्यामध्ये वैभव सुर्यवंश महत्त्वाची भुमिका बजावली. भा फलंदाजांनी सुरूवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता. दु षटकात वेगवान गोलंदाज दुलन सिगेरा फलंदाजीसाठी आला. वैभवने पहिलाच चेंडू मैदानाबाहेर टोल दुलनीथचे स्वागत केले. त्यानंतर पुन्हा एक षटकार खेचला. त्यानंतर चौकार व षटकाराने षटकाचा शेवट केला. वैभवने या षटकात एकूण ६,६,४,५,०,४,६) ३१ धावा कुटल्या.

### १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत

## स्पार्क स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीचे दोन विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत स्पार्क स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी आणि बीएस्पोर्टस ॲकॅडमी या संघांचा पराभव करून सलग दोन विजयांची नोंद केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत पहिल्या सामन्यामध्ये वीर चोरडीया याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा ८ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीचा डाव ११७ धावांवर मर्यादित राहीला. वीर याने ३३ धावांमध्ये ४ गडी टिपले. ध्रुविल चोरडीया यानेसुद्धा दुसऱ्या बाजुने उत्तम साथ देत २५ धावांमध्ये ३ गडी बाद केले. हे लक्ष्य स्पार्क स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीने १३.३ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केले. निशांत शेवाळे याने ५५ धावांची तर, सोहम मोहीते याने नाबाद २८ धावांची खेळी करून संघाला विजय मिळवून दिला.

दुसऱ्या सामन्यामध्ये आदेश सोळंकी याची गोलंदाजी आणि आरूष सिंग याने नोंदविलेल्या शतकी खेळीमुळे स्पार्क स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीने बीएस्पोर्टसचा १३५ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या स्पार्क स्पोर्टींव्ह क्रिकेट ॲकॅडमीने २५३ धावा धावफलकावर लावल्या. आरूष सिंग याने ११२ चेंडूत १३ चौकार आणि २ षटकारांसह १०० धावांची खेळी केली. हे लक्ष्य गाठताना बीएस्पोर्टस ॲकॅडमीचा डाव १०८ धावांवर गडगडला. मोहीत महाल्ले याने एकहाती ४१ धावांचा लढा दिला. आदेश सोळंकी याने ३ धावांत ४ गडी बाद करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमी, परंदवाल स्पोटर्स क्लब संघांची विजयी आगेकूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कनि क्रिडा ॲकॅडमी तर्फे आयोजित 'चॅम्पियन क्रिकेट लीग' १९ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमी आणि परंदवाल स्पोटर्स क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी आगेकूच केली.

हडपसर येथील चॅम्पियन्स् फिल्ड् मैदान आणि सिंहगड रोड येथील व्हीजन क्रिकेट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत अनिकेत कुडूक याची अष्टपैलु खेळी आणि सुशांत कांबळे याची १३४ धावांच्या खेळीमुळे परंदवाल स्पोटर्स क्लबने कनि ॲकॅडमीचा ३२९ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या परंदवाल स्पोटर्स क्लबने ४८० धावा चोपल्या. सुशांत कांबळे याने ७० चेंडूत २५ चौकार आणि १ षटकारासह १३४ धावांची खेळी केली. अनिकेत कुडूक (८८ धावा), गणेश कालेल (४६ धावा) आणि पारस चव्हाण (४५ धावा) यांनी संघाला मोठी धावसंख्या उभी करून दिली. या आव्हानासमोर कनि क्रिडा ॲकॅडमीचा १५१ धावांवर संपुष्टात अनिकेत कुडूक याने ३१ धाव गडी टिपले.

रूहूल्ला नदाफ याने के भेदक गोलंदाजीच्या जोरावर संघाने वीरांगण ॲकॅडमीचा ४ राखून पराभव केला. पहि खेळणाऱ्या वीरांगण f ॲकॅडमीला १८३ धावा उभ्या आल्या. फिरकीपटू रूहूल्ला याने १३ धावात ४ गडी बाद व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमीने षटकात व ४ गडी गमावून हे गाठले. अर्थव औटी याने ५७ धावांची तर, देव वेद या धावांची खेळी करून संघाला मिळवून दिला.

PROBLEM

# वाहतूककोंडीत पुणेकर 'दबले'

वाहतूक कोंडीमुळे आज प्रत्येक पुणेकर त्रस्त आहे. वाहतूक कोंडीमागची नेमकी कारणे काय जाणून घेऊया...

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या काही वर्षांत पुणे शहराचा व उपनगराचा विकास मोठ्या वेगाने झाला आहे. एमआयडीसी, आयटी कंपन्या, मोठा - मोठ्या शैक्षणिक संस्था, रुग्णालये, हॉटेल्स, मॉल अशा सर्व गोष्टी शहाराच्या प्रत्येक भागात विकसित झाल्या आहेत. त्यामुळे शहरात नोकरी, कामधंद्यासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. शहराचा विकास होत असल्याने शहरात घर घेऊन वास्तव्यास येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लोकसंख्या वाढल्याने शहरातील वाहनांची संख्याही वाढली आहे. या सर्व कारणांमुळे शहरातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होताना दिसत आहे.

शहरातील काही भागांतील रस्त्यांवर सायंकाळच्या वेळेत दोन-दोन तास वाहतूक कोंडीत अडकून रहावे लागते. लहान रस्ते, रस्त्यांची सुरु असणारी कामे, मेट्रोचे काम यांमुळे ही वाहतूक कोंडी होते. शहरात वाहतूक कोंडी नित्याचीच झाल्यामुळे नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या वाहतूक कोंडीला कंटाळूनच काही महिन्यांपूर्वी हिंजवडीतील अनेक कंपन्यांनी आपले कार्यालय दुसऱ्या शहरात स्थलांतरित केले आहे.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

## वाहतूकीच्या नियमांची ऐशी की तैसी!

"वाघोली येथील वाहतूक कोंडी ही नागरिकांसाठी नित्याचीच बाब झाली आहे, यासंदर्भात अनेकवेळा पोलीसांना निवेदने देण्यात आली. मात्र; त्यावर अद्याप प्रभावी तोडगा काढण्यात आला नाही. त्याचा त्रास नागरिक आणि विशेषत: वाहनचालकांना सहन करावा लागत आहे, ही बाब लक्षात घेऊन पोलीस आणि महापालिका प्रशासनाने त्यासाठी योग्य उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तरच नागरिकांची या वाहतूक कोंडीतून सुटका होण्यास मदत होणार आहे.

— राजेंद्र सातव पाटील, माजी उपसरपंच, वाघोली

**आकडे बोलतात...**

**०७** सर्वाधिक वाहतूक कोंडी होणाऱ्या शहरांमध्ये पुण्याचा जगात सातवा क्रमांक लागतो.

**२७.५०** दहा किमी प्रवासासाठी लागणारा सरासरी वेळ

**२५६** किलो कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन वाहतूक कोंडीमुळे झाले.

### सिंहगड रोड

सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी नियमित झाली आहे. दोन वर्षापासून सुरु असलेले उड्डाणपूलाचे काम संथ गतीने सुरु आहे. त्यातच विस्कळीत सिग्नल व्यवस्था यामुळे सिंहगड रोड येथे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. बेशिस्त वाहन चालकांवर पोलिसांचा वचक नसल्याने हा रस्ता वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकला आहे.

### सावित्रीबाई फुले विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आनंदऋषिजी महाराज चौक परिसरात दररोज वाहतूक कोंडी होताना दिसते. विद्यापीठासमोरील चौकात सध्या मेट्रोचे तीन पिलर टाकण्याचे काम सुरू आहे. तसेच खडकी रेल्वे स्थानकाच्या मागे रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या कामांमुळे विद्यापीठ चौकातील वाहतुकीवर परिणाम होत आहे

### वाघोली

वाघोलीतील रहिवाशी आणि प्रवाशांना वाहतूक कोंडीचा त्रास कायम आहे. अरुंद रस्ते आणि फेरीवाल्यांचे अतिक्रमण यामुळे परिस्थिती आणखीनच बिकट झाली आहे. तसेच रस्त्याच्या कडेला बेशिस्तपणे उभ्या असलेल्या रिक्षा आणि अन्य वाहनांमुळे वाहतूक कोंडीत आणखीनच भर पडत आहे.

### पिंपरी चिंचवड

पिंपरी चिंचवडमधील मुकाई चौक, गोडाऊन चौक, फिनोलेक्स चौक, भारत माता चौक, खंडोबा माळ चौक, बो-हाडे वस्ती चौक, त्रिवेणीनगर चौक, नाशिकफाटा, लक्ष्मी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी चौक, भुजबळ चौक, भुमकर चौक, फोनिक्स मॉल परिसर, काशिद पार्क, मोसरी बस स्टँड, डांगे चौकात वाहतूक कोडीं होते.

## का होते वाहतूक कोंडी?

- रस्त्याच्या कडेला बेशिस्तपणे वाहने लावल्यामुळे वाहने चालवताना अडथळा निर्माण होतो.
- अनाधिकृत विक्रेत्यांनी रस्त्यावर दुकाने थाटल्यामुळे पदचाऱ्यांबरोबरच वाहनचालकांना नाहक त्रास होतो.
- शहरातील अनेक रस्त्यांवर सध्या विकासकामे सुरु आहेत. त्यामुळे बहुतांश रस्ते अरुंद झाले आहे.
- सकाळी व संध्याकाळी घराबाहेर पडणाऱ्या वाहनचालकांची संख्या अधिक असते
- अनेक पीएमपीएलचे बसथांबे रस्त्याच्या कडेला आहेत. ऐन रस्त्यातच बस थांबल्यामुळे बसच्या मागे वाहनांची रांग लागते.
- रस्त्यांवर अनेकदा अवजड वाहनांची वर्दळ असते. या वाहनांमुळे रस्त्यावरील मोठी जागा व्यापली जाते व अनेकदा वाहतूक कोंडी होते.

SOLUTION

वाहतूक कोंडीबाबात नेहमीच चर्चा होते. पण ती सोडवण्यासाठी काय उपाय करणे गरजेचे आहे याबाबत दैनिक 'राष्ट्रसंचार'ने घेतलेला आढावा

## वाहतूक कोंडीवर उपाय

- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारून खासगी वाहनांचा वापर कमी करणे.
- काही कालावधीसाठी एकेरी मार्ग व्यवस्था लागू करून वाहतुकीचे नियोजन करणे.
- रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची साधने बसवणे
- रस्त्यांवर वाहनांचा एकसारखा वेग हवा जेणेकरुन रस्त्यांची वाहन कॅरी करण्याची क्षमता वाढेल
- नो-पार्किंग झोन तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. तसेच, पार्किंगसाठी मोफत आणि सशुल्क जागा उपलब्ध करून द्यावी.
- मुख्य रस्त्यांसह पर्यायी आणि भुयारी मर्गाचा अवलंब करावा.

# 'वन वे' चे हवे नियोजन

## हवी पर्यायी मार्गाची सक्ती



"वाहतूक पोलिसांच्या वतीने ही वाहतूक कोंडी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, त्याचाच एक भाग म्हणून पोलीसांचा पहारा वाढविण्यात आला आहे. विशेष म्हणजे वाहनचालक नियमभंग करत असल्याने या वाहतूक कोंडीत अधिकच भर पडत आहे, त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई सुरू करण्यात आली आहे, यापुढील कालावधीत अशा वाहनचालकांवर कारवाईला प्राधान्य देण्यात येणार आहे.

— अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक

पुणे आणि वाहतूक कोंडी हे आता जणू समीकरणच तयार झाले आहे. पुण्याच्या अनेक छोट्या छोट्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होताना पाहायला मिळत असते. त्यात पावसाळा सुरु झाला की विचारायचीच सोय नाही. कारण रस्ते अक्षरशः वाहतूक कोंडीने तुंबून जातात.

नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी कोणत्या परिसरातील कोणत्या रस्त्यावर, कोणत्या चौकात वाहतूक कोंडी होते, याचा सर्व्हे झाला आहे. तसेच या ठिकाणी का वाहतूक कोंडी होते, याच्या कारणांचाही शोध घेण्यात आला आहे. अनेक चौकांमध्ये अतिक्रमणे झाली आहेत, रस्त्यांवर खड्डे पडले आहेत, रस्ते अरुंद आहेत, अशी कारणे समोर आली आहेत. त्यानुसार, वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रत्येक चौकात तसेच रस्त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचनाही प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. दरम्यान पुण्यातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक विभागाने गुगुलबरोबर करार केला आहे. या करारानुसार पुणे महापालिका आणि वाहतूक विभागाच्या समन्वयातून एक ॲप्लीकेशन तयार करण्यात येणार आहे. यामुळे पुणे शहरातील रस्त्यांची कॅरींग कॅपेसिटी (जास्त वाहने जाण्याची क्षमता) वाढवण्यात येणार आहे. पुणे शहरातील रस्त्यांचे उपयोगानुसार वर्गीकरण करण्यात येणार आहे. त्यावर रस्त्याबाबत काम करणाऱ्या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे. तसेच पुणे आणि पिंपरी चिंचवडमधील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी शहराच्या हद्दीबाहेरुन रिंगरोड तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) जवळपास साडे दहा हजार कोटी रूपये खर्च करून पुणे रिंग रोड उभारत आहे.

"शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी खासगी वाहनांची संख्या कमी करुन सार्वजनिक वाहनांचा वापर वाढवला पाहिजे. तसेच शहरातील प्रत्येक चौकामध्ये दोन ते तीन वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

— अक्षय पुराणिक, वाहनचालक

### भविष्यातील दिलासा

रिंगरोडमुळे वाहतूक कोंडी फोडण्यात मदत होणार आहे.

पुण्यात मेट्रोचे जाळे मोठ्या प्रमाणात परसले आहे.

या मेट्रोमुळे रस्त्यांवरील वाहतूक कोंडी बऱ्यापैकी कमी होईल.